


शनिवार
२४ मे १९७५
एक रुपया

# माणूस

चित्र वार्ता पुस्तक पुरवणीसह

सत्तास्पर्धेच्या
राजकारणासाठी
संपाचा वापर!
'माहितगारांचे
खास वार्तापत्र

बातचित -
प्रिया तेंडुलकर




# संपाला राजकीय वास येऊ लागला.



## पोलादी निर्धाराची वाटचाल

महासंघाचे नेते :
मध्यभागी सरचिटणीस र. ग. कर्णिक
त्यांच्या उजव्या बाजूला अध्यक्ष एम. व्ही. गुब्बी
व चतुर्थश्रेणी कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष
ग. गो. भोळे.





भलत्यांचे ऐकणार की परिस्थितीचा विचार करणार?
सरचिटणीस र. ग. कर्णिक यांच्या सभेला जमलेले कर्मचारी





पंचविसावा
दिवस
ओलांडला ............

संपाला जनतेचा पाठींबा नाही या सरकारी विधानाला हे चोख उत्तर.

मात्र दीर्घकालीन संघर्षाला ही ताकद पुरी पडेल का ?



# साप्ताहिक माणूस

| | | | |
|---|---|---|---|
| संपादक | साहाय्यक | शनिवार | वर्ष : चौदावे |
| श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर | २४ मे | अंक : एकावन्नावा (५२) |
| | सौ. निर्मला पुरंदरे | १९७५ | किंमत : एक रुपया |


## शोकांतिका कुणाची ?

संपादक, 'माणूस' यांस—

प्रा. ग. प्र. प्रधान यांची मोरारजी देसाई-वरील टिप्पणी वाचल्यावर शोकान्तिका मोरारजींची की प्रधानांची असा प्रश्न पडला. मोरारजी देसाईंचा आश्चर्यकारक स्वभाव-पालट झाल्याचे अनेक पुरावे प्रकाशात येत असताना प्रधानांनी जुनाच कोळसा उगाळीत बसावे याचा खेद होतो.

गुजरातच्या त्वरित निवडणुकीसाठी उपोषण करण्याचा निर्णय मोरारजींनी घेतला तो जयप्रकाशजी व विरोधी पक्षाच्या नेत्यांना विचारून. त्यांच्याच सल्ल्याने त्यांनी उपोषण सोडले. गुजरात संघटना काँग्रेसचे श्री. हितेंद्र देसाई व इतर अनेक वरिष्ठ नेत्यांचा स. प., जनसंघ, भारतीय लोकदल यांच्याशी निवडणूक-ऐक्य करण्यास सक्त विरोध होता. त्यांची समजूत तर मोरारजींनी घातलीच, पण जागावाटपाचे अत्यंत बिकट व शिव्याखाऊ काम अल्पावधीत नि सर्वांचे समाधान होईल अशा पद्धतीने पूर्ण केले. वाजपेयी, मधु लिमये यांच्यासारखे विरोधी नेते व पत्रकार इंद्रजित यांच्यासारखे राजकीय निरीक्षक, सर्वांनी याबद्दल मोरारजींची पाठ थोपटली आहे. संयुक्त महाराष्ट्र आंदोलनानंतरच्या निवडणुकीच्या वेळी एस. एम. जोशींसारखा निरहंकारी नेता समितीचा प्रमुख असूनही जागावाटपावरून समिती मोडायची वेळ आली होती, याचे विस्मरण प्रधानांना झाले नसावे. समान निवडणूकचिन्हाचा आग्रह घातक होता; कारण निवडणूकमंडळाने तसे चिन्ह दिलेही नसते व मग खूपच घोटाळा माजला असता हीही वस्तुस्थिती आता प्रकाशात आली आहे.

मोरारजींचे पूर्वचरित्र पुन्हा पुन्हा उगाळण्यात काय हंशील आहे ? जयप्रकाशजी एवढी वर्षे स्वस्थ का बसले, या प्रश्नाएवढेच ते गैरलागू आहे. मनुष्य, मग तो मोरारजी का असेना, अनुभवाने बदलू शकतो. गेली ४–५ वर्षे सत्तेबाहेर राहिल्याने मोरारजी खूप बदलले आहेत, असा अनेकांचा अनुभव आहे. खरोखरच इष्ट बदल घडला असेल तर आपण निर्मळ मनाने मोरारजींकडे पहायला हरकत का असावी ?

प्रा. प्रधान अनेक वर्षे राजकारणात वावरत असले तरी त्यांचा उत्साह काही वेळा उचित संयमावर मात करतो असे दिसते. अंतुल्यांच्या वडखळ नाकाप्रकरणी प्रधानांचा उत्साहच विरोधी पक्षांना महाग पडला. मोरारजीं-बाबतही प्रधानांनी १५ जूनपर्यंत कळ काढायला हरकत नव्हती.

**दि. वि. गोखले**

माणूस साप्ताहिक, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३० दूरध्वनी ४३४५९ । छायाचित्र मांडणी : सुनिल कुरणे

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर**

# महाराष्ट्र टाईम्स शालिनी दिंडी आणि पुरंदरे

सडेतोड व निर्भीड अग्रलेख हे महाराष्ट्र टाइम्सचे एक अनुकरणीय वैशिष्टच आहे. परंतु काही वेळा या वैशिष्टयाचाही अतिरेक होतो आणि जाणता किंवा अजाणता काही व्यक्ती, त्यांचे कार्य याविषयी या अतिरेकामुळे विनाकारणच गैरसमज निर्माण होतात. असा काही प्रकार 'शालिनीबाईंची खंडणी' या दिनांक १७ मे म.टाइम्सच्या अंकातील अग्रलेखामुळे होण्याचा संभव आहे.या संभवाचे परिणाम दूरान्वयाने माणूसपर्यंतही पोचतात. कारण या अग्रलेखाच्या उत्तरार्धाचा विषय झालेले शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे हे माणूस-परिवारापैकी एक आहेत आणि त्यांच्या कृति-उक्तींचा किंवा त्या-संबंधी झालेल्या चर्चेचा बरावाईट परिणाम माणूसलाही टाळता येत नाही. शिवशाहिरांवरही माणूसचा असाच उलट परिणाम स्वाभाविकच होत राहतो—त्यांचे क्षेत्र, त्यांचे अंगीकृत कार्य सर्वस्वी भिन्न असूनही. अगदी अलीकडचे उदाहरण जवाहरलाल दर्डा यांचे सांगता येईल. दर्डाविरुद्ध माणूसने आघाडी उघडली. दर्डांनी माणूसला कोर्टात खेचले. एक नाही, दोन नाही, चांगल्या पाच फिर्यादी माणूसवर ठोकल्या. अब्रुनुकसानीदाखल दोन लाख रुपये दंडाची किंवा क्षमायाचनेची माणूसकडून मागणी केली. माणूस क्षमायाचनेला तयार नाही. त्यामुळे कोर्टदरबार सुरू आहेत. तेही नागपूर आणि चांदा अशा लांबलांबच्या ठिकाणी. माणूस—राजहंसपरिवारापैकी एक या नात्याने शिवशाहीर पुरंदऱ्यांनाही माजगावकरांप्रमाणेच या प्रकरणाची आर्थिक–मानसिक झळ पोचतच आहे—जबाबदारी सर्वस्वी माणूसची, म्हणजेच माजगावकरांची असूनही. याच न्यायाने पुरंदऱ्यांच्या अलीकडच्या शालिनी दिंडी प्रकरणाचा व त्यासंबंधी वृत्तपत्रांतून आलेल्या टीकेचा परिणाम माणूसवर होणार नाही, होत नाही असे नाही. गेल्याच महिन्यात पुण्यात एक अफवा पसरली होती. मध्यंतरी बंद पडलेली चित्रवार्ता पुरवणी माणूसने सुरू केली तेव्हा काही गोटातून हूल उठली की, शालिनीबाई पाटील, लता मंगेशकर वगैरे पुरंदऱ्यांच्या चाहत्या मंडळींकडून माणूसला भली मोठी रक्कम देणगी किंवा बिनव्याजी कर्ज म्हणून मिळालेली आहे व त्यातून माणूसने हा पुरवणीचा आतबट्ट्याचा शौक पुन्हा सुरू केलेला आहे. परंतु दुर्दैवाने म्हणा, सुदैवाने म्हणा, या पुरंदरेसंबंधित मंडळींकडून अशी कुठलीही मदत या क्षणापर्यंत तरी आलेली नाही, येण्याची शक्यताही दिसत नाही. माणूसचे जळते लाकूड हाती घ्यायला तयार होण्याइतकी ही पुरंदरेसंबंधित मंडळी भोळीभाबडी नाहीत व असा काही अचानक व विनासायास धनलाभ होण्याइतका माणूसही भाग्यवान नाही. तरी काही लोकांचा समज असा व्हावा याचे कारण माणूस–पुरंदरे यांचे संबंध. हे संबंध सध्या तरी स्पष्ट असल्याने माणूसला पुरंदऱ्यांसंबंधीच्या म. टाइम्ससारख्या जबाबदार व वजनदार वृत्तपत्रातील 'संपादकीय' लिखाणाची दखल घेणे निकडीचे वाटते. एरवी अशी निकड वाटलीच असती असे नाही.

एरवी निकड वाटली नसती याचे आणखीही एक कारण आहे. म. टाइम्सचे विशेषत: हे लिखाण अती वैयक्तिक स्वरूपाचे झालेले आहे. अग्रलेखातील टीकेत सामाजिक महत्त्वाचा भाग फार थोडा आहे. पुरंदरे शालिनीबाईंच्या दिंडीत सामील झाले यात म. टाइम्स संपादकांचा राग पुरंदऱ्यांवर आहे, की शालिनीबाईंवर आहे, की मुंबईत हॉस्पिटल या कल्पनेवर आहे, की या मुंबईतील हॉस्पिटलसाठी शालिनीबाई वसूल करीत असलेल्या खंडण्यांवर आहे याचा शोध घेतला, तर फक्त खंडण्यांवरील रागाला, टीकेला काही सामाजिक, राजकीय अर्थ आहे. मुंबईतील संकल्पित हॉस्पिटलसाठी शालिनीबाई सक्तीने खंडण्या-देणग्या वसूल करीत आहेत असा अग्रलेखात आरोप केलेला आहे. हा आरोप खरा असल्यास नक्कीच म. टाइम्सने केलेली टीका अगदी रास्त व यथार्थ म्हटली पाहिजे. पण देणग्या देणाऱ्यांकडून या आरोपाला बळकटी देणारा कोणताच पुरावा अद्याप पुढे आलेला नाही. म. टाईम्सजवळ असा पुरावा असल्यास संपादकांनी तो प्रथम प्रसिद्ध करायला हवा होता. त्याचा परिणाम टीकेपेक्षा निश्चितच अधिक झाला असता. असा पुरावा नाही तोवर शालिनीदिंडीतला सामाजिक-राजकीयदृष्टया आक्षेपार्ह भाग एवढाच तूर्त ठरतो, की या सर्व देणग्या-खंडण्या जातीय व प्रांतीय भावनांना खतपाणी घालून गोळा केल्या जात आहेत; पण मग हे जातीयतेचे व प्रांतीयतेचे विष शालिनीबाई एकट्याच पसरवीत आहेत, की त्यांच्या आडून किंवा स्वतंत्रपणेही इतर अनेक मातब्बर व महत्त्वाकांक्षी नेते या विषप्रयोगात सामील आहेत, हेही पाहावे लागेल व प्रथम हल्ला अशा पडद्याआडच्या व्यक्तींवर व शक्तींवर करणे उचित ठरेल. या पडद्याआडच्या शक्तींचा व व्यक्तींचा वेध घेणे म. टाइम्सकारांना मान्य नाही असे दिसते. कारण त्यांनी अग्रलेखाचा बहुतांश भाग शालिनीबाईंच्या वाह्यात बडबडीला उत्तरे देण्यात व पुरंदऱ्यांना कठोरातल्या कठोर शिक्षा फर्माविण्यात खर्च केलेला आहे. कोणीही नि:पक्षपाती माणूस म. टाईम्सकारांना असे विचारू शकतो की, 'बाबारे, या दोघांचा 'नेमका' 'सामाजिक' गुन्हा तर प्रथम नीटपणे सांग ! मग हवी ती शिक्षा फर्मावा !' हा गुन्हाच अग्रलेखात नीट सांगितला गेलेला नाही. मुंबईत हॉस्पिटल काढणे हा गुन्हा आहे का ? साखरकारखानदारांकडून या हॉस्पिटलसाठी देणग्या गोळा करणे हा गुन्हा आहे का ? पुरंदऱ्यांनी या देणग्यांसाठी भाषणे करणे हा गुन्हा आहे का ? रणजित देसाईंनी यासाठी जिजाबाईंच्या

जीवनावर एखादा सिनेमा लिहिणे हा गुन्हा आहे का ? या सिनेमासाठी म. शासनाने त्रिशतसंवत्सरी महोत्सवाचा एक भाग म्हणून काही मदत देणे हा गुन्हा आहे का ? याप्रकरणी गुन्हे फक्त दोनच ठरू शकतात. १ : पैसे-देणग्या लोकांकडून सक्तीने वसूल करणे. २ : जातीय-प्रांतीय भावनांना खतपाणी घालणे. दुर्दैवाने म. टाइम्स-कारांनी हे गुन्हे पुराव्यानिशी नीट न मांडता शिक्षा फर्मावण्याची विनाकारणच घाई केलेली आहे. त्यामुळे शक्यता अशी आहे, की खरा गुन्हेगार नामानिराळा राहील आणि भलताच एखादा हत्तीच्या पायाखाली तुडवला जाईल. विश्लेषणाची थोडी तसदी म. टाइम्स-कारांनी अधिक घेतली असती तर ही तुडवातुडवी त्यांना सहज टाळता आली असती.

वरील दोन गुन्ह्यांपैकी पुरंदऱ्यांचा गुन्हा फार तर एकच असू शकतो.शालिनीबाईंच्या जातीय-प्रांतीय दिंडीत त्यांच्यासारख्या राष्ट्रीय संस्कारात वाढलेल्या शिवभक्ताने सामील होऊन शिवाजीला महा-राष्ट्रात व त्यातल्या त्यातही उच्चकुलीन मराठा जातीत बंदिस्त करून ठेवणे योग्य आहे काय ? सक्तीने देणग्या वसूल करणे हा गुन्हा पुरंदरे करूच शकत नाहीत. कारण यासाठी लागणारे कुठलेही सत्तास्थान त्यांचेजवळ नाही. हजारो व्याख्याने देऊनसुद्धा आणि लाखो लोकांनी ही व्याख्याने ऐकूनसुद्धा आजवर त्यांच्या प्रतापगडस्मारकासाठी जमा झालेली रक्कम चार–पाच लाखांपेक्षा अधिक नाही आणि यासाठी त्यांनी खर्च केलेला वेळ ? सुमारे दहा ते पंधरा वर्षे. या वेगाने गेल्यास त्यांनी हॉस्पिटलसाठी घोषित केलेला पाच लाख रुपये देणगीचा संकल्प पुरा होणार केव्हा, आणि समजा नजीकच्या भविष्य-काळात तो पुरा झाला, तरी त्याची शालिनीबाईंनी जमा करीत आणलेल्या एक कोटी रुपयांपुढे मातब्बरी ती काय ? म. टाइम्स-कारांनी न नोंदलेला पण असलाच तर पुरंदऱ्यांचा खरा गुन्हा एकच आहे–त्यांनी शिवाजीला लहान केले, त्याची उत्तुंग राष्ट्रीय प्रतिमा रंगवण्याचे कार्य करण्याऐवजी जातीय–प्रांतीय वृत्तीचे रंग या प्रतिमेत ओतणाऱ्यांच्या भ्रष्ट घोळक्यात ते विनाकारणच सामील झाले. 'रयतेच्या भाजीच्या देठालाही हात लावू नका' अशी आपल्या सैन्याला सक्त ताकीद देणारा शिवाजी या घोळक्याला मानवणार आहे का ? परवडणार आहे का ? भाजीचे देठच काय, भाजीपाल्यासकट रयतेच्या जमिनीसुद्धा हडपगडप करून टाकणारा हा घोळका आहे. शिवाजीला वास्तविक या घोळक्यापासून दूर करायला हवे, तो लंगोटीवाल्या मावळ्यांचा कसा होता हे सांगायला हवे. हे न सांगणे म्हणजे शिवाजीचे 'स्तोम' माजवणे होय. या स्तोमात अडकल्याबद्दल वास्तविक 'बाबा, मनकी आँखे खोल' म्हणून त्यांना कुणी तरी सांगायला हवे होते. त्याऐवजी म. टाइम्सकारांनी 'लाचारीचा' अगदी गैरलागू मुद्दा उपस्थित करून वड्याचे तेल उगाचच वांग्यावर काढले आहे. पुरंदरे चुकीच्या घोळक्यात, दिंडीत सापडले आहेत, यामुळे त्यांच्या अंगीकृत कार्याला उणेपणा येतो आहे हा मुद्दा वेगळा. या दिंडीत, घोळक्यात ते लाचारीने वागत आहेत हा मुद्दा वेगळा. पहिल्या मुद्द्याबद्दल पुरंदऱ्यांना दोषी धरले जाऊ शकेल; दुसऱ्याबद्दल नाही. वरचेवर कुर्निसात करण्याच्या, वाकून मुजरे करण्याच्या, वहिनीसाहेब-आईसाहेब वगैरे संबोधने वापरण्याच्या त्यांच्या सवयींचा-लकबींचा हा अगदी चुकीचा अर्थ लावला जातो आहे. पु. लं. नी आपल्या 'गणगोत' मध्ये या पुरंदऱ्यांच्या ऐतिहासिक रीतिरिवाजांची भरपूर चेष्टा केलेली आहे, पण म. टाइम्सकार लावतात तसा त्यांचा चुकीचा अर्थ लावलेला नाही. पु. लं. चा हा हवाला म. टाइम्सकारांना पुरेसा आहे की नाही ?

पण समजा, म. टाइम्सकार म्हणतात तसा शिवचरित्राचा मुख्य विशेष स्वाभिमानाची शिकवण हा आहे आणि पुरंदरे शालिनीदिंडीत सामील झाल्यामुळे या शिकवणुकीशी संपूर्ण विसंगत अशी कृती करीत आहेत, असे वादाकरिता क्षणभर गृहीत धरले तरी एक प्रश्न म. टाइम्सकारांना विचारावासा वाटतोच. तो हा की, संपादक महोदय ! लाचारांच्या दिंड्याच काय, मोठमोठाले तांडेच्या तांडे सर्वत्र, सर्व क्षेत्रांत दिमाखाने मिरवत, हिंडत, फिरत असताना आपली लेखणी अचानक, एकदम पुरंदऱ्यांवरच का घसरून पडावी ? लाचारीच्या गुन्ह्यासाठी इतक्या कठोर तर सोडाच, मामुली शिक्षाही अद्यापपर्यंत म. टाईम्सकारांनी कोणाला फर्मावल्याचे वाचनात तरी आलेले नाही. गुन्हा शाबित होणे लांब राहिले. प्रथमदर्शनी पुरावाही नीट मांडलेला नाही. तरी शिक्षा मात्र एकदम हात कलम करण्याची, पायात मणामणाच्या बेड्या ठोकण्याची ! लाचारवृत्तीचा इतका तिटकारा एका दृष्टीने फार मौलिक सद्‌गुण आहे हे नाकारता येत नाही. या सद्‌गुणाबद्दल कुणीही म. टाइम्सकारांबद्दल आदरभावच व्यक्त करील. पण मग या तिटकाऱ्याचे परिणाम सरसकट सर्व लाचारांना सारख्या प्रमाणात जाणवून देण्याची जबाबदारीही म. टाइम्सकार टाळू शकत नाहीत. गेल्या दहा–पाच वर्षांत त्यांना महा-राष्ट्रात एकही लाचार साहित्यिक, पत्रकार, उद्योगपती, राजकारणी, मंत्री आढळला नाही का ? त्यांच्या अगदी निकटच्या वर्तुळातही अशी काही नावे आहेत–ज्यांची विद्वत्ताप्रचुर लाचारी हा सार्वजनिक चर्चेचा विषय ठरायला वास्तविक हरकत नसावी.

राजकीय क्षेत्रातील लाचारीवर म. टाइम्सकार किती वेळा तुटून पडलेले आहेत ? राजकीय क्षेत्रात मराठी नेतृत्वाने स्वाभिमान सोडून किती तरी वेळा कंबरेत वाकण्याचेच काय, अगदी गुडघे टेकण्याचेदेखील राजकारण केलेले आहे. म. टाइम्सकार अशा दिल्ली-तील वा मुंबईतील श्रेष्ठ वा कनिष्ठ नेतृत्वावर कडाडून लिहिते झाले, अशी नोंद नाही.दिल्लीश्वराच्या दरबारात शिवाजीमहाराजांचा अपमान झाला तर ते खवळले. मिळालेले हलकेसलके मानपान त्यांनी भिरकावून दिले. ही मराठी स्वाभिमानाची चुणुक हिमालयाच्या मदतीला म्हणून महाराष्ट्रातून दिल्लीस गेलेल्या किती सह्याद्री-शिखरांनी दाखवली, याची काही खास आतल्या गोटातील वार्ता म. टाइम्सकारांजवळ असली, तर तीही वाचण्यास किंवा ऐकण्यास लोक फार उत्सुक आहेत. एकाने स्वाभिमान सोडला तर पायात बेड्या आणि दुसऱ्याने तोच गुन्हा केला तरी त्याच्या गळ्यात मात्र अग्रलेखांचे आणि वृत्तपत्रीय स्तंभांचे जाडजूड हार आणि गुच्छ–हा पक्षपात कशासाठी ? संपादकमहोदय ! हा आपला इन्साफ साफ नाही म्हणून नामंजूर

**–श्री. ग. मा.**

# संप आणि सत्तास्पर्धेचे राजकारण

माहितगार

सरकारी कर्मचाऱ्यांचा संप त्यांच्या आर्थिक मागण्यांतून सुरू झाला. संपाने पंचविसावा दिवस ओलांडला तसतसा या संपाला राजकीय वास येऊ लागला आहे. संप व राजकारण म्हटले की ते विरोधी पक्षांचे असे समीकरण रूढ झाले आहे. परंतु या वेळी संपाला राजकीय वास येत आहे तो काँग्रेसमधील सत्तास्पर्धेचा! महासंघाचे नेते कोणाची बाहुली बनली आणि त्यांनी संप पुकारला इतके सरळ हे राजकारण नाही. तसे म्हणणे हा कर्मचारी महासंघावर घोर अन्याय होईल. राजकारणी लोक आपल्या राजकारणासाठी कोणत्या घटनांचा कसा उपयोग करून घेतील हे कल्पनेबाहेरचे असते! कर्मचाऱ्यांचा संप केंद्राप्रमाणे महागाईभत्ता या प्रमुख मागणी-साठी आहे. राज्यसरकारला हे तत्त्व अमान्य आहे का? सरकार केंद्राप्रमाणे महागाईभत्ता हे तत्त्व अमान्यही करत नाही आणि मान्यही करत नाही. अर्थमंत्री म. ध. चौधरी यांनी विधानसभेतच सांगितले आहे की, केंद्राप्रमाणे महागाईभत्ता या तत्त्वाला सरकारचा विरोध आहे असे नव्हे! घास सरळ घेतला नाही, पाठीमागून हात तोंडाजवळ आणला तरी घास तोंडातच जाणार! श्री. चौधरी यांचे हे विधान असेच उंटाप्रमाणे तिरके जाणारे आहे! सरकारने सरळ नसले तरी वेगळ्या पद्धतीने केंद्रा-प्रमाणे महागाईभत्ता हे तत्त्व मान्य केले आहे. इतकेच काय पण १९७३ पर्यंत दिलेल्या वाढी केंद्रीय दराप्रमाणे दिल्या आहेत! सरकार आताच ते देण्यास तयार नाही.

राज्यसरकारने कर्मचाऱ्यांसाठी अंदाजपत्रकात पंधरा कोटी रुपयांची तरतूद केली. त्यामुळे कर्मचाऱ्यांचा असंतोष इतर मार्गांनी प्रगट झाला होता. यापेक्षा अधिक देता येणार नाही असे तुणतुणे अर्थमंत्री प्रथमपासून वाजवत होते. कर्मचाऱ्यांनी संपाची तारीख जाहीर केली. माजी राष्ट्रपती राधाकृष्णन यांच्या निधनाचे निमित्त पुढे करून कर्मचाऱ्यांनी संप पुढे ढकलला. यामागे काही तरी भरीव आश्वासन मिळेल किंवा त्यासाठी प्रयत्न केला जाईल या अपेक्षेने संप पुढे ढकलला होता. मुख्य मंत्र्यांनी आपल्याला आठ दिवसांची मुदत द्यावी असे आवाहन केले. नुकतेच नवे मुख्य मंत्री झाले आहेत. त्यामुळे मुदतीचे आवाहन सरकारला सहानुभूती मिळवून देण्यास कारणीभूत झाले होते. संप सुरू झाल्यानंतर वाटाघाटीचे पर्व सुरू झाले. संप सुरू झाल्यावर प्रथम संप मागे घ्या मग वाटाघाटी होतील हा नेहमीचा पवित्रा नव्या मुख्य मंत्र्यांनी घेतला नाही किंवा संप-नेत्यांच्या अटकेचे सत्र सुरू करून कर्मचाऱ्यांत भीतीचे वातावरण निर्माण केले नाही, हाही अनुभव नवा होता. वाटाघाटी सुरू झाल्या तेव्हा सरकार पंधरा कोटींपेक्षा अधिक पैसा देण्यास तयार आहे असे सांगितले जाऊ लागले. पैसा किती देणार हे आताच सांगितले तर कर्मचारी त्याच्यापेक्षा अधिक मागतील असा दावा करून रकमेची मूठ झाकली ठेवण्याचा आटोकाट प्रयत्न झाला. त्यानंतर मूठ उघडली गेली आणि सरकारने ३५ कोटी रुपये देऊ केले. ते देताना केंद्रीय वेतन मंडळाने निर्देशांकाच्या ४ व ३ टक्के वाढीऐवजी ३ व २ टक्के वाढ देण्याचे सूत्र ठरवले गेले. मुख्य मंत्र्यांनी वाटाघाटी फिसकटल्या-नंतर ३५ कोटी रुपयांचा आकडा जाहीर केला. परंतु संपासंबंधी विचार करण्यासाठी नेमलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीने ३५ कोटींची तयारी आधीच दर्शविली होती. आता वाटाघाटीमुळे ही रक्कम ठरवली या म्हणण्याला काही अर्थ नाही. संप सुरू होण्यापूर्वीच १७ एप्रिलच्या मुंबईच्या दोन दैनिकांत अंदाजपत्रकात तरतूद केलेल्या १५ कोटींशिवाय जादा २० कोटी रुपये देण्याचे सरकारने ठरवले आहे अशी स्पष्ट बातमी प्रसिद्ध झाली आहे. याचा अर्थ वाटाघाटींच्या टेबलावर ३५ कोटींचा आकडा निश्चित झालेला नाही, तर संपा-पूर्वीच त्याचा निर्णय घेतलेला होता. नंतर या ३५ कोटी रुपयांनाच ३ व २ टक्के या तत्त्वाच्या कोंदणात बसवले आहे. कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे १९७३ पर्यंत केंद्रीय दराने महागाईभत्ता दिला तो पुढे द्यावा आणि ते तत्त्व मान्य करावे! १५ कोटींपेक्षा एक पैसा देऊ शकत नाही असे म्हणणारे सरकार संपाच्या वडग्यामुळे ३५ कोटीं-पर्यंत गेले. संपाचे हत्यार उगारले नसते तर कर्मचाऱ्यांच्या तोंडाला १५ कोटी रुपयांचीच पाने पुसली गेली असती.

राष्ट्रीय वेतन धोरण ठरवले जाणार आहे तोपर्यंत ३ व २ टक्के या तत्त्वाचा स्वीकार करावा. पुढे धोरण ठरल्यानंतर त्यानुसार महागाईभत्ता दिला जाईल असे मुख्य मंत्री म्हणतात. महाराष्ट्राने स्वीकारलेले तत्त्व राष्ट्रीय वेतन धोरण म्हणून पुढे येईल अशी भीती कर्मचाऱ्यांना वाटते. तसेच दर चार–पाच वर्षांनी संप करून मागण्या मिळवणे हेही कर्मचाऱ्यांना परवडणारे नाही. त्यामुळे त्यांनी तत्त्वाचा आग्रह धरून हा प्रश्न कायमचा निकालात काढण्याचे ठरवले आहे. त्या दृष्टीने कर्मचाऱ्यांनी संपाची तयारी केली आहे. आर्थिक मदती-बरोबर धान्यही गोळा करून त्याचे वाटप केले जात आहे. तृतीय व चतुर्थ श्रेणीच्या कर्मचाऱ्यांना ही मदत देऊन संप अधिक काळ लढव-ण्याची ताकद निर्माण केली जात आहे.

कर्मचाऱ्यांच्या मागण्यांना विरोध करताना ग्रामीण भागातील लोकांना पुढे केले जात आहे. गेली २७ वर्षे केंद्रात व राज्यात काँग्रेसची राजवट आहे. या राजवटीत ग्रामीण भागाच्या विकासाचा

परिणामकारक कार्यक्रम सरकारने हातात घेतला नाही म्हणूनच शहरीकरण ३२ टक्के झाले आहे. शहरीकरण वाढत आहे त्याला सरकार ग्रामीण भागाचा विकास करू शकत नाही हे कारण आहे. ग्रामीण भागात २७ वर्षांत रोजगार उपलब्ध केले नसल्यामुळे पोट भरण्यासाठी लोक शहरात येतात.

महाराष्ट्रात बारा तालुके दुष्काळी होते. गेल्या सत्तावीस वर्षात दुष्काळी तालुक्यांची संख्या पंच्याऐंशी (८५) झाली आहे. त्या वेळी सरकारी कर्मचाऱ्यांच्या मागण्या नव्हत्या. मग ही हालत ग्रामीण भागाची का झाली ? सरकारच्या नाकर्तेपणामुळेच ग्रामीण भागाची ही अवस्था झाली आहे. सरकारच्या पापाची फळे ग्रामीण भागातील जनता भोगीत आहे. तिला सरकारी कर्मचाऱ्यांवर सोडण्यासाठी मागण्या मान्य केल्या तर ग्रामीण भागातील योजनांवर परिणाम होईल असा प्रचार केला जात आहे. सरकारी नोकरीत विशिष्ट जातीचा वर्ग आहे हीही आता वस्तुस्थिती राहिलेली नाही. सरकारच्या धोरणामुळे मध्यमवर्ग वाढत असून सर्व जातींतील माणसांचा मध्यमवर्ग बनलेला आहे. मध्यमवर्ग विशिष्ट जातींचा होता तेव्हा त्या मध्यमवर्गात लढण्याची हिम्मत नव्हती. आता सर्व थरांतून बनलेल्या मध्यमवर्गामुळे, त्याचप्रमाणे ग्रामीण भागातील माणूसही नोकरीत आल्यामुळे या वर्गाची लढण्याची ताकद वाढली आहे. त्यामुळेच संप पंचवीसवर दिवस चालला आहे. सरकार शहरी व ग्रामीण अशी कोंबडी झुंजवून राजकारण खेळत आहे. सरकारी नोकरी ही ब्राह्मणवर्गाची काही काळामागे मक्तेदारी होती. शिक्षणाच्या प्रसाराने त्यांची मक्तेदारी मोडली असून सरकारी नोकरीत ब्राह्मणेतरांचा फार मोठा वर्ग आहे हेही लक्षात घेतले पाहिजे.

संपप्रकरणी मुख्य मंत्री शंकरराव चव्हाण यांचे धोरण या राजकारणापासून वेगळे होते. कर्मचाऱ्यांना दुखवून राज्यशकट चालवणे शहाणपणाचे होणार नाही. तसेच वाढत्या महागाईने नोकरवर्ग अडचणीत आला आहे हेही श्री. चव्हाण ओळखून आहेत. यासाठी त्यांनी कारवाई करण्याचे टाळले होते. वाटाघाटींच्या घोळात संप लांबत चालला की कर्मचारी हळूहळू कामावर येऊन संप बारगळेल हेही गणित केले जात होते. मधल्या काळात कर्मचाऱ्यांना ३५ कोटींपेक्षा अधिक द्यावे असा विचारही शंकररावांचा होता. वसंतरावदादा पाटील, यशवंतराव मोहिते, मधुकरराव चौधरी यांचा त्याला कडाडून विरोध आहे. कर्मचाऱ्यांच्या संपाला काँग्रेसच्या अंतर्गत सत्तास्पर्धेचा वास येथूनच येऊ लागला आहे. 'आपल्यावरही प्रेशर आहे.' असे शंकरराव चव्हाण म्हणाले आहेत. ही प्रेशर्स कोणती हे वेगळे सांगायला नको. माझ्या सहकाऱ्यांच्या मनाविरुद्ध आपण काही गोष्टी करण्यास तयार होतो; पण कर्मचारी तत्त्वाशिवाय काहीच मान्य करायला तयार नाहीत असेही मुख्य मंत्री म्हणाले आहेत. त्यांच्या या विधानांतून मंत्रिमंडळातील वरिष्ठ लोकांचा तडजोडीने प्रश्न मिटवण्यास कसा विरोध आहे हे दिसून येते. या संपात यशस्वी तडजोड घडून आली तर त्यामुळे शंकररावांचेच वजन वाढणार आहे, हे या लोकांना होऊ द्यावयाचे नाही. त्याकरता कर्मचाऱ्यांना ३५ कोटींवर एक छदामही द्यावयाचा नाही हीच भूमिका दादा–मोहिते यांनी ताणून धरणे स्वाभाविक आहे. पंतप्रधान श्रीमती गांधी यांच्यामुळे शंकरराव मुख्य मंत्री झाले. आता लगेच शंकररावांविरुद्ध बंडाचा झेंडा उभारला तर ते बंड अप्रत्यक्षरीत्या बाईंविरुद्ध होणार आणि मग दिल्लीश्वरापुढे आपला निभाव लागणार नाही हा हिशोब ! म्हणून संपाची संधी साधून घ्या, ही बेरीज करून राजकीय मोर्चे बांधले जात आहेत. ग्रामीण भागातील जनतेला पुढे करून कर्मचाऱ्यांच्या मागण्यांना विरोध केल्यामुळे शंकररावांविरुद्धची आघाडी असे स्वरूप प्राप्त होत नाही. पण दुसरीकडे संपामुळे शंकररावांचे वजन खच्ची होते. याकरता मंत्रिमंडळ उपसमितीमधील वसंतरावदादा पाटील–यशवंतराव मोहिते यांचा कर्मचाऱ्यांना कडाडून विरोध आहे. संपावरील कर्मचाऱ्यांविरुद्ध कारवाई करावी असा आग्रह काही मंत्री धरत आहेत. सरकारने कारवाई करण्याचा निर्णय घेण्यापूर्वी एक दिवस आधीच शंकरराव चव्हाण म्हणाले, 'सरकार म्हणून सरकारने वागावे अशी अपेक्षा सहकाऱ्यांची आहे. कारवाई करण्याने कटुता वाढेल व कटुता टाळून शंकररावांना मार्ग काढावयाचा होता. कर्मचाऱ्यांनी कामावर येण्यासाठी प्रथम ९ मे ही तारीख जाहीर करण्यात आली. त्यानंतर मी शंकररावांना भेटलो आणि आता संप बेकायदेशीर म्हणून घोषित करणार काय असे विचारले होते. शंकररावांनी दिलेले उत्तर त्यांच्या प्रामाणिकपणाचे निदर्शक होते. 'संप हा बेकायदेशीरच असतो; पण संप बेकायदेशीर असल्याचे घोषित केले की संपनेत्यांना अटक करणे,

पृष्ठ १३ वर



# बातचीत

# प्रिया तेंडुलकर

' मला वाटतं, दिग्दर्शक किंवा छायालेखक ह्यांना क्रिएटिव्हिटी दाखवायला जास्त वाव असतो. आणि-टु बी व्हेरी फँक, माझा पिंड काहीसा ' बॉसिंग 'चा आहे. दिग्दर्शक आदि मंडळींना ' बॉसिंग ' करायचा चान्स अधिक असतो.

## एक मुलाखत
## सुभाष सोनवणे

प्रिया तेंडुलकरनं मुलाखत द्यायचं कबूल केलं खरं; पण आमची भेट झाली तेव्हा सलामीलाच ती म्हणाली – ' मुलाखतीच्या संदर्भात माझ्याकडून कदाचित निराशा होईल. कारण नव्या असाइन्मेंट्स् माझ्याकडे काहीच नाहीयेत. '

– ' नसू देत. काही हरकत नाही. आता तशी माझी अपेक्षा होती की, ' अंकुर 'पासून एव्हाना तुझ्या हातात पाचपन्नास पिक्चर्सचे करार असतील ' –

– ' ऑफर्स होत्या. पण अनेक कारणांनी त्या मटेरिअलाइझ् झाल्या नाहीत– '

– ' कोणती कारणं ते सांगशील का ?'

– ' मला आधी माझा जे. जे. मधला चित्रकलेचा कोर्स पूर्ण करायचा आहे. शिवाय एवढ्यात कर्मशिअल चित्रपटव्यवसायात गुंतून पडण्याची माझी फारशी इच्छा नाहीय. तशी चांगल्यापैकी भूमिका घेऊन माझ्याकडे अजून कुणी आलेलंही नाही आणि ' खून–खून 'च्या पठडीतल्या भाराभर चित्रपटांत कामं केलीत तरी त्यात मला खरं समाधान मुळीच वाटणार नाही. सगळ्यात मुख्य म्हणजे फार घाईने आपण नटी वगैरे व्हावं, असं अजून तरी मला मनापासून वाटत नाहीय. '

–' मग ' अंकुर 'द्वारे चित्रपटात शिरलीस तरी कशाला ?'

–' अगदी सहज. निव्वळ मजा म्हणून. ' अंकुर 'चे लेखक-दिग्दर्शक शाम बेनेगल आमच्या बाबांचे दोस्त. सत्यदेव दुबे त्या सिनेमाचे डायलॉग्ज लिहीत होते. ' अंकुर ' मधली माझी भूमिका आधी दुसरीच एक मुलगी करणार होती. ऐन वेळी काही कारणांनी ती अॅव्हेलेबल झाली नाही. सत्यदेव दुबेंनी, बेनेगलनी ' काम करतेस का ' म्हणून मला विचारलं. कलाविष्काराच्या एका नव्या माध्यमाचा अनुभव घ्यायची संधी मिळतेय, म्हणून मी ' अंकुर 'मधला रोल स्वीकारला–' बोलताना प्रिया हातातल्या पुस्तकाशी खेळत होती. मी ते पुस्तक पाहायला मागतो. ती सॉमरसेट मॉमची मला खूप आवडलेली कादंबरी असते–' द मून अँड सिक्सपेन्स '–एका झपाटलेल्या चित्रकाराच्या जीवनावरची–चार्लस् स्ट्रिकलँड !–मला मॉमचाच आणखी एक नायक आठवतो–' द लोटस ईटर 'मधला–काप्री बेटांच्या सौंदर्यानं वेडावलेला–पिसाटलेला ! आणि मॉमच्या त्या कलावेड्या–सौंदर्यासक्त –झपाटलेल्या व्यक्तिरेखांशी कुठे तरी जवळचे नाते सांगणारी एक चित्रकार, एक अभिनेत्री, कलाविष्काराच्या नवनव्या माध्यमांचा अनुभव घेऊ पाहणारी एक प्रतिभाशाली कलावंत, एक कवयित्री माझ्यासमोर बसलेली असते–प्रिया तेंडुलकर !

–' तुझ्या ' अंकुर ' ह्या चित्रपटाच्या निमित्ताने तुला मिळालेला ' खास पहिला ' असा काही अनुभव ?'

–' तसा काहीच नाही–' प्रिया उत्तरते– ' कारण एक तर माझा रोल अगदी छोटा होता. मला कॅमेऱ्यासमोर उभं राहताना भीती वगैरे वाटत नाही, मी कॉन्शस–बिन्शसही कधीच झाले नाही, त्यामुळे फगगतीचा काय किंवा थ्रिलिंग काय, सांगण्यासारखा असा अनुभव माझ्याजवळ काहीच नाही. इट् ऑल् ॲपिअर्ड जस्ट व्हेरी नॉर्मल टु मी... '

प्रिया काही जरी म्हणाली तरी तिचा ' अंकुर 'मधला रोल अगदीच आलतू–फालतू नाहीय असा किती तरी चांगल्यापैकी रोल असलेला पहिला पिक्चर हा काही तरी भलताच फँटॅस्टिक अनुभव असतो असे मला वाटते, किंबहुना तसा तो असावा, ही माझी अपेक्षा आहे त्या विषयावर बोलताना संबंधित कलाकार उत्साहाने ओसंडत, खूप उत्तेजित स्वरात अन् खूप काही बडबड करील असेच कोणालाही वाटेल. प्रिया मात्र का कुणास ठाऊक, बोलताना फार ' कोरडी ' वाटली. तिच्या पहिल्यावहिल्या पिक्चरची काही स्टिल फोटोग्राफ्स्सुद्धा तिच्याजवळ नाहीत, ह्याचे तर मला फारच आश्चर्य वाटले. ती स्वतःपासूनच काहीशी अलिप्त होऊन बोलतेयसे वाटले. विजय तेंडुलकर काहीसे ' रिझर्व्हड् ' वाटतात, प्रियाही तशीच वाटली–नाही, ती तशी आहेच.कारण मध्यंतरी ती एक–दोन मिनिटे आत गेली होती, तेव्हा तिची मोठी बहीण सुषमाला मी बोललो–' ही रिझर्व्हड् वाटते, ' तर सुषमा ' हो ' म्हटली. प्रियाच्या ह्या काहीशा तुटकपणाचा कोणी उतावळेपणाने अर्थ काढून पाहिला, तर ती ' शिष्ट ' आहे असे कदाचित अनुमान निघेल. पण माझा सुरुवातीचा तो कयास चूक असल्याचे मला जाणवले. कारण

प्रियाच्या बाबतीत मला गंमत दिसली की, ती एका परीने अबोल आहे आणि त्याचबरोबर बोलकीसुद्धा आहे. मधूनच ती हातचे राखून बोलत असल्यासारखी वाटते, तर काही वेळा अगदी मनमोकळेपणाने बोलते! हा मजेदार विरोधाभास शब्दांत नेमका सांगता येणे कठीण आहे, त्यासाठी तिच्याशी प्रत्यक्ष बोलूनच पाहायला हवे.

मुलाखतीचा धागा पुन्हा पकडत मी प्रियाला विचारले–'तू मघा म्हणालीस की, आपण खूप ग्रेट नटी व्हावं असं निदान अजून तरी तुला वाटत नाहीय. पण मग तुझ्या टॅलेंट्स्–ज्या निर्विवादपणे मान्य झाल्या आहेत–त्या वाया जातील ना! त्याचं काय?'

–'अभिनेत्री व्हावं असं मला नेहमीच वाटत आलंय. पण 'नटी' व्हायचं ही अँबिशन असल्यावर अनेक गोष्टी जमाव्या लागतात. बऱ्यापैकी भूमिका मिळावी लागते. बऱ्याच खटपटी कराव्या लागतात. ते माझ्याकडून जमणं तसं कठीण आहे. 'अभिनय' ही गोष्ट मला नेहमीच करावीशी वाटते, तीच एक गोष्ट आहे की जी मी खरोखर करू शकते, करू इच्छिते. बट आय् अॅम् नॉट् क्रेझी टु बिकम अॅन् अॅक्ट्रेस. तेवढे पेशन्स माझ्यात आहेत. आय् अॅम् रेडी टु वेट्. आणि टॅलेंट्स्‌विषयी सांगायचं तर मी अन्य माध्यमांतूनदेखील त्यांचा वापर करू शकेन. चित्रपटात अभिनयापेक्षा खरं तर दिग्दर्शन वा छायाचित्रणाचं क्षेत्र मी अधिक पसंत करेन. माझा जे. जे. मधला कोर्स संपल्यावर कदाचित मी दिग्दर्शन–फोटोग्राफी ह्यांचा अभ्यास करेन.'

'प्लॅन चांगला आहे. पण दिग्दर्शन किंवा छायाचित्रण ह्यांचं आकर्षण अभिनयापेक्षा जास्त वाटण्याचं कारण?'

'मला वाटतं, दिग्दर्शक किंवा छायालेखक ह्यांना क्रिएटिव्हिटी दाखवायला जास्त वाव असतो. आणि टु बी व्हेरी फ्रँक, माझा पिंड काहीसा 'बॉसिंग'चा आहे. दिग्दर्शक आदि मंडळींना 'बॉसिंग' करायचा चान्स असतो. नटनट्यांकडून दिग्दर्शक आपल्याला हवं ते, हवं तसं करून घेऊ शकतो. पर्सनली मला 'बॉसिंग' आवडतं!'

ही उण्यापुऱ्या सतरा–अठरा वर्षांची मुलगी अशी, वरकरणी जरा विचित्र वाटणारी विधाने इतक्या सडेतोडपणे आणि जेन्युइनली करते की खरोखर कमालच वाटते. प्रिया पुढे सांगते– 'मला फोटोग्राफीत विशेष इंटरेस्ट आहे. 'अंकुर'च्या निमित्ताने दिग्दर्शन– छायाचित्रण ह्यांच्याविषयी मला बरंच शिकायला मिळालंय. तसंच 'सामाना'च्या शूटिंगला बाबांबरोबर मी काही दिवस होते. त्या वेळीही थोडंफार शिकता आलं आणि शिवाय बाबा मला कॅमेरा वापरायला शिकवत असतातच.'

–'म्हणजे एकूण सिनेमाच्या संदर्भात अभिनयापेक्षा अन्य क्षेत्रात तुझी प्रतिभा–सृजनशीलता अधिक जोपासली जाईल असं तुझं म्हणणं आहे. नाटकाच्याही बाबतीत तुझं हेच मत आहे का?'

–'नाटक आणि चित्रपट ह्या माझ्या दृष्टीने खूप जवळच्या, अगदी सूक्ष्म फरक असणाऱ्या कला आहेत. तथापी सिनेमापेक्षा नाटकात भूमिका करणं मला अधिक पसंत आहे. अर्थात नाटकाची इतर अंगे– दिग्दर्शन, नेपथ्य करणेही मला आवडेल. पण त्यासाठी फार मोठ्या अनुभवाची गरज आहे. मला त्यासाठी खूप शिकावं लागेल. परंतु माझ्या ह्या सगळ्या बोलण्याचा अर्थ असाही नाही की मी भूमिका अजिबात करणारच नाही. उलट, अभिनय आय् मस्ट डू. मनापासून आवडल्या, कराव्याश्या वाटल्या तर मी सिनेमा– नाटकांतून भूमिका करणारच आहे.'

'कळी एकदा फुलली होती–' हे प्रियाचे व्यावसायिक रंगभूमीवरचे पहिले नाटक. त्यातल्या तिच्या भूमिकेचे खूप कौतुक झाले आणि तेव्हापासून, आजच्या मराठी रंगभूमीवरच्या, अभिनयाची उत्कृष्ट जाण असलेल्या मोजक्याच नवोदित अभिनेत्रींमध्ये तिचा क्रम अपरिहार्यपणे खूप वर आहे. मी तिला विचारले– 'तुझ्या 'कळी'मधील कुशल अभिनयामुळे तुला इतर नाटकांतून कामे करण्याबद्दल विचारणा झाली असेल–'

–'हो, बऱ्याच नाटकांसाठी बोलावणी होती. सध्या भक्ती बर्वे करतेय् ती 'अखेरचा सवाल'मधली नंदूची भूमिका मी करावी अशीच योजना प्रथम होती–'

–'मग तू त्या ऑफर्स का नाकारल्यास? 'अखेरचा सवाल'मध्ये तर तुला चांगलाच स्कोप होता.'

–'त्या वेळी 'कळी'चे प्रयोग चालू होते. एकाच वेळी दोन–तीन नाटकांतून कामे करायची म्हणजे तारखांची जुळवाजुळव, नेहमीचे दौरे, जागरणं वगैरे असंख्य प्रकरणं उद्‌भवतात आणि कोठल्याही परिस्थितीत जे. जे. मधल्या कोर्सकडे शक्यतो दुर्लक्ष करणं किंवा दुर्लक्ष होणं मला आवडलं नसतं–' प्रिया म्हणते. मधेच प्रियाची आई मोलकरणीला काही सांगण्यासाठी गॅलरीकडे जाते आणि जाताना सांगते– 'शिवाय त्या वेळी प्रियाची तब्बेतही बरी नव्हती. त्यामुळे तिला जास्त त्रास झेपला नसता–'

–'मघाशी मी 'अंकुर'बद्दल विचारलं. तसंच 'कळी'बद्दल विचारतो. ह्या तुझ्या पहिल्या व्यावसायिक नाटकाचा काही विशेष अनुभव?'

पुन्हा त्या मघाच्याच तटस्थ पवित्र्यात, अगदी बॅलन्सड मूडमध्ये प्रिया उत्तरते– 'खास काही नाही. माझ्या पूर्वीच्या अव्यावसायिक नाटकांपेक्षा काहीच वेगळा अनुभव मला आला नाही. पूर्वी ज्या मेहेनतीने, जेवढं मनःपूर्वक आणि प्रामाणिकपणे इतर भूमिका केल्या होत्या, त्याच आत्मीयतेने मी 'कळी' मधली भूमिका केली. आपण फार वेगळं किंवा विशेष असं काही करतो आहोत असं मला वाटलंच नाही–'

–'ते नाटक व्यावसायिक होतं तरी तुला काहीसुद्धा वेगळेपणा जाणवला नाही?'

–'नाही. 'कळी...' हे नाटक व्यावसायिक आहे, हेसुद्धा खूप दिवस मला माहितच नव्हतं–'

–'तू त्यात नाइट बेसिसवर, पैसे घेऊन काम करत होतीस ना?'

–'होय–'

हे बोलणं चालू असताना प्रिया अगदी छोटीशी, भाबडी, अजाण मुलगी वाटली, म्हणजे तिच्या वयाच्या मुली वाटाव्यात तशीच वाटली. त्या मुलींना पुष्कळ गोष्टी माहीत नसतात. अगदी स्वतः अनुभवत असलेल्या गोष्टींचाही अर्थ त्यांना नक्की माहीत नसतो आणि त्यांचा हा 'माहीत नसणेपणा' 'कळत नसणेपणा' 'भाबडेपणा' खूप गोड वाटतो. प्रिया अशी तिच्या वयाची क्वचित्–अधूनमधून वाटते. एरवी मात्र तिच्या चेहेऱ्यावर एक गंभीर, प्रौढ भावना सतत पसरलेली दिसते. परखड समीक्षकाचा चष्मा चढवल्या-

सारखी दिसते ती !

—'तुझ्या अभिनयसाधनेची परंपरा सांग ना—तू 'कळी' पर्यंत किती अन् कोणकोणत्या नाटकांतून कामं केली आहेस ?'

—'परंपरा अशी फारशी नाहीच. लहानपणापासून शाळेतल्या नाट्कल्यांतून मी कामं करीत असे. नरेंद्र बल्लाळांच्या बालनाटचांतही लहान-सहान भूमिका मी केल्या. माझ्या दृष्टीने, मी खऱ्या अर्थाने विशेष भूमिका केलेली नाटकं म्हणजे सायदेव दुबेंनी बसविलेलं हिंदी 'हयवदन' आणि बाबांच्या 'अशी पाखरे येती—' चं कानडी रूपांतर—'

—'म्हणजे तुला कानडी येतं ?'

—'त्या नाटकात काम करेपर्यंत एक 'काडु' हा शब्द सोडला तर दुसऱ्या कोणत्याही कानडी शब्दाचा अर्थ मला माहीत नव्हता !'

—'काऽय ?' मी टुणकन हवेतच उडतो!

—'इट् इज् ए फॅक्ट !'

—'मग तुला ते जमलं कसं ? मुळात कानडीच येत नसताना तू कानडी नाटकात काम केलंस तरी कसं ?'

—'अनंत नागरकट्टी (अनंत नाग) हे 'अशी पाखरे...'चं कानडी रूपांतर बसवीत होते. त्यांनी मला विचारलं, 'काम करशील का नाटकात ?'— ते नाटक मला सगळं, अगदी चांगलं माहीत होतं; पण कानडी कुठं येतंय ? तरी त्या नाटकात काम करायचं मी ठरवलं. माझे कानडी संवाद मी देवनागरी लिपीत लिहून घेतले, आणि पाठांतर सुरू केले. मराठी नाटक मला पूर्णपणे माहीत असल्यामुळे, प्रत्येक कानडी शब्दाचा नेमका अर्थ समजत नसला, तरी एकूण संदर्भानुसार मी त्या—त्या वाक्यांचा अभिप्रेत अर्थ घेत असे आणि तसा तो तालमींतून देतही असे—'

प्रियाने ह्यासाठी किती दिवस घोकंपट्टी केली असेल, आणि त्या कानडी नाटकाच्या तालमी किती दिवस चालल्या असतील ह्याविषयी मी मनातल्या मनात मनोरंजक आडाखे बांधून पाहिले; पण मला अंदाज करणे जमेना. तेव्हा त्याबद्दल मी प्रियाला विचारले आणि तिने एकदम अॅटमबॉंबच टाकला—'मी भूमिका स्वीकारल्याच्या एकोणिसाव्या दिवशी आमचा प्रयोग होता !'

काहीशा अविश्वासानेच मी प्रियाला विचारले—'म्हणजे—म्हणजे—तू फक्त अठरा दिवसातच ते पाठांतर केलंस ?'

—'होय !'— आणि मग प्रियाने त्या कानडी नाटकातली काही वाक्ये, मराठी अर्थासह म्हणून दाखवलीत. एखाद्या डमरूमधे किंवा डबड्यामधे छोटे दगड किंवा सागरगोटे घालून तो जोरजोराने हलवला तर जे काही ऐकू येईल— तशी साधारणपणे कानडी भाषा असते ! ती ऐकणे ही एक जबरदस्त शिक्षा आहेच, पण नुसती ऐकण्यापेक्षा स्वत: बोलून पाहाणे ही जास्तच भयानक शिक्षा आहे आणि त्यातल्या त्यात, त्या भाषेचा अजिबात गंध नसणाऱ्याने ती पंधराएक दिवसांत मुखोद्गत करणे हे तर येरागबाळघाचे काम मुळीच नाही. प्रियाच्या ह्या धाडसाबद्दल इतरांच्या प्रतिक्रिया जाणून घेण्याची उत्सुकता मी आवरू शकलो नाही आणि तिला तसे विचारले.

—'काही जण मला हसले. काहींनी वेडचात काढलं'— प्रिया सांगू लागली—'बाबा मला म्हणाले की तू हा जो आटापीटा करते आहेस त्याचा कितपत उपयोग होईल ह्याची मला शंका वाटते. तुझ्यामुळे उगीच सगळचा नाटकाचं नुकसान व्हायला नको—'

—'मग काय झालं त्या नाटकाचं ?'— तेंडुलकरांच्या 'अशी पाखरे...'चा धम्मालपैकी कानडी 'फार्स' माझ्या नजरेसमोर सुरू झाला. पण त्या रंगत चाललेल्या फार्सवर दाणकन् पडदा टाकीत प्रिया म्हणाली— 'दॅट् वॉज् ए सक्सेस ! आमचं नाटक एकदम मस्त झालं. माझ्या कामाची वाखाणणी झाली. वृत्तपत्रांतून माझ्या अभिनयाविषयी चांगले लिहून आले—'

इथे आवर्जून सांगणे भाग आहे की केवळ नाटकात चांगले काम केले एवढचाबद्दलच प्रियाचे कौतुक झाले नाही, तर आणखी वेगळचा संदर्भातही वृत्तपत्रांतून तिचा गौरव झाला होता. प्रियाच्या ह्या कानडी नाटकानंतर 'इंडियन एक्स्प्रेस' मधे 'नॅशनल इंटिग्रेशन' वगैरे-वगैरेवर पत्रापत्री झाली होती हे जाणकारांना आठवत असेलच. 'प्रियाने कृतीने दाखवून दिले आहे की कठीण प्रश्न कसे कलात्मकरीत्या सोडवावे ! भाषाभाषांचा वाद फुकट आहे इ. इ...' अशा आशयाची पत्रे इंडियन एक्स्प्रेसमधे त्या वेळी आली होती.

म्हणजे एकूण काय, की प्रिया तेंडुलकर ही एक भलतीच ग्रेट पोरगी आहे. तिची जिद्द खरोखरच अनुकरणीय आहे आणि त्या जिद्दीला साजेशी अशी अभिनयाची जबरदस्त आणि दुर्मिळ देणगी तिला मिळालेली आहे. 'तू अभिनयाचं काही रेग्युलर शिक्षण वगैरे घेतलं आहेस का ?—' माझा प्रश्न.

—'नाही. पण लहानपणापासून माझ्यावर संस्कार झालेले आहेत. माझी आई मला लहानपणी नाच शिकवीत असे. त्यामुळे मुद्राभिनयातले बारकावे मला तेव्हापासून समजायला लागले. मी पहिल्यापासून नाटकातली प्रत्येक लहानमोठी भूमिका अगदी एकाग्रतेने आणि मन लावून करीत आले आहे—माझ्यातल्या अभिनयकलेचा विकास त्या तन्मयतेमुळेही झाला असावा...'

विजय तेंडुलकर यांचे आजच्या नाटचसृष्टीत स्वत:चे असे एक निश्चित स्थान आहे. त्यामुळे एकंदरीत नाटक ह्या विषयावर बोलताना तेंडुलकरांचा व त्यांच्या नाटकांचा उल्लेख होण्यावाचून शक्यच नव्हते. मी प्रियाला विचारले—' विजय तेंडुलकर ह्या नाटककाराविषयी तुझे काय मत आहे ?'

—'तो खूप म्हणजे खूऽप मोठा, अगदी ग्रेट नाटककार आहे—' इति प्रिया—'तेंडुलकर माझे वडील नसते, तरीही ते मला आत्ता वाटतात तितकेच ग्रेट वाटले असते !'

—'तुला ते इतके ग्रेट वाटतात, ते एक्झॅटली का ?'

—'तेंडुलकर खूप खरं लिहितात. माणसाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोन वेगळा आहे. म्हणूनच ते त्यांच्या पात्रांकडे अगदी वेगळचा दृष्टीने पाहू शकतात. त्या पात्रांबद्दल ते निराळचा मानसिक अवस्थेतून विचार करू शकतात. त्या त्या पात्रांच्या भावनांशी जास्तीत जास्त एकरूप होऊन. आणि तरीही विशिष्ट मर्यादेपर्यंत अलिप्त राहून तेंडुलकर त्या सह-अनुभूतीचे प्रामाणिक आणि स्पष्ट शब्दांत प्रकटीकरण करतात. त्यामुळे त्यांच्या नाटकांतली पात्रे अत्यंत वास्तव वाटतात, अगदी जिवंत वाटतात, आसपास वावरणारी, जाता-येता भेटणारी वाटतात.'

—'मग काय, इतर नाटककार अवास्तव लिहितात ? खोटं लिहितात ? आमच्या तात्यासाहेबांचा 'नटसम्राट' कृत्रिम आहे ? अप्पा बेलवलकराचं दु:ख-दुर्दैव, त्याची व्यथा-वेदना तकलादू म्हणायची का ?'

पृष्ठ ३१ वर

# संप आणि सत्तास्पर्धेचे राजकारण : पृष्ठ ९ वरून

संपावरील कर्मचाऱ्यांविरुद्ध कारवाई करणे या गोष्टी कराव्या लागतात. त्यामुळे कटुता वाढते. मला कटुता वाढू द्यावयाची नाही.' असे शंकरराव म्हणाले होते. आपल्यावर पहिल्या दिवसापासून संप मोडून काढण्यासाठी दडपण होते; पण संप मोडण्याची माझी नीती नाही यावद्दल मला श्रेय द्याल की नाही असाही सवाल शंकररावांनी केला होता. आपल्यावर दडपण असल्याचे ते वेळोवेळी बोलतात! 'वाटाघाटीच्या घोळात संप लांबावा' असेही आपल्याला वाटत नाही असे मुख्य मंत्र्यांनी ३५ कोटींचा आकडा जाहीर केल्यानंतर मला सांगितले होते. याचा अर्थच मुख्य मंत्र्यांना प्रामाणिकपणे काही तरी मार्ग काढावयाचा होता. वसंतरावदादा व यशवंतराव मोहिते यांच्यासारख्या पश्चिम महाराष्ट्रातील मातब्बर नेते व इच्छुकांच्या विरोधात जाऊन त्यांना कारकीर्दीच्या सुरुवातीच्या काळातच दुखावून शंकररावांना मार्ग काढणे राजकीयदृष्ट्या महाग ठरणार असल्यामुळे शंकरराव आपल्या मनाविरुद्ध जाऊन कडक कारवाईचे धोरण स्वीकारीत आहेत.

मधुकरराव चौधरींचाही कर्मचाऱ्यांच्या मागण्यांना विरोध आहे; पण त्यांच्या विरोधामागे राजकीय कारणांपेक्षा स्वतःची प्रतिष्ठा हे कारण आहे. आपण सुरुवातीला अधिक काही देता येणार नाही असे म्हटले आहे. आता कर्मचाऱ्यांच्या मागण्या मान्य केल्या तर त्यांच्या आड केवळ आपणच होतो असे वातावरण होणार आहे असे श्री. चौधरींचे म्हणणे आहे. कर्मचाऱ्यांच्या मागण्या मान्य केल्या तर या कारणासाठी श्री. चौधरी यांनी बाजूला होण्याची तयारी दर्शवली होती असेही सचिवालयात मध्यंतरी ऐकू येत होते.

शंकररावांनी सुरुवातीलाच जे धोरण स्वीकारले व जी धडाडी दाखवली आहे त्यामुळे त्यांचे वाढणारे वजन खच्ची करण्यासाठी मंत्रिमंडळातील त्यांचे काही सहकारी संपाचा राजकीय उपयोग करून घेत आहेत. तो करून घेताना मात्र ते राज्याची आर्थिक परिस्थिती, ग्रामीण भागाच्या योजना, ग्रामीण जनता यांच्या हिताची ढाल पुढे करीत आहेत. या ढालीमुळे संप लांबून तो बारगळला तर कर्मचाऱ्यांतील असंतोषाने शंकररावांना कर्मचाऱ्यांचे सहकार्य मिळणार नाही आणि मागण्या मान्य होऊन संप यशस्वी झाला तर ग्रामीण जनतेच्या हिताच्या विरोधात जाऊन शंकररावांनी मागण्या मान्य केल्या तर त्याचा परिणाम ग्रामीण जनतेवर होणार असे भासवून शंकररावांविरुद्ध ग्रामीण भागात वातावरण निर्माण करावयाचे व त्याच्या जोरावर शंकररावांची कारकीर्द लवकर संपवण्याचा डाव खेळायचा असे राजकारण खेळले जात आहे.

कर्मचाऱ्यांनी शेंडी तुटेपर्यंत ताणावयाचे की डावपेच म्हणून स्वतःवर मर्यादा घालून घ्यावयाची याचा विचार केला पाहिजे होता. तो केला असता तर संपाचे बारगळणे हे भवितव्य ठरले नसते ! वेतनधोरण ठरेपर्यंत ३ व २ टक्के या सूत्राप्रमाणे महागाईभत्ता घेतला असता तर केंद्रीय दराच्या महागाईभत्त्याच्या ७५ टक्के मागण्या पदरात पडल्या असत्या. पुढच्या वर्षापर्यंत वेतनधोरण ठरणे शक्य नाही. कारण केंद्र सरकारला निवडणुकांचा हिशोब करावाच लागला असता. वेतनधोरणामुळे अनेक क्षेत्रातील हितसंबंध दुखावणार आहेत. निवडणुका तोंडावर असताना सरकार हा धोका पत्करणार नाही. अशा परिस्थितीत राज्य सरकारी कर्मचाऱ्यांना पुढच्या वर्षी केंद्राच्या दराप्रमाणे महागाईभत्त्यासाठी 'शंकरसूत्रा'नुसार कमी पडणाऱ्या २५ टक्क्यांच्या मागण्या पदरात पाडून घेता आल्या असत्या. पुराच्या पाण्याप्रमाणे वाहणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या उत्साहात नेतेमंडळी वाहून गेली आणि त्यांनी केंद्राप्रमाणे महागाईभत्ता मान्य होईपर्यंत संप चालू ठेवण्याचा निर्णय घेतला. कारवाईचा बडगा उगारल्यावर कर्मचारी फार काळ संपावर राहतील हे संभवनीय नाही. हे पाहून ७५ टक्के तत्त्वाच्या मागण्या पदरात पडताहेत व उरलेल्या २५ टक्के तत्त्वासाठी विषय खुला राहाणार होता. त्याचा फायदा उठवून कर्मचारी नेत्यांनी धूर्तपणा दाखवायचा व सरकारवर डाव उलटवण्याची संधी कर्मचाऱ्यांनी सोडली आहे. सर्व मागण्या पदरात पाडून घेण्यासाठी संघटनेच्या सभासदांचा निर्धार जबरदस्त असावा लागतो. प्रतिपक्ष पूर्णपणे अडचणीत आला तर सर्व मागण्या मान्य होऊही शकतात ! पण कर्मचाऱ्यांची तशी अवस्था नाही. जिल्हा परिषद कर्मचारी कामावर जाऊ लागले आहेत. सरकारी कर्मचाऱ्यांत कारवाईच्या अस्त्रामुळे चलबिचल झाली आहे. अशा अवस्थेत प्रतिपक्ष कोंडीत सापडणे शक्य नाही. त्यामुळे संपूर्ण मागण्या मान्य होईपर्यंत संप चालणार नाही ही वस्तुस्थिती मान्य करावीच लागेल. डावपेच म्हणून केंद्रीय महागाईभत्त्याच्या ७५ टक्के महागाईभत्ता पदरात घ्यावयाचा त्याचबरोबर इतर मागण्यांबाबत सरकारला तडजोड करायला लावायची आणि उरलेल्या २५ टक्के महागाईभत्त्याच्या मागणीसाठी पुढच्या वर्षी दंड थोपटून उभे राहायचा हा पवित्रा शहाणपणाचा ठरला असता ! परंतु ९ मे रोजी विधानसभेवर कर्मचारी, त्यांची कुटुंबीय मंडळी यांचा प्रचंड मोर्चा (५० हजारांचा मोर्चा होता. हा वरिष्ठ पोलीस-अधिकाऱ्याचा आकडा) निघाला. त्यावरून अखेरपर्यंत संप लढविता येईल हा नेत्यांचा हिशोब चुकीचा ठरण्याची भीती आहे. प्रचंड मोर्चे निघतात; पण अशा मोर्च्यांनी लढे दीर्घकाळ चालतात असा अनुभव नाही. मोर्च्याला येणारे एक दिवसासाठी पुढे येतात. सततच्या संघर्षाला त्यांची तयारी झालेलो नसते !

सरकारनेही एक युनियन फोडण्यासाठी दुसऱ्या युनियनला वाढवण्याचे पातक करू नये. कारण अशा तऱ्हेने वाढवलेल्या युनियनला ताकद येताच तीच सरकारशी दोन हात करते हा सध्याचा अनुभव आहे. सरकारी कर्मचाऱ्यांत पूर्वी समाजवाद्यांची संघटना होती. ती फोडण्यासाठी सध्याच्या महासंघाच्या नेत्यांना त्या वेळचे मुख्य मंत्री यशवंतराव चव्हाण यांनी हाताशी धरले होते. या नेत्यांना युनियनच्या कामात मदत करावी अशी पत्रे जिल्हाधिकाऱ्यांना पाठवण्यात आली होती. शेवटी हे प्रकरण विधानसभेत उपस्थित झाले होते. युनियन फोडण्यासाठी ज्यांना उभे केले त्यांना खरे सामर्थ्य प्राप्त होताच सरकारशी त्यांनी संघर्ष छेडला आहे. ओंकारांच्या समन्वय महासंघाला राजाश्रय देऊन महासंघाला फोडण्यात सरकार एकवेळ यशस्वी झाले तरी त्यांना खरे सामर्थ्य प्राप्त होताच तेही सरकारविरोधी लढा पुकारतील ! म्हणून संघटना फोडण्याचे भांडवलदारी तंत्र सरकारने अवलंबू नये ! त्यात सरकारची शान नाही ! समाजवाद्यांची संघटना फोडण्यासाठी झालेल्या प्रयत्नाला शेतकरी-कामगार पक्षाचे सरचिटणीस एन. डी. पाटील यांनी विधिमंडळात वाचा फोडली होती ! □ □

# सोलकढी

## □ चकणा डोळा हे स्वभाववैशिष्टच !

आपले हे जग माणसांसाठी आहे हे निश्चित झाले तेव्हापासून माणसांनी 'माणसा'चे स्वरूप शोधायचा खटाटोप चालवला आहे. त्यातूनच 'माणसा'च्या एकानेक व्याख्या करायचे धाडस काहींना करावेसे वाटले. कोणी म्हटले, माणूस हा बुद्धिवादी प्राणी आहे; कोणाला वाटले, माणूस हा कळप करून राहणारा प्राणी आहे; माणूस हा अर्धा दानव आणि अर्धा देव आहे, असे कोणी मानले; माणूस हा कपडे घालणारा आणि (प्रसंगी) कपडे काढणारा प्राणी आहे, असे त्याचे वर्णन कोणी केले; कोणी, तो हसणारा प्राणी आहे, असा त्याचा गंभीर गौरव केला आहे. मला अर्थातच 'माणसा'बद्दल वेगळे काही सांगायचे आहे. माझ्या मते, माणूस हा हसणारा नव्हे तर हसवला जाऊ शकणारा प्राणी आहे.

तो हसायला टपलेलाच असतो. पण म्हणून तो उगाच हसत सुटत नाही. कोणी हसवले तरच तो हसतो. ( मराठी माणसाची यालाही तितकीशी तयारी नसते. ) हसवणारी माणसे एकूण कमीच असतात. महाराष्ट्रात तर ती फारच कमी आहेत, असे मला जाहीरपणे वाटत नसले तरी खाजगीत वाटते. बुधवार दिनांक १४ मे १९७५ रोजी मृत्यू पावलेले दामुअण्णा मालवणकर अशा माणसांपैकी एक होते.

दामुअण्णांच्या नाटकातल्या भूमिका मी फारशा पाहिल्या नाहीत. ज्या पाहिल्या त्यात त्यांनी बरी गंमत केली होती. पण मराठी नाटकातल्या विनोदी भूमिका स्वभावसंपन्न नसतात; त्या लक्कबबाज असतात आणि दामुअण्णांजवळ तर त्यांचा चकणा डोळा होता. पण चकणा डोळा हे दामुअण्णांचे व्यंग नसून स्वभाववैशिष्ट्य होते. ते कळायला त्यांचे चित्रपट पाहावे लागले. 'सरकारी पाहुणे', 'लग्न पाहावं करून', 'ब्रह्मचारी,' 'ब्रँडीची बाटली' इत्यादी चित्रपटात दामुअण्णा मालवणकर ( आणि विष्णुपंत जोग ) यांनी जी विनोदी धमाल करून सोडली ती मराठी चित्रपटसृष्टीच्या इतिहासात अनन्यसाधारण आहे. अहो, मीनाक्षीच्या बरोबरीने आम्ही, त्या वयात, या काकाक्षी माणसाचे स्मरण करायचे, यात सगळे आले.

चकणा डोळा दुरुस्त करायचे तंत्र निघाल्यापासून चकणे डोळे पाहायला मिळेनासे झाले आहेत. त्यामुळे त्या दुरुस्ताक्षी माणसांचे भलेच झाले असेल. आम्ही मात्र दामुअण्णा मालवणकरांची हस्सल आठवण व्हायचे आमचे एक हुकमी साधन गमावून बसलो आहोत. ◻

## □ तोंडचे मासे पळाले

माझ्या लहानपणी मुलांची प्रकारवारी आजच्यापेक्षा वेगळ्या रीतींनी होत असे. स्कॉलर आणि शंख वा ढ मुले, श्रीमंत आणि गरीब मुले, संघात जाणारी आणि राष्ट्रसेवादलात जाणारी मुले, केसांचा भांग पाडणारी मुले आणि न पाडणारी मुले असे मुलांचे प्रकार पडायचे. या प्रकारांबरोबर, खाणारी मुले आणि न खाणारी मुले, असाही एक पक्का प्रकार असे. खाणारी म्हणजे मासेमटण खाणारी आणि न खाणारी म्हणजे मांसमच्छर न खाणारी.

मी न खाणारा होतो. त्याचा नाकउडवा अभिमान वगैरे वाटायचा. न खाणारे सोज्वळसात्त्विकमंगलपुण्यवानशुचिर्भूतम् असतात असे आतल्या आत जाणवायचे. न खाऊन आपण धर्मरक्षण करतो आहोत, अशी समजूत होती. न खाणारी मुले स्कॉलर असतात असा बभ्रा होता. स्वातंत्र्य मिळाल्यावर हळूहळू या कल्पना पातळ झाल्या. वातावरण बदलले. शंख वा ढ मुले कुठे गेली कुणास ठाऊक. भांग सगळीच पाडू लागली. संघात आणि राष्ट्रसेवादलात जाणारी मुले नाक्यावर जाऊ लागली. सगळीच सगळे खाऊ लागली. घोडा होत होत अखेर मी या देशाचा जबाबदार नागरिक झालो तेव्हा जिभेची बंधने बरीच ढिली झाली होती. मांसमच्छर न खाणारा मी आता मासेमटण चवीने चापू लागलो होतो. इतकेच नव्हे तर मला त्याचा नाकउडवा अभिमान वगैरे वाटायला लागला. आपण पुरोगामी आणि उदारमतवादी आहोत, असे मला आतल्या आत जाणवू लागले. खाऊन खाऊन आपण लोकशाही बळकट करतो आहोत, अशी माझी समजूत झाली.

खाण्याचा हा राजसामाजिकीय संदर्भ सोडा; त्या प्राणिज खाद्याशी माझी एकदम गहिवरगट्टी जमली. त्यातसुद्धा मत्स्यवर्गाचे माझ्याशी काही (वेगळे–नव्हे) आगळेच नाते जुळले. आपण मासे खाल्ले नाहीत तर मासे हिंपुटी होतील अशी श्रद्धा जमा झाली. नव्या नव्हाळीच्या पहिल्या काही वर्षांत मी माशांना हिंपुटी व्हायची संधी दिली नाही. पण विघ्नसंतोषी दैवाला हे पाहवले नाही हेच खरे. बाजार महाग झाला. ब्राह्मणांनी तो महाग केला, हा सिद्धांतसुद्धा शिळापाका झाला. बर्फामुळे मासे पारोसे झाले. घासलेट पिऊन ओवशांना एक नवी बेचव प्राप्त झाली. वेगवेगळ्या पातळ्यांवरच्या प्रदूषणामुळे, पाण्यातले मासे आणि पाण्याबाहेरचे (बाजारातले) मासे, असे माशांचे दोन वर्ग झाले.

माझ्या तोंडचे पाणी पळाले आणि मासेही पळू लागले. एक दिलासा होता बोंबलांचा. बोंबिल बरे मिळायचे. शिळे-ताजे सहज ओळखू यायचे. पुन्हा स्वस्त. लसूण-हिरव्या मिरचीचे कालवण करा. पोपट-भुजणे करा; नुसते तळा किंवा भजी करा. खाताना जिभेवर, मुखात आणि हृदयांतरी जो संतोष पैदा होतो त्याचे समर्पक वर्णन होऊ शकत नाही. बोंबिल हा मऊ आणि गिळगिळीत मासा असल्यामुळे काही जणांना तो आवडत नाही. सुख नेहमीच अमऊ आणि अगिळगिळीत असते अशी त्यांची संकुचित समजूत असावी. बोंबलांना 'गटगटे' असेही एक नाव आहे हे त्यांनी लक्षात घ्यायला हवे. असो. बोंबिल हा खास मुंबईचा– मुंबईच्या अरबी समुद्रातला मासा म्हणून त्याला 'बॉम्बे डक' म्हणतात. (जुन्या काळातला लघुनिबंधकार असतो अथवा आत्ताच्या काळातला, साप्ताहिकात एखादे लोलललित सदर चालवणारा, नवनवोन्मेषशाली सदरकार असतो तर 'बॉम्बे डक'आणि 'बॉम्बे' यांच्यातले स्वभावसाम्य कसे रोकडे दाखवून दिले असते.)

या अप्रतिम बॉम्बे डकवर संकट येऊ घातले आहे अशी पक्की बातमी परवा वर्तमानपत्रात वाचली आणि हवालदिल झालो. गेल्या काही वर्षात सोसाहव्यासाने बेसुमार बोंबिलमारी केल्यामुळे दिवसेंदिवस बोंबलांचे पीक कमी येऊ लागले आहे. शिवाय तरुण आणि अतयार बोंबिल पकडायची हडेलहप्पी आदतसुद्धा नडते आहे. असे केल्यास पाप लागते एवढेसुद्धा संबंधितांना समजू नये, अं? मोठ्या भोकांची जाळी वापरून बारीक बोंबलांना जीवदान देणे आणि वेतकाळात बोंबिलमारी टाळणे, असे प्रभावी उपाय आहेत असे ऐकतो; बोंबिल खाताना ते आठवत राहतो. सध्या, बोंबिल खाताना होणाऱ्या संतोषात, ते आता हळूहळू दुर्मिळ होत जाणार याबद्दलची हळहळ मिसळून एक वेगळी उत्कटता प्रत्ययाला येते आहे.

असे एकएक खाणे लोपता लोपता शेवटी दातओठ खाणे बाकी उरेल. त्यानेसुद्धा इमानी पोट आपले भरतेच. वर यथास्थित ढेकरादेखील येतात.

–अनंतराव

।। गुजरातेतून ।।

।। चंद्रशेखर ।।

# निवडणूक संदर्भात राजकीय पक्षांना येथील युवाशक्तीचा विचार करावा लागेल....

एक तळपती संध्याकाळ– सात वाजून गेले तरी ऊन आपले मी म्हणतेच आहे. धामाधूम होत, सुसाट वेगाने येणारी वाहने चुकवीत मी रस्ता क्रॉस करतो. आज मनीषी जानीची ॲपॉईंटमेंट घेतली आहे. परवा त्याने व त्याच्या पाचपंचवीस सहकाऱ्यांनी संस्था काँग्रेस व जनसंघ यांच्या कार्यालयासमोर निदर्शने केली. धोती काय, साडी काय आणि टोपी काय सारे सारखेच असे त्याचे म्हणणे होते. या निदर्शनांना येथील वृत्तपत्रांनी चार ओळींची प्रसिद्धी दिली.

बांकुरा रेस्टॉरंट हे नेहरूब्रिजजवळचे एअरकंडिशण्ड हॉटेल! मनीषीचा रोजचा बसण्याचा अड्डा. त्याचा आणखी एक रोजचा अड्डा आहे. नटराज थिएटरच्या समोर एच. के. कॉलेजजवळची चहाची गाडी. या चहाच्या गाडीभोवती चहा पिता पिता नवनिर्माण चळवळीची जडणघडण झाली. त्या गाडीला आता क्रांतीपीठ हे नाव पडले आहे. बांकुरात पोहोचलो तेव्हा मनीषी व त्याचा एक 'नवनिर्माण' सहकारी हेमंत देसाई चहा मारीत बसले होते. हातात ब्रिस्टॉल सिगारेटी त्यांच्यात जॉईन झालो. सुमारे दीड तास गप्पा केल्या. नवनिर्माण चळवळ, तिचे यशापयश, सध्याची जनतेची मनस्थिती– निवडणुकांचा रागरंग वगैरे वगैरे.

देशभर ज्याची छायाचित्रे झळकली, परदेशी वार्ताहरांनी ज्याच्या मुलाखती छापल्या, इंदिरा गांधींनी खास बोलावणे पाठवून ज्याच्याशी तासभर अनुनयाचे बोलणे केले ती मनीषी जानी अगदी शांत व्यक्तिमत्त्वाचा, पूर्णपणे बिन–राजकीय व काहीसा हरवल्यासारखा वाटणारा असा पोरसवदा तरुण आहे या वर्षी त्याने एम. ए. ची फायनल परीक्षा तत्त्वज्ञान हा विषय घऊन दिली आहे. पुढे रिसर्च वगैरे करण्याचा विचार. 'प्रोटेस्ट' चळवळीत कायम इंटरेस्ट राहील असे सांगतो. 'संपूर्ण क्रांती' ही कल्पना त्याला आवडते. सध्याच्या चौकटीतील निवडणुकांनी काही साध्य होणार नाही, परत अस्थिरता येईल असे त्याचे भाकीत आहे. गुजरातमधील विद्यार्थीचळवळीच्या सध्याच्या अवस्थेबद्दल नाराजी. नवनिर्माणच्या वेळी पुढारी विद्यार्थ्यांच्या मागे धावत होते. आता विद्यार्थी पुढाऱ्यांच्या मागे धावतात याची खंत.

मनीषीकडे पाहून एवढ्या मोठ्या झंझावाती चळवळीचे नेतृत्व त्याने केले असेल असे वाटत नाही. नवनिर्माणबद्दल तसा अलिप्तपणे बोलतो. ती चळवळ उत्स्फूर्त व रूढार्थाने नेतृत्वविरहित होती असे तो कटाक्षाने सांगतो. ते खरे असावे. गुजरातच्या राजकीय स्थितीची त्याची जाण चांगली आहे– पण त्याच्या विचारात, बोलण्यात एखादा ठाम ध्येयवाद जाणवत नाही. थोडेसे ड्रिफ्टिंगवजा बोलणे वाटते. परत नवनिर्माण होईल काय यावर त्याचे उत्तर 'जरूरत पडी तो हो सकती है'

गुजरातच्या राजकारणात युवाशक्ती पक्केपणाने स्थिर झाली आहे असे मागच्या वेळी म्हटले होते त्याचे प्रत्यंतर अगदी नाट्यमयपणे येत आहे. बडोदा येथे पाच युवा संघटनांनी काँग्रेसपक्षाला सणसणीत दम भरला आहे. गुजरात युवा संघर्ष समिती, बडोदा स्टुडंट्स फेडरेशन, सयाजीगंज महिला व युवक संघर्ष समिती, समाजवादी युवजन सभा व महिला महाविद्यालय स्टुडंट्स ॲक्शन कमिटी या त्या पाच संघटना होत. या संघटनांनी असे बजावले आहे की काँग्रेस उमेदवारांनी जर जीपचे तांडे, पोस्टरे व भाडोत्री प्रचारक

यांच्या रूपाने आपल्या थैली–शक्तीचे (मनीपॉवर) प्रदर्शन केले तर जनता त्यांचा समाचार घेईल. अशा उमेदवारांना वरील पाच संघटना घेरावो करतील, त्यांच्या जीपच्या चाकांमधील हवा काढून टाकतील व घरांवर मतदारांचा निषेध-मोर्चा नेतील. कोणाही उमेदवाराने निवडणुकखर्चाची ३५००० रु. ची मर्यादा ओलांडू नये असे या संघटनांनी आवाहन केले आहे. पोलिसाकडे रीतसर तक्रार नोंदवूनही त्यांनी बघ्याची भूमिका पत्करली तर विद्यार्थी व युवक संघटना उमेदवारांना धडा शिकवतील अशी ताकीद या संघटनांनी दिली आहे.

प्रत्यक्षांत या संघटना काय करतील ते निराळे; पण इतक्या स्पष्ट शब्दांत सत्तारूढ पक्षाच्या मुखंडांना चार शब्द सुनावण्याचे धैर्य येथील विद्यार्थी-युवकांना आहे हे लक्षात घेण्याजोगे आहे. हे धैर्य पैदा केले शांत दिसणाऱ्या, कोणतेहि कर्तेपण नाकारणाऱ्या मनीषी जानी या नवनिर्माण-नेत्याने. त्यांच्या आजच्या काहीशा शांत पावित्र्यात उद्याच्या धमालीची बीजे नसतील असे म्हणता येत नाही.

राजकीय पक्ष व विद्यार्थीसंघटना गंभीरपणे, हिशेबीपणे निवडणुकांकडे पहात आहेत तर काही ठिकाणी काही विनोदी मंडळीहि या निमित्ताने प्रसिद्धी पावत आहेत. बडोदा येथील नॅशनल इंडिया ब्रिगेड या ( आणखी एका ) संघटनेच्या पार्लमेंटरी बोर्डाने दहा जागा लढविण्याचा निर्णय घोषित केला आहे. मुख्यतः जयप्रकाश यांच्या चळवळीस तोंड देण्यासाठी निर्माण झालेल्या या संघटनेचा असा दावा आहे की खुद्द इंदिरा गांधीच त्यांच्या स्फूर्तिदात्या आहेत. इतर कॉंग्रेसपत्रांची संभावना ब्रिगेडवाले "बनावट समाजवादी, सरंजामशाही दादा, थैलीशहा, बडे बागायतदार, भांडवलशाही धार्जिणे कामगारपुढारी" अशा शब्दांत करतात. या ब्रिगेडचे उमेदवार अधिकृत कॉंग्रेस उमेदवारांच्या यशापयशावर कितपत परिणाम करतील हे सांगणे कठीण ! बहुतेक ठिकाणी कॉंग्रेस, जनता फ्रंट व चिमणभाई पटेल यांचा किसान मजदूर-लोकपक्ष अशी चुरस आहे. या तिघांनीहि आपापले उमेदवार निश्चित केले आहेत. सर्वसाधारण लोकांचे मत असे आहे की जनता फ्रंट म्हणजे ग्रॅंड अलायन्सची नवी आवृत्ति आहे. रिपब्लिकन पक्ष व मुस्लीम लीग जनता फ्रंटमधून आताच बाहेर पडले आहेत. जनता फ्रंटच्या तिकिटावर निवडणूक लढवण्याची सर्वात जास्त संधी संस्था कॉंग्रेसला मिळाली आहे. त्या खालोखाल जनसंघ, स्वतंत्र व समाजवादी अशी विभागणी आहे. जागावाटपाबाबत बऱ्याच कुरबुरी झाल्या. विशेषतः अहमदाबाद शहरातील जागांबाबत फार रस्सीखेच झाली.

संस्था कॉंग्रेसला सर्वात जास्त जागा मिळूनहि या पक्षाचे कार्यकर्ते नाराज आहेत. हितेंद्र देसाईंच्या अनुयायांना मोरारजी देसाई यांनी खड्यासारखे वगळले अशा तक्रारी ऐकू येतात. तरीपण अगोदर निवडणुकांपासून अलिप्त राहण्याचे ठरवणारे हितेंद्र देसाई आता प्रचारमोहिमेत भाग घेणार असल्याचे वृत्त आहे. संस्था कॉंग्रेसमधील मतभेदांचा निवडणुकांवर निश्चत परिणाम होईल.

जनता फ्रंटच्या मते चिमणभाईंनी सत्तारूढ पक्षाशी गुप्त हातमिळवणी केली आहे तर काही युवकनेत्यांच्या मते मोरारजी व चिमणभाई यांच्यांत गुप्त करार झाला आहे. किसान मजदूर लोकपक्ष एकूण १८२ जागांपैकी १३२ जागा लढवणार आहे. त्याच्या उमेदवारांपैकी ७५ टक्के उमेदवार नव्यानेच निवडणुकीत उतरत आहेत. जनता फ्रंट व कॉंग्रेस यांच्या मारामारीत, बहुमतासाठी महत्त्वाची ठरेल एवढी आमदारसंख्या आपण मिळवू शकू असा चिमणभाईंचा कयास आहे. याच जोरावर पुन्हां मुख्य मंत्री बनण्याचा मनसुबाहि चिमणभाई करीत आहेत.

कॉंग्रेसच्या बाजूने संभाव्य मुख्य मंत्री म्हणून ज्यांचा उल्लेख होत होता, त्या रतुभाई अडाणींना मुदलात तिकीटच नाकारल्याने कॉंग्रेस गोटात खळबळ उडाली आहे. पक्षाच्या केंद्रीय निवडणूक समितीने, प्रदेश निवडणूक समितीच्या शिफारसीत महत्त्वाचे बदल केले असून, त्यामुळे मुस्लीम स्त्री-उमेदवारांचे प्रमाण वाढले आहे.

कॉंग्रेस पक्षाने क्षत्रियांची मते मिळविण्याकरता खासदार फत्तेसिंहराव गायकवाड यांना विधानसभा निवडणुकीत उभे केले आहे, असे बोलले जाते. कॉंग्रेसच्या प्रचारमोहिमेस पंतप्रधानांपासून सारे मोहरे इरेला घातले जातील. याउलट जनता फ्रंटची प्रचारमोहीम फारशी ग्लॅमरस राहणार नाही. फ्रंटच्या भागीदारांत सध्याच संशयाचे व विरोधाचे वातावरण निर्माण झाले आहे. भालोदचे कार्यकर्ते उघड-उघड फ्रंटमधून बाहेर पडण्याची भाषा करीत आहेत. भालोदच्या अखिल भारतीय मंडळाचे एक सदस्य विनोद दवे यांनी स्वतंत्रपणे उभे राहण्याचा निर्णय घोषित केला असून, मोरारजींविरुद्ध गंभीर आरोप केले आहेत. फ्रंटच्या इतर भागीदारांना (भालोदसहित) असा संशय आहे की, 'अपक्ष' या नावाखाली जनसंघ आपले बरेच कार्यकर्ते उभे करील. युवा संघर्ष समितीचे नियंत्रक मनोज रावळ यांनी अशी जाहीर मागणी केली की, ज्या कार्यकर्त्यांनी जनतेच्या चळवळीत कधीही भाग घेतलेला नाही, अशांची उमेदवारी जनता फ्रंटने रद्द करावी. हे सर्व पाहता प्रत्यक्ष निवडणुकीपर्यंत जनता फ्रंटचे स्वरूप काय राहील, हे सांगणे जरा अवघड आहे. अनेक पक्षांच्या आघाडीमध्ये हे सारे संभाव्य असले तरी मोरारजी यांचे एकांडे व्यक्तिमत्त्व या गोंधळास बरेच कारणीभूत आहे. म्हणूनच लक्ष्मण यांच्या मार्मिक व्यंगचित्रात एक कार्यकर्ता (कॉंग्रेसचा) दुसऱ्याला असे म्हणताना दाखवला आहे की, 'मोरारजींची आपल्याला मदत होईल हे खरे; पण आपणही प्रचार केलाच पाहिजे.'

निवडणुकीच्या संदर्भात राजकीय वातावरण असे संदिग्ध असताना निवडणुकांत आणखी एक संभाव्य अडचण निर्माण होण्याची चिन्हे आहेत. गुजरात राज्य सरकारी नोकरांनी देसाई कमिशनच्या शिफारसी अंमलात आणण्याबद्दल चळवळ सुरू केली असून निवडणूक कार्यवाहीत असहकार करण्याची धमकी दिली आहे. ☐ ☐



# पॅपिलॉन

मूळ लेखक : **हेन्री शॅरियर**
अनुवाद : **रवींद्र गुर्जर**

बरेच मित्र राहात असलेल्या एकशेवीस जणांच्या हॉलमध्ये पॅपिलॉनही सामील झाला. सुरुवातीचे काही दिवस त्याला काम करावं लागणार नव्हतं. नव्या वातावरणातील खाचाखोचा, संभाव्य धोके आणि जुगार यांचं तो जारूकपणे निरीक्षण करू लागला. सुटकेची आशा जवळजवळ सर्व कैद्यांनी सोडूनच दिली होती. पैशाची उलाढाल प्रचंड प्रमाणावर चालत असे. निरनिराळी रॅकेट्स निर्माण झालेली असल्यामुळे कोणत्याही वस्तूची तिथे ददात नव्हती. फक्त त्या तथाकथित 'स्वातंत्र्यात' सुख मानणे, बस्स्! पॅपिलॉनची प्रकृती झपाट्याने सुधारू लागली. सर्व कैद्यांमध्ये त्यानं आदर निर्माण केला. शेवटी त्यानं भंगीकाम पत्करलं. ते काम पहाटेच संपवून दिवसभर त्याला मासे पकडण्यासाठी समुद्रावर जाण्याची परवानगी मिळाली. गव्हर्नरच्या पत्नीची आणि त्याची चांगली मैत्री जमली. पलायनाचे विचार डोक्यात पक्के झालेले होतेच. त्याचीच वाट फक्त तो पाहात होता.

## प्रकरण अठरा : सुटकेची पूर्वतयारी

शेवटी कारबोनेरीनं माझ्या सांगण्यावरून मुख्य वॉर्डरांच्या मेसमधे कोठी-विभाग-प्रमुख म्हणून काम पत्करलं. स्वयंपाकाचं कामही त्याच्याकडेच आलं. तिथे खाद्यपदार्थ शिताफीने चोरून ते कैद्यांना विकायला त्यानं कमी केलं नाही. पण थोड्याच दिवसांत त्या कामाला त्यानं रामराम ठोकला.

हालचाली सुरू करण्याचे दिवस जवळजवळ येत होते. काही आठवड्यांनंतरच बॅरट तिथून निघून जाणार होता. माझ्या वचनातून मी मुक्त होणार होतो. त्याची पत्नी मासे आणि भाज्यांच्या आहारामुळे बारीक झाली होती. त्यांची निघण्याची तयारी होत आली. एक दिवस ती मला म्हणाली, 'पॅपिलॉन, तुझे आभार कसे मानावेत हेच मला समजत नाही. ज्या वेळी तुला जास्त मासे मिळत नसत, तेव्हा पकडलेले सर्व मासे तू मलाच देत आलास. आता माझं वजन तीस पौंड तरी घटलं आहे. कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी मी तुझ्यासाठी काय करू ?'

'मी जर काही मागितलं, तर तुम्हाला देणं जड जाईल. मला एक छोटसंच पण चांगल्यापैकी होकायंत्र हवं आहे !'

'म्हटलं तर हे काहीच नाही पॅपिलॉन, आणि म्हटलं तर खूपच आहे. आम्हाला निघायला आता तीनच आठवडे बाकी असल्यामुळं थोडं कठिण जाणार आहे.'

दोन आठवडे तसेच गेले. तिला होकायंत्र मिळू शकलं नाही. शेवटी ती उदार अंतःकरणाची बाई माझ्यासाठी स्वतः होडी घेऊन 'केयेन'ला गेली. चार दिवसांनी एक उत्कृष्ट होकायंत्रासहितच ती परतली.

मेजर बॅरटनं पत्नीसह सकाळी मुक्काम हलवला. त्याच्याच

दर्जाच्या 'प्रॉयलेट' नावाच्या अधिकाऱ्याकडे त्यानं चार्ज दिला. नव्या गव्हर्नरनंही मुख्य हिशेबनीस म्हणून देगालाच नियुक्त केलं, ही आनंदाची गोष्ट. सर्वांच्या आणि मुख्यतः माझ्या दृष्टीनं ती फारच महत्त्वाची बाब होती. प्रॉयलट हुषार आणि उत्साही होता हे त्याच्या पहिल्याच भाषणात सर्वांच्या ध्यानात आलं. तो म्हणाला, 'आजपासून मी सेलर बेटाचे अधिकार स्वीकारत आहे. पूर्वीच्या गव्हर्नरनं घालून दिलेल्या पद्धती आणि उपाययोजना चांगल्याच होत्या हे लक्षात घेऊन त्यात मी कोणताही बदल करू इच्छीत नाही. तुमची वागणूक जोपर्यंत व्यवस्थित राहील तोपर्यंत सध्याच्या तुमच्या जीवनामध्ये ढवळाढवळ करण्याचं मला काहीही कारण पडणार नाही.'

गेले पाच महिने भराभर निघून गेले होते. बेटावरच्या भ्रामक स्वातंत्र्यात सर्व कैदी अडकून पडले होते. जुगार काय, मासेमारी, गप्पा, नव्या ओळखी आणि मारामाऱ्या यातच सर्वजण दंग होते. वास्तवापासून दूर न्यायला त्या गोष्टी पुरेशा समर्थ होत्या.

पण तरीही त्या वातावरणात मी मिसळून जाऊ शकत नव्हतो. नवा मित्र मिळाला की दर वेळी मी विचार करी, 'याचा आपल्याला पळून जाण्यासाठी उपयोग होईल का? त्याला पळून जायचं नसेल तर तो निदान दुसऱ्या माणसाला मदत तरी करील का?

त्याचसाठी मी जगत होतो--सुटका, सुटका! एकट्यानं किंवा साथीदारांसहित; पण वाट्टेल ते झालं तरी तोपर्यंत स्वस्थ बसायचं नाही. जीन कॅस्टेलीनं सल्ला दिल्याप्रमाणे मी कोणाशीही त्याबाबत बोललो नव्हतो; पण सतत त्याच विचारानं माझ्या मनाची पकड घेतली होती. मी त्यात सफल होणारच. काही दिवसांतच मी या इथे नसेन!

पाच महिन्यांचे अवधीत मला बेटाचा इंचन् इंच माहीत झाला. तराफा बनविण्यासाठी सर्वांत योग्य ठिकाण बागच होती. कारबोनेरीला पुन्हा तेथील काम स्वीकारायची मी विनंती केली. त्यानं ती तात्काळ मान्य केली. या वेळी त्यानं कोणीही मदतनीस घेऊ नये असं ठरलं. अर्थात देगामुळे हे सर्व शक्य झालं. धन्यवाद देगा!

त्या दिवशी सकाळी मी नव्या गव्हर्नरच्या घरावरून परतत होतो. गळाला तांबडे म्युलेट मासे खूप लागले होते. एका कैदी घरगड्यानं तिथे उभ्या असलेल्या काळ्या पण चांगल्या दिसणाऱ्या स्त्रीला सांगितलं, 'हाच माणूस मेजर बॅरटच्या पत्नीला रोज मासे द्यायचा बरं का?' त्यावर ती म्हणाली, 'पॅपिलॉन!' तिनं हाक मारून मला म्हटलं, 'इकडे ये जरा. आत ये. तुला थोडी दारू घ्यायला आवडेल? शिवाय नुकतंच फ्रान्सहून चांगलं चीज आलंय्!'

'नको, मॅडम.'

'का? मॅडम बॅरटकडे तू यायचास, मग माझ्याकडे का नको?'

'कारण त्यांच्या यजमानांची त्याला हरकत नव्हती.'

'हे बघ, पॅपिलॉन; कॅम्पचा मुख्य जरी माझा नवरा असला तरी या घराची मी मालकीण आहे. संकोच न करता वेळाशक आत ये!' मी विचार केला की या सुंदर स्त्रीचा आपल्याला काही उपयोग होईल का तापच होईल कोणास ठाऊक. मी आत शिरलो.

भोजनगृहात तिनं मला ब्रेड आणि चीज दिलं. नंतर कॉफी आणि 'जमेका रम्' दिली. माझ्या समोरच ती बसली होती. 'पॅपिलॉन, आवराआवरीच्या गडबडीतही मादाम बॅरटनं मला तुझ्याविषयी ऐकवलं. तिला एकटीलाच फक्त तू मासे द्यायचास. मलाही तू तसेच देशील अशी माझी समजूत आहे.'

'त्यांना त्याची आवश्यकता होती, पण माझ्या कल्पनेप्रमाणे तुमची प्रकृति तर एकदम धडधाकट दिसते.'

'ते खरं, पण मासे मला फार आवडतात. तू ते विकत नाहीस हे मला माहीत आहे. म्हणूनच मला मागायला संकोच वाटतो.'

शेवटी मी तिलाही रोज मासे आणून द्यायचं मान्य केलं. त्या दिवशीही म्युलेट देऊन टाकलं. मी धूम्रपान करीत असतानाच गव्हर्नर घरी आला.

मला पाहताच तो म्हणाला, 'ज्युलिएट, मी तुला सांगितलं होतं ना, की घरगड्याशिवाय कुठल्याही कैद्याला आत घ्यायचं नाही.'

मी उभा राहिलो, एवढ्यात ती म्हणाली, 'बस. याच्याविषयी बॅरटच्या पत्नीनं मला खूप सांगितलंय्. तुम्ही यात पडू नका! याच्याखेरीज आपल्या घरात दुसरा कोणी येणार नाही. शिवाय हा मला लागतील तेव्हा मासे आणून देणार आहे.'

'ठीक आहे,' गव्हर्नर म्हणाला, 'तुझं नाव काय?'

मी पुन्हा उभा राहणार इतक्यात खांद्यावर हात ठेवून पुन्हा ज्युलिएटनं मला खाली बसवलं. 'हे घर माझं आहे. तुम्ही या घरात गव्हर्नर नाहीत. हे माझे यजमान, प्रॉयलेटमहाशय!' तिनं आधी त्याला आणि नंतर मला ऐकवलं.

'माझं नाव पॅपिलॉन.'

'ओहो! मी तुझ्याविषयी बरंच ऐकलंय खरं! सेंट लॉरेंटच्या रुग्णालयातून पळ काढणारा तूच ना? तू ज्या एका वॉर्डरला आडवं केलंस तो माझा पुतण्या होता!' यावर ज्युलिएट दिलखुलास हसली. 'म्हणजे तूच आमच्या गेस्टनला ठोकलंस काय? असो. त्यामुळे आपल्या मैत्रीत काही बदल होणार नाही बरं का!'

गव्हर्नर अजून उभाच होता. तो मला म्हणाला, 'आजकाल खून आणि खुनी-हल्ल्यांचं प्रमाण पूर्वीच्या मानानं कमालीचं वाढलंय्. याचं कारण काय असावं, पॅपिलॉन?'

'कारण अगदी उघड आहे, गव्हर्नरसाहेब. इथून सुटका करून घेणं शक्य नसल्यामुळे सर्वजण भडक माथ्याचे बनतात. वर्षानुवर्षे सगळे एकत्र डोकी घाशीत राहतात, त्यामुळे त्यांची मैत्री किंवा शत्रुत्व एका टोकाला जाणं साहजिकच आहे. त्याशिवाय, पाच टक्क्यांहूनही कमी खुनांचा तपास लावला जातो, त्यामुळे निर्धास्तपणे खून करायला कोणालाच अडचण पडत नाही.'

'तुझं स्पष्टीकरण रास्त आहे. तू किती दिवसांपासून मासे पकडतो आहेस? कोणतं काम तू करतोस म्हणून तुला ही सवलत मिळलीय्?'

'मी भंगीकाम करतो. सकाळी सहापर्यंत ते काम उरकतं. त्यानंतर मला समुद्रावर जायची मोकळीक आहे.'

'राहिलेला संपूर्ण दिवस?' ज्युलिएटनं विचारलं.

'नाही. बारापर्यंत मला कॅम्पवर परतावं लागतं. पुन्हा दुपारी तीन ते सहा जाता येतं. त्यामुळे फारच त्रास होतो. भरती–ओहोटीच्या बदलामुळे कित्येक वेळा मासे मिळूच शकत नाहीत.'

'तुम्ही याला खास सवलत द्या की, डार्लिंग.' नवऱ्याकडे वळून

ज्युलिएट म्हणाली, 'सकाळी सहा ते सायंकाळी सहा या वेळात त्याला इच्छा होईल तेव्हा समुद्रावर जाता यावं.'

'मान्य !' तो म्हणाला.

मोठ्या खुशीत येऊन मी बाहेर पडलो. मी योग्य संधी साधली होती. कारण दुपारी बारा ते तीन हा वेळ बहुमोल होता. विश्रांतीची वेळ असल्यामुळें या वेळी पहाऱ्यात शिथिलता असायची आणि बहुतेक वॉर्डर्स निद्राधीन व्हायचे. काम तर झकास झालं.

## नव्या हालचाली सुरू

गव्हर्नरच्या पत्नीनं माझ्यावर वर्चस्वच गाजवायला सुरुवात केली. मी जिथे मासे पकडीत असे तिथे गड्याला पाठवून निरनिराळ्या कारणांवरून सर्व 'शिकार' मागवून घेई. काही काही वेळा विशिष्ट माशांचीही ती मागणी करी. ही गोष्ट गंभीर होती, पण त्याचा फायदाही जरूर होई. तिच्या घरी जेवणासही वारंवार निमंत्रण मिळे. मला सन्मानानं टेबलावर खायला घालण्यात तिला आनंद वाटे. श्रीमती बॅरटएवढी हळुवार अंतःकरणाची मात्र ज्युलिएट नव्हती. मोठ्या कौशल्यानं ती माझ्या गतायुष्याबाबत प्रश्न विचारी. तिला ज्यात खास रस वाटत असे त्या गुन्हेगारी जगाविषयी मी फारसा बोलत नसे. बालपण आणि तरुणपण– बस्स्. त्या वेळी गव्हर्नर आतल्या खोलीत डाराडूर झोपलेला असे.

तिच्या अधिकारदर्शक वागणुकीचा मला त्रास होऊ लागला. माझा मलाच खूप राग आला. शेवटी एक दिवस संध्याकाळी मित्रांना मी तो सगळा पाढा ऐकवला. 'प्रकरण गंभीर आहे.' कारबोनेरी म्हणाला, 'ती भवानी तुला भलत्याच खोड्यात अडकवतेय्. तू तिथे कमीत कमी जायला सुरुवात कर किंवा गव्हर्नर घरात असेल तेव्हाच जात जा!' प्रत्येकाचं असंच मत पडलं. मीही त्यानुसार वागायचा निश्चय केला.

एका नव्या कैद्याची ओळख झाली. तो दिवसभर मरमर कष्ट करून पैसे मिळवायचा आणि रात्री सगळे जुगारात उडवायचा. शिलकीचा भाग जवळजवळ शून्यच. दरवेळी तो पैशामुळे अडचणीत यायचा. मी त्याला हाताळायचं ठरवलं.

एक दिवस मोरीत हात धुताना मी त्याला म्हणालो, 'मला तुझ्याशी काही बोलायचंय्. आज रात्री मला मुतारीत भेट. महत्त्वाचं काम आहे.' रात्री आम्ही दोघंच असताना मी त्याला म्हणालो, 'बोर्सेट, आपण एकाच भागातले आहोत हे तुला ठाऊक आहे?'

'नाही! कसं काय?'

'तू व्हॅलेन्सचाच ना?'

'होय!'

'मग मी आर्डिक्चा आहे. आपण एकाच भागातले रहिवासी आहोत.'

'तुला काय सांगायचं होतं?'

'एवढंच– तुझ्या परिस्थितीचा सगळेजण फायदा घेतात हे मला पाहवत नाही. तू ज्या सुंदर सुंदर वस्तू दिवसा बनवतोस, त्या जुगारासाठी निम्म्या किमतीत विकाव्या लागतात. यापुढे तुला पैशाची गरज पडली तर माझ्याकडे येत जा. मी योग्य किमतीत त्या खरेदी करत जाईन. समजलं?'

'चालेल, थँक्स्' बोर्सेट म्हणाला.

त्यानंतर वरचेवर मी त्याला मदत करू लागलो. प्रत्येकाकडून उसने पैसे मागायची त्याला सवयच जडली होती. शेवटी त्याची गाठ 'व्हिसिओली'शी पडली. तो कॉर्सिकन लुटारू होता. माझा चांगला मित्र. बोर्सेट त्याला सातशे फ्रँक देणं लागत होता. त्याच्या मोबदल्यात एक लिहिण्याचं डेस्क द्यावं असा त्याचा विचार होता, पण ते पुरं व्हायला अद्याप अवकाश होता. अशा वस्तू गुप्तपणे करायला लागायच्या. व्हिसिओली आणि मी छोटंसं नाटक करायचं ठरवलं. त्यानं बोर्सेटला सारखा तगादा लावायचा. शेवटी दमदाटीही खूप करायची. 'योग्य वेळी' येऊन मी बोर्सेटची सुटका करायची.

ठरल्याप्रमाणे नाटक पार पडलं. त्यानंतर बोर्सेटची माझ्यावर एकदम श्रद्धा बसली. माझ्या जिवावर त्याला निश्चितपणे राहता येतं यावर त्याचा विश्वास बसला आणि त्याचाच मी फायदा घेण्याचं ठरवलं.

एका संध्याकाळी मी सरळ त्याला म्हणालो, 'माझ्याजवळ दोन हजार फ्रँक्स आहेत, ते केव्हाही तुझे होऊ शकतील– फक्त माझ्यासाठी दोन माणसांना उपयोगी पडेल असा लाकडी तराफा तुला बनवावा लागेल. अशा पद्धतीनं की त्याचे सुटे सुटे भाग मी जोडू शकेन.'

'पॅपिलॉन, तुझ्याखेरीज मी कोणासाठीही धोका पत्करणार नाही. तुला मदत करताना मला जरी दोन वर्षं एकांतवास पत्करावा लागला तरी बेहेत्तर– फक्त एकच अडचण आहे. यार्डमधून वाटेल तेवढं लाकूड आणणं शक्य नाही.'

'ते काम परस्पर होईल!'

'कोण करील?'

'नेरिक आणि केनियर. पण बाकीचं तू कसं जमवशील?'

'आपल्याला आधी त्याचं डिझाइन काढावं लागेल. त्यावरहुकूम तराफ्याचा एक एक भाग बनवता येईल. ते एकमेकात व्यवस्थित बसवता येतील. मात्र तरंगणारं लाकूड मिळवावं लागेल. इथे सगळं कठीण लाकूड असतं, ते पाण्यात बुडतं.'

'तू मला केव्हा सांगशील?'

'तीन दिवसांच्या आत.'

'तुला माझ्याबरोबर यायचंय का?'


'नको रे बाबा?'

'का?'

'मला शार्क माशांची आणि बुडण्याची भीती वाटते.'

'तू मला शेवटपर्यंत मदत करायचं वचन देशील?'

'माझ्या मुलांची शपथ, मी तुला मदत करीन! पण या कामाला बराच वेळ लागेल.'


नॅशनल
ब्लॅक टूथ पावडर
काजळ, नेत्रांजन, बाळगोळी

उत्पादक
काकडे अँड सन्स, २८ नवी पेठ, पुणे ३०

'नीट ऐक. आजपासून तुझ्या रक्षणाची जबाबदारी माझी. कागदावर डिझाइन मीच तयार करतो. त्याखाली मी लिहीन– 'बोर्सेट, वर काढल्याप्रमाणे तराफा त्वरित बनव, नाहीतर प्राणास मुकशील'– त्यानंतर प्रत्येक भाग करताना मी लेखी आज्ञा देईन. नंतर तो ठरलेल्या ठिकाणी तू ठेवशील. पुढची व्यवस्था मी पाहीन. यामुळे तू पकडला गेलास तरी फार तर सहा महिने शिक्षा मिळेल. पण मार नक्की बसणार नाही!' त्याचं समाधान झालेलं दिसलं.

'आणि तूच पकडला गेलास तर?'

'तर मीच त्या चिठ्ठ्या लिहिल्या हे मान्य करून टाकीन. तू त्या जपून मात्र ठेव! फिर वादा पक्का?'

'पक्का.'

'तुला भीती वाटत नाही ना?'

'बिलकुल नाही, मला आता मुळीच भीती वाटत नाही. तुला मदत करताना मला आनंद होईल.'

इतर कोणाला मी आधी बोललो नाही. बोर्सेटकडून अद्याप उत्तर यायचं होतं. तो आठवडा संपता संपेना. शेवटी माझी त्याची वाचनालयात कशीबशी गाठ पडली, इतर कोणीही जवळ नव्हतं. रविवार सकाळ होती ती. सर्वजण जुगारात मश्गुल होते.

त्याच्याकडून अपेक्षित होकार मिळाला. 'मला हवं होतं तसं हलकं लाकूड अखेर मिळालं. मी एका लाकडी चौकटीच्या शोधातही होतो. म्हणजे त्यात कोरडे नारळ भरता येतील आणि तराफा तरंगायला त्याचा आणखी उपयोग होईल. त्यामुळे पाणी आत शिरू शकत नाही. काम पूर्ण झाल्यावर पुरेसे नारळ मिळवून त्यात भरायची जबाबदारी तुझी राहील. उद्यापासून मी सुरुवात करणार आहे. तीन दिवसांत पहिला भाग तयार होईल. गुरुवारी तो तू नेऊ शकतोस. एक भाग नेईपर्यंत पुढच्या कामाला मी लागणार नाही. हा तराफ्याचा प्लॅन. तो तू पुन्हा काढ आणि ठरल्याप्रमाणे मला चिठ्ठी लिही. तू कोणापाशी याबाबत बोललास?'

'नाही, फक्त नेरिक–केनियर यांच्याजवळ बोलण्याचा प्रश्न आहे. पण तुझ्या उत्तराची मी वाट पाहात होतो. तुझे आभार कसे मानावेत हेच मला कळत नाही. बरं. तूर्त हे पाचशे फ्रँक ठेव.'

माझ्याकडे रोखून पाहत तो म्हणाला, 'नको, तुझे पैसे तुझ्याजवळ राहू दे. पुढे तुला त्याची जरुरी लागेल. यापुढे तू निघून जाईपर्यंत मी जुगार न खेळण्याचा निश्चय केला आहे. बारीकसारिक काम केलं की कॉफी–सिगारेट सहज सुटते.'

'तू पैसे का घेत नाहीस?'

'कारण दहा हजार फ्रँक्स् जरी मिळाले तरी असला धोका मी पत्करला नसता. पण तुझ्या सुटकेसाठी मी काहीही करायला तयार आहे. आजवर प्रत्येक अडचणीच्या वेळी तू माझ्या बाजूला उभा राहिला आहेस. मला थोडी भीती वाटतेय् हे कबूल. पण तू स्वतंत्र होशील यात मला आनंद आहे.'

मला लाज वाटली. मी त्याला गटवण्यासाठी योजनाबद्ध पावले टाकत आलो होतो याची त्या बिचाऱ्याला जाणीवही नव्हती. माझा अप्रामाणिकपणा मला डाचू लागला. पण काहीही करून सुटका व्हायलाच पाहिजे या जिद्दीमुळे जर एखादी युक्ती वापरावी लागली तर त्यात काय चुकलं? योग्य ती काळजी तर आपण घेत आहोत ना!

त्या रात्री मी नेरिकजवळ मदत करण्याविषयी बोललो. आढेवेढे न घेता त्यानं एकदम मान्य केलं. पूर्ण खबरदारी घेऊन ते दोघं तराफ्याचे भाग हलवणार होते. उत्तम. आता फक्त कारबोनेरीशी बोलायचं राहिलं होतं. त्याला मी बरोबर नेणार होतो.

त्यानं शंभरटक्के मान्यता दर्शवली.

बागेजवळच थडग्यांची जागा होती. तिथे भिंतीजवळ खड्डा खणून त्यावर एक मोठा दगड ठेवायचा. सुटा भाग आला की फक्त दगड उचलून तो आत टाकून पुन्हा तोंडावर दगड ठेवायचा असं ठरलं. तिथे कारबोनेरीखेरीज दुसरं कोणीही जाऊ शकत नसे, म्हणून बागेच्या जवळपासचे ठिकाण ठरवून तराफ्याचा तयार भाग त्या दोघांनी त्यात टाकावा आणि कारबोनेरीनं पुढची व्यवस्था करावी असा कार्यक्रम पक्का झाला.

सर्व काही सुरळीत पार पडत होतं. फक्त नारळांची व्यवस्था करणं माझ्याकडे राहिलं होतं. आपल्याकडे कोणाचं लक्ष न जाता भरपूर नारळ कुठे जमवावेत हा प्रश्नच होता.

आता जीवनात काही अर्थ निर्माण झाला होता. अजून गाल्गानी आणि ग्रँडेटजवळ बोलायचं होतं. माझ्यामुळे त्यांच्यावर भलताच आळ येऊ नये अशी माझी इच्छा होती. मी त्यांना सांगितलं की सुटकेची तयारी सुरू झाल्यामुळे मला त्यांच्यापासून दूर राहावं लागणार होतं. त्यांनी मला एकदम उडवूनच लावल आणि नकार दिला. 'तुझी तयारी झाली की तू लगेच पळ काढ. आमचं आम्ही बघून घेऊ. पण तोपर्यंत कुठल्याही परिस्थितीत तुला आमच्यातच राहिलं पाहिजे. नसती चिंता करत बसू नकोस!'

गेला एक महिना तयारी चालू होती. आतापर्यंत सात भाग मिळाले होते, त्यातले दोन तर चांगले मोठे होते. ते छपवण्याची जागा मी एक दिवस पाहून आलो. तोंडावरील दगड सहजासहजी दिसत नव्हता. कारबोनेरीनं त्यावर खूप गवत पसरलं होतं. खड्डा मात्र मला जरा लहानच वाटला. पण तूर्त ठीक. ती जागा तर अगदी बेमालूम होती.

सुटकेच्या नुसत्या कल्पनेनं मला प्रचंड बळ आलं होतं. पूर्वीपेक्षा जास्त खात होतो आणि मासे मारण्याचा कार्यक्रम तब्बेत सुधारण्याच्या पथ्यावर पडला होता. त्याशिवाय रोज दोन तास मी खडकांवर व्यायाम करीत असे. दंड आणि पायाच्या पोटऱ्या विलक्षण सुधारल्या होत्या.

ज्युलिएट माझ्याशी जरी नेहमीप्रमाणे मोकळेपणानं वागत होती तरी तिच्या लक्षात आलं होतं: गव्हर्नर घरात असतानाच फक्त मी त्यांच्याकडे जात असे. तसं तिनं स्पष्ट बोलूनही दाखवलं. पण एकूण संबंध चांगले होते.

बोर्सेटच्या कामाला सुरुवात होऊन अडीच महिने होऊन गेले होते. तराफ्याचे भाग लपवायची जागा मी भाकित केल्याप्रमाणे भरून गेली. अजून दोन भाग यायचे राहिले होते, साधारण पाच ते सहा फूट लांबीचे. ते तर तिथे मावणं शक्यच नव्हतं.

गेल्या आठवड्यात एका वॉर्डरची पत्नी निवर्तली. तिच्यासाठी एक नवीन थडगं खणण्यात आलं होतं. त्या जागेवर देखरेख करणाऱ्या एका वृद्ध माणसाला सगळे 'पपा' म्हणत. त्याला अजिबात दिसत नसे. त्या जागेचा उपयोग करायचं मी ठरवलं. नव्या थडग्याचे

जागेवरच पुरेसं उकरून शवपेटीपर्यंत जावं, खणलेली माती आजूबाजूला व्यवस्थित पसरावी आणि तिथे शेवटचे दोन भाग दडवून ठेवावेत असं ठरवलं होतं. मुख्यत: कोरडचा नारळांची लाकडी चौकट. त्या वेळपर्यंत मी पन्नास-एक नारळ निरनिराळ्या ठिकाणी गोळा करून ठेवलेही होते. दहा-बारा तर गव्हर्नरच्या घराच्या आवारातच ठेवले. लोकांची कल्पना अशी झाली होती की पुढे त्यांचं तेल काढायचा माझा विचार होता.

शेवटी थडग्यावरची जागा खणायला मी सुरुवात केली. भिंतीवर बसून कारबोनेरी चौफेर लक्ष ठेवी. त्यानं दोन रुमाल बाळगले होते. पांढरा आणि लाल. सर्व काही ठीक असे तोपर्यंत पांढरा रुमाल तो धरून ठेवी आणि कोणीही येताना दिसलं तरी लाल रुमाल फडकवी. सर्व काम पुरं व्हायला एक दुपार आणि एक रात्र लागली. त्यात प्रचंड धोका होताच. चार फूट खोल गेलो. पेटीपर्यंत खाली जाण्याची आवश्यकता वाटली नाही. तांबडा रुमाल बऱ्याच वेळा फडकला, पण अखेर काम पुरं झालं कोणाच्याही लक्षात न येता. नंतर तिथे पालापाचोळा भरून टाकला. संशय येण्याजोग्या काहीही खुणा बाकी ठेवल्या नाहीत.

तीन महिने पहिल्या जागेतून सगळे भाग उचलून नव्या जागेतील खड्डचात हळूहळू आणून टाकले. सर्वांना क्रमांक दिले आणि त्यावर माती पसरून टाकली. पहिल्या जागेत सहा फुटी दोर, काडचापेटचा, सुमारे डझनभर दुधाचे डबे एवढंच सामान लपवून ठेवलं. बोर्सेट मन लावून काम करीत होता. तुम्हाला वाटलं असतं की त्यालाच पळ काढायचा होता की काय!

दिवस पावसाचे होते. जवळजवळ रोज पाऊस पडे. त्याचा फायदा घेऊन मी तराफा जोडून तयार करत आणला होता. फक्त चौकटीच्या कडेचे दोन भाग बसवले की काम पूर्ण होणार होतं. नारळ बागेच्या जवळजवळ जमवत आणत होतोच.

माझे इतर मित्र 'कुठपर्यंत आलं?' वगैरे प्रश्न विचारण्याच्या भानगडीत पडले नव्हते. फक्त 'ओ. के.?' 'हो, ठीक.'; 'वेळ जरा जास्तच लागतोय का?' 'यापेक्षा घाई केली तर धोका आहे.' बस्स्. इतकंच संभाषण.

ज्युलिएटच्या आवारातून नारळ हलवताना तिनं मला भयानक धक्का दिला. 'पॅपिलॉन, तुला तेलच काढायचं आहे तर इथेच का काढत नाहीस? इथे सगळी सोय आहे की.' 'कॅम्पवरच काढणं सोयीचं आहे' असं म्हटल्यावर ती म्हणाली, 'कमालच आहे. खरं सांगू, तुला तेलबील काही काढायचं नाही. कारण तशी जरूरच तुला नाही. लागेल तितकं ऑलिव्ह तेल माझ्याकडून मिळू शकत असताना हा उद्योग तू कशाला करशील? त्याचा काही वेगळाच उपयोग असावा.'

मला घाम फुटला आणि रक्त थिजून गेलं. 'सुटका' हा शब्द तिच्या तोंडातून निघतो की काय ही भीती मला पडली होती. आपल्या सगळ्या कष्टावर पाणी पडणार काय? पण मी स्वत:ला सावरलं. 'बाईसाहेब, ते माझं खाजगी आहे. आताच सांगून सगळी मजा जाईल, म्हणून एवढंच सांगतो की त्यांच्या करवंटचांपासून तुमच्यासाठी एक मस्त चीज बनवणार आहे.'

सुटलो, कारण ती म्हणाली, 'पॅपिलॉन, माझ्यासाठी निष्कारण कोणताही खर्च करू नकोस. तसं करायला माझी मनाई आहे; पण तुझ्या इच्छेबद्दल आभार!'

'ठीक आहे; बघू.' सुदैवानं माझी कंपनीय अवस्था तिच्या ध्यानात आली नाही. ईश्वर माझ्या पाठीशी होता.

पाऊस रोज येतच होता. विशेष करून दुपारी आणि रात्री. थडग्यावर पसरलेली माती वाहून जाईल अशी चिंता सतत वाटायची. तरी कारबोनेरी नियमितपणे पुन्हा माती सारखी करायचा. पाण्यामुळे तराफा चांगलाच चिंब झाला असणार. परिस्थिती दिवसेंदिवस नाजूक होत चालली. शेवटी मॅथ्यू मला म्हणाला, 'येणाऱ्या अडचणी कधी संपायच्याच नाहीत. काय चाललंय् हे?'

'आता संपत आलय् की मॅथ्यू!'

'आपण दोघंही तापल्या तव्यावर आहोत. सर्व काही सुरळीत पार पडो!'

अद्याप कोणालाही संशय आला नव्हता. अखेरपर्यंत काही संकट येऊ नये म्हणजे झालं. निदान तशी आशा करू या. निघायला ती वेळ योग्य होती, नाही तर व्हायचं काय की थडग्यातच कायमचं जाऊन बसायची पाळी यायची.

शेवटचा एक भाग सहा फुटी होता. तो सुरक्षितपणे येऊन राहिलेल्या भागाला जोडलाही गेला होता. बोर्सेट त्याबद्दल स्वत: चौकशी करायला आला. मी त्याला सांगितलं की सर्व काही व्यवस्थित आहे. ते ऐकून त्याचा जीव भांड्यात पडला. त्याला कसला तरी संशय आला असावा. मी विचारलंच, 'तुला कोणाची शंका येतीय् का? कोणाचं आपल्यावर लक्ष आहे? याविषयी तू कोणाजवळ बोलला आहेस? सांग ना.'

'छे, छे. बिलकुल नाही.'

'काही तरी नक्की आहे. तुला कसली तरी धास्ती वाटतीय्.'

'एक बेबर्ट सेलियर नावाचा इसम ज्या पद्धतीनं चौकशी करत होता——भलताच रस घेऊन——त्यामुळे मी अस्वस्थ झालो. लाकडी भाग हलवताना नेरिक काय करतो हेही त्याच्या लक्षात आलं असावं. त्यामुळेच मला काळजी वाटते, दुसरं काही नाही.'

मी हे ग्रँडेटजवळ, बोललो, 'हा सेलियर आपल्याच हॉलमध राहतो, तो दगा देणार नाही.'

तो म्हणाला, 'त्याला कुठेही आतबाहेर जाण्याची मुभा आहे. त्याचं सारं आयुष्य आर्मीत गेलंय. बाकीचं तुरुंगातच. प्रवृत्ति खुनशी आहे. स्वभाव भांडणं ओढवून घेणारा. जुगाराचा वेडा. थोडक्यात वाईट आणि धोकेबाज. तुला संशय आला असेल तर आजच रात्री, त्याला उडवून टाक! त्याला पुढे हालचाल करायला जागाच ठेवू नकोस!'

'पण त्यानं वॉर्डरना खबर दिली आहे असं सिद्ध झालेलं नाही.'

'ते खरं, पण त्याचा भलेपणा दिसणारी गोष्टही अद्याप घडायचीय्. त्याच्यासारख्या कैद्यांना सुटका खपत नाही, हे तुला ठाऊकच आहे. कारण त्यामुळे त्यांच्या तथाकथित सुखी जीवनावर गदा येते. बाकी कशाबद्दलही ते बोलणार नाहीत, पण सुटकेबाबत——कोणी सांगावं?'

कारबोनेरीचंही तेच मत पडलं. तो स्वत:च खून करायला निघाला. मी त्याला मूर्खासारखं अडवलं. एखाद्याला केवळ संशयावरून का

ठार करावं ! बोर्सेटचीच भ्रामक समजूत झाली असली तर काय ? धास्तीमुळे त्याला सगळ्याच गोष्टी तशा दिसत असतील. मी नेरिकला विचारलं, ' सेलियटच्या वागणुकीत तुला काही गैर आढळलं का ? '

' नाही बुवा. इतर कुणाला किंवा अरब पहारेकऱ्यांनाही काही संशय आलेला नाही. हां, केनियर परवा म्हणत होता खरं की, त्यानं सेलियरला आमच्यावर लक्ष ठेवताना पाहिलं ?'

' तुला काय वाटतं ? '

' शेवटचा लाकडी भागच इतका मोठा होता की कोणालाही तराफ्याची आठवण व्हावी. त्यामुळे त्याला जरा कुतूहल वाटलं असेल इतकंच !

' मलाही तसंच वाटतं. आपण आता ते विसरून जाऊ. शेवटचा भाग नेताना जास्त काळजी घे म्हणजे झालं. सेलियर पहारेकरीच आहे असं समजा. '

त्या रात्री मी मार्सेल्सि जुगार वेड्यासारखा खेळलो. पहाटे साडेचारपर्यंत सात हजार फ्रँक्स् जिकले. त्यानंतर माझ्या ठरलेल्या कामासाठी बाहेर पडलो. ते काम गाडीवालाच करायचा म्हणा. पाऊस थांबला होता. खूप अंधार असूनही थडग्यांच्या जागेत जाऊन एकदा पहाणी केली. माती ठाकठीक पसरली. सातच्या सुमारास चांगलंच ऊन पडलं. मी मासे पकडण्यासाठी रॉयेलच्या दक्षिण टोकाला समुद्रावर गेलो. इथूनच तराफ्यावरून मी निसटणार होतो. का कोणास ठाऊक पण उसळता समुद्र पाहून आपण एखाद्या खडकावर आदळू की काय असं उगीचच वाटलं. मग माशांकडे वळलो. म्युलेट मासे खूप मिळाले. रात्रभर खेळल्यामुळे आणि एकंदरच मन अस्वस्थ झालं होतं. दमलोही होतो. म्हणून सावलीत दगडावर बसून विश्रांती घेऊ लागलो. 'तीन महिन्यांच्या ताणामुळे आणि शेवट जवळ आल्यामुळे तुला असं होतंय् ' मी स्वतःला बजावलं. सेलियरविषयी विचार करताना पुन्हा त्याच निर्णयापाशी आलो– आपल्याला त्याला ठार करायचा अजिबात हक्क नाही.

येताना ज्युलिएटला निम्मा वाटा देऊन टाकला. ती म्हणाली, ' पॅपिलॉन, मला तुझ्याबद्दल एक वाईट स्वप्न पडलं. तू रक्तानं माखला आहेस आणि तुला साखळदंडानं जखडलंय्. काही तरी भलतंच तुझ्या डोक्यात नाही ना ? तुला काहीही झालं तर मला अत्यंत वाईट वाटेल. त्या स्वप्नामुळे मला काही सुचेना. अजून स्नान झालं नाही की वेणीसुद्धा घातली नाही. दुर्बिणीतून तू कुठे दिसतोस का तेच बघत बसले होते, पण उपयोग झाला नाही. आज तू कुठे गेला होतास ?'

' बेटाच्या दुसऱ्या बाजूला. म्हणूनच तुम्हाला दिसलो नाही. '

' इतक्या लांब जायचं कारणच काय मी म्हणते. मला दुर्बिणीतूनही तू दिसू नये ? लाटेबरोबर वाहून गेला असतास तर ? मग शार्कमाशांच्या तडाख्यातून तुला कोणीही वाचवू शकणार नाही. '

' तुम्ही फारच काळजी करायला लागला. अतिशयोक्तीच. '

' तुला अतिशयोक्ती वाटते ? मग दुसऱ्या बाजूला जायची एकदम बंदी. माझं जर ऐकणार नसशील तर तुला मिळालेली परवानगी मी काढून घ्यायला सांगेन. '

' तसं काही करू नका, बाईसाहेब. वाटलं तर तुमच्या गड्याला मी सांगून जात जाईन माझं ठिकाण. '

' मग हरकत नाही. पण आज तू फार थकलेला दिसतोस. '

' होय मॅडम, आता कॅंपवर जाऊन झोपणारच आहे. '

' ठीक. पण दुपारी चार वाजता कॉफी घ्यायला माझ्याकडे ये. येशील ना ?'

' येईन. '


**भस्मासुराचा उदयास्त**

अमाप लोकप्रियता लाभलेल्या ग्रंथाची
नवीन चित्रपुरवणीसह प्रसिद्ध होत असलेली
तिसरी अद्ययावत आवृत्ती

लेखक : रा. म. शास्त्री / वि. ग. कानिटकर
प्रसिद्धीनंतरची किंमत : रुपये पंचेचाळीस सुमारे
पृष्ठसंख्या ७२५ (डेमी) सुमारे
प्रसिद्धीपूर्व सवलतीची किंमत : **रुपये तीस फक्त.**

**१ जून १९७५ पूर्वी**

प्रसिद्धीपूर्व ग्राहकांनी रुपये तीस म. ऑ. वा ड्राफ्टने पाठवून आपली प्रत कृपया नोंदवावी. चेक असल्यास एक रुपया वटणावळ अधिक.

ग्रंथ रजि. पोस्टाने घरपोच हवा असल्यास रुपये तीन अधिक पाठवावेत.

आधीच मला कमी अडचणी येत होत्या, त्यात ज्युलिएटच्या स्वप्नांची भर पडली. परिस्थितीला कसं वजन यायला पाहिजे ना!

बोर्सेटचा संशय दृढ होत होता. शेवटच्या चार फुटी तळाच्या भागाची आम्ही पंधरा दिवस वाट पाहत होतो. नेरिक–केनियरना काही दिसलं नव्हतं तरी थोडा वेळ काम थांबवावं असं त्यांनी सुचवलं. त्यांचं बांधकाम दुरुस्तीचं काम सुरू झालं की बेमालूमपणे शेवटचा भाग हलवणं सोपं जाणार होतं.

पुन्हा काम सुरू झालं. बोर्सेट एक दिवस म्हणाला की कोणी तरी नक्कीच टेहळणी करीत होता. तो तिथे नसताना लाकूड जागचं हलवून पुन्हा पहिल्या जागी ठेवलं जाई. आम्ही त्याची खात्री करून घ्यायचं ठरवलं. पहारेकऱ्यांखेरीज शेडमध्ये दुसरं कोणीही नसताना कामाच्या लाकडावर एक केस विशिष्ट ठिकाणी बसवून बाहेर यायचं. कोणी ओंडका सरकवला तर लगेच लक्षात येणार होतं. बोर्सेट अद्याप हॉलमध्ये परतला नव्हता. दुपारी एका जर्मन कैद्यानं मला बंद चिठ्ठी आणून दिली. ती कोणी उघडली नसल्याचं माझ्या लगेच लक्षात आलं. त्यात लिहिलं होतं. 'केस जागेवर नाही, म्हणजे कोणी तरी तिथे उद्योग केला. दुपारच्या वेळात राहिलेलं काम पूर्ण करण्याच्या सबबीवर– बारा ते तीन– तिथे राहण्याची परवानगी मिळवलीय्. त्या वेळात नेरिकच्या हत्यारांचे जागी मी शेवटचा भाग नेऊन ठेवणार आहे. त्यांना सांग. तीन वाजता त्यांनी तो ताबडतोब बाहेर न्यावा. लक्ष ठेवणाऱ्या हलकटावर आपण मात करू!'

नेरिकनं मान्यता दर्शवली. मी लगेच योजना तयार केली. दाराशी कोणी तरी दोघांनी मारामारी सुरू करावी असं ठरलं म्हणजे बाहेर पडताना नेरिकच्या गाडीकडे पहारेकऱ्यांचं दुर्लक्ष होणार होतं. कारबोनेरीनं ती व्यवस्था केली. मसानी आणि सांतिनी हे दोघं तयार झाले. त्यांनी कारणसुद्धा विचारलं नाही. किती योग्य वागणूक. अजूनही आम्हाला आशा होती. एकदा का शेवटचा भाग हलला की मी एकदोन महिने तरी स्वस्थ बसणार होतो. कारण निदान एका माणसाला तरी रहस्य माहीत झालं होतं. एकालाच हा अंदाज. ते काम कोणाचं आणि तराफा कुठे लपवलाय् हे फार तर त्यानं शोधून काढावं.

अडीच वाजले आणि माणसं तयारीला लागली. हजेरी होऊन सर्वजण कामावर रवाना होण्यात तीस मिनिटं गेली. ऐंशी जणांच्या ओळीत सेलियर मध्यावर होता. नेरिक–केनियर सर्वांत पुढे, मसानी–सांतिनी बाराव्या ओळीत आणि सेलियर दहाव्या. हे ठीक झालं. कारण नेरिकनं लाकडाचा ताबा घेईपर्यंत सर्वजण आत शिरणारही नव्हते. सेलियर फारतर दारापर्यंत पोचेल, तेवढ्यात मारामारीला सुरुवात होऊन साहजिकच सेलियरसह सर्वजण कुतूहलानं तिथेच थांबतील.

चार झाले. सर्व काही ठरल्याप्रमाणे पार पडलं. ओंडका सुरक्षितपणे बाहेर येऊन चर्चसमोरच्या इतर सामानाच्या ढिगाऱ्यात जाऊन पडला. त्यापुढे मात्र नेता आला नाही, पण तो होता तिथे काही काळजी नव्हती.

मी ज्युलिएटकडे गेलो. ती घरी नव्हती. परत येताना कार्यालयाचे समोर मसानी आणि सांतिनी उभे राहिलेले दिसले. त्यांना शिक्षा–कोठडीत टाकण्यात येणार होतं. ते अपेक्षितच होतं म्हणा. मी हळूच विचारलं, 'किती?'

'एक आठवडा.' सांतिनी.

एक कॉर्सिकन पहारेकरी म्हणाला, 'एकाच देशाची माणसं आपापसात लढतात ही किती लांछनास्पद गोष्ट आहे.'

सहा वाजता आम्ही सर्वजण एकत्र जमलो. बोर्सेटही होताच. त्याच्या छातीवरचं ओझं हलकं झालं होतं. माझ्या झकास योजनेबद्दल कारबो–नेरीनं आणि इतर खास दोस्तांनी माझं अभिनंदन केलं. रात्री मी समाधानानं झोपलो, जुगाराच्या वाटेला गेलो नाही. विजय आता दूर नव्हता. सगळ्यात अवघड काम तरी पार पडलं होतं.

दुसऱ्या दिवशी चर्चसमोरचा शेवटचा भाग पहिल्या भिंतीतल्या भोकात कारबोनेरीनं दडवला. घाई काहीच नव्हती. त्यालाही नऊ दिवस होऊन गेले. आता दिवसा पाऊस पडत नसे, बहुधा रात्रीही. माझं सर्व लक्ष दोन कामांवर केंद्रित झालं होतं. पहिलं सर्व भाग एकत्र जोडणे आणि दुसरं सर्वांत महत्त्वाचं–अर्थातच सुटका! तो दिवस केव्हा येणार?' पहिलं काम दिवसा करावं लागणार होतं. निघण्यापूर्वी नारळ आदि पदार्थांचा साठा तराफ्यात भरणं जरुरीचं होतं.

काल जीन कॅस्टेलीला तयारी कुठपर्यंत आली ते सांगून टाकलं. तो खुषीत आला. मी उद्दिष्ट अखेर गाठलं होतं. तो म्हणाला, 'आज शुद्ध पक्षातील चतुर्थी आहे.'

'होय, त्यामुळे आपल्याला काहीच धोका नाही. दहा वाजता ओहोटीला हळूहळू सुरुवात होते, म्हणजे निघायची सर्वात योग्य वेळ मध्यरात्रीचे दोन. त्या वेळी तराफा पाण्यात सोडावा.'

मी आणि कारबोनेरीनं आता त्वरा करायचं ठरवलं. उद्या सकाळी नऊ वाजता शेवटचा भाग जोडायचा आणि रात्रीचं– पलायन.

दुसऱ्या दिवशी काळजीपूर्वक हालचाली करून मी बागेच्या भिंतीवरून थडग्यांच्या आवारात उडी टाकली. सोबत फावडं होतं. खड्ड्यावरील माती बाजूला करून झाल्यावर भिंतीपलीकडून मंथूनं भोकातला शेवटचा भाग काढला. आम्ही दोघंही तो तराफ्याला सांधू लागलो आणि थोड्याच वेळात काम पूर्ण झालं. आजवरच्या श्रमाचं फळ समोर दिसत होतं. पुन्हा त्यावर माती टाकून आणि हात झटकून आम्ही वळणार इतक्यात––


# साप्ताहिक माणूस : वर्गणीचे नवे दर

वार्षिक : छत्तीस रुपये
सहामाही : वीस रुपये
परदेश : (जलमार्गे)
पंचावन रुपये

–समोर एक वॉर्डर बंदूक रोखून उभा राहिलेला दिसला.

'अजिबात हालचाल करू नका, नाही तर मेलात म्हणून समजा !'

आम्ही मुकाटयानं हात वर करून उभे राहिलो. तराफा अर्धवट उघडाच राहिला होता. मी वॉर्डरला ओळखलं. तो इमारत विभागातील प्रमुख होता.

'प्रतिकार करण्याचा मूर्खपणा दाखवू नका. तुम्ही बरोबर सापडला आहात. निमूटपणे शरण या, म्हणजे निदान कातडी तरी बचावेल. त्याचीही खात्री नाहीच म्हणा. हात तसेच वर ठेवून पुढे चालायला लागा कार्यालयाच्या दिशेनं !' मार्गात एक अरब उभा होता. वॉर्डर त्याला म्हणाला, 'थँक्स्, मोहम्मद. तुझ्या बहुमोल माहितीबद्दल ठरल्याप्रमाणे उद्या सकाळी बक्षिसी घेऊन जा !'

'धन्यवाद,' तो अरब म्हणाला, 'उद्या तर मी येतोच, पण सेलियरलाही, मला काही रक्कम द्यावी लागेल, नाही का ?'

'त्याच्याबाबत तुझं तूच काय ते ठरव.'

त्यावर मी बोललो, 'म्हणजे ही सारी सेलियरची कृपा आहे तर, चीफ ?'

'मी तसं काही म्हणालेलो नाही.'

'एकूण एकच, मला आपली माहिती मिळाली.'

बंदूक अजूनही रोखलेलीच होती. 'मोहम्मद, यांची तपासणी कर.'

अरबानं आम्हा दोघांचेही चाकू काढून घेतले. मी त्याला म्हणालो, 'तू खरोखर हुषार आहेस, पण तुला ते कसं कळलं ?'

'नारळाच्या झाडावर चढून मी रोज टेहेळणी करीत होतो. तिथून तराफा लपवलेली जागा स्पष्ट दिसते.'

'असं करायला तुला कोणी सांगितलं ?'

'प्रथम सेलियरनं, नंतर या साहेबांनी.'

'गप्पा पुरे झाल्या !' वॉर्डर ओरडला, 'जलद चला बघू. आता हात खाली घेतलेत तरी चालेल.'

ते चारशे यार्डांचं अंतर संपता संपेना. आयुष्यात आपण एवढं कधी चाललोच नाही असं मला वाटत होतं. आशाआकांक्षांचा पार चुराडा झाला होता. सगळ्या श्रमावर दोन मिनिटात पाणी पडलं होतं. परमेश्वरा, किती निष्ठुर आहेस रे तू !

मुक्कामाला पोचेपर्यंत खूपच तमाशा झाला होता. मागून आणखी सात–आठ वॉर्डर्स चालत होते. ते वाटेत सामील झाले होते.

अरबानं पुढे धावत जाऊन गव्हर्नरच्या कानांवर वार्ता घातलीच होती. तो कार्यालयाच्या पायरीवर उभा होता. बाजूला देगा आणि पाच मुख्य वॉर्डर्स वाट पाहत होते.

'नक्की काय झालं, ब्रूएट ?' गव्हर्नरनं वॉर्डरला विचारलं.

'मी यांना तराफा लपवताना पुराव्यानिशी पकडलं आहे. माझ्या कल्पनेप्रमाणे एकदम तयार तराफा.'

'यावर तुझं काय म्हणणं आहे, पॅपिलॉन ?'

'काही नाही. चौकशीच्या वेळेस मी काय ते सांगेन.'

'या दोघांनाही अंधारकोठडीत टाका !'

अशा रीतीनं मी पुन्हा अंधारकोठडीत जाऊन पडलो. तेथील आडवे–उभे गज ठोकलेल्या खिडकीतून समोर गव्हर्नरच्या कार्यालयाचं दार दिसत होतं.

[ क्रमशः ]

---

बरोबरच्या वॉर्डर लोकांपैकी एकाला मी आधीपासूनच ओळखत होतो. त्याचं नाव मला ठाऊक नव्हतं. त्याला मी विचारलं, 'साहेब, एक प्रश्न विचारू का ?'

चकित होऊन तो जवळ आला. 'काय ?'

'आठ वर्षं एकांतवासात कोणी टिकून राहिल्याचं तुमच्या स्मरणात आहे का ?'

विचार करून तो म्हणाला, 'नाही. पण पाचापर्यंत खूप जण टिकले आहेत. हो, एक जण सहा वर्षंही राहिला होता; आत्ता आठवलं. त्यानंतर तो धडधाकटपणे, वेड न लागता बाहेर आलेला मी पाहिलाय् !'

'धन्यवाद.'

'ठीक आहे.' तो म्हणाला, 'मला वाटतं, तुला ही आठ वर्षं मिळालीय् ना ?

'होय साहेब !'

## एकांतवासाची दुसरी फेरी

**पुढील अंकी**

पुस्तके

# महादेव कोळी समाजाचा एक अभ्यास

कुश.

सर्वसाधारणपणे मागासलेल्या समाजातील सुशिक्षित माणसे त्या समाजाला दुरावतात आणि आपण मागासलेल्या समाजातून पुढे आलो आहोत हे लपविण्याचा प्रयत्न करतात. या नियमाला डॉ. गोविन्द गारे अपवाद आहेत. महादेव कोळी समाजातील या लेखकाने अत्युच्च शिक्षणाचा उपयोग आपल्या समाजाचे प्रश्न सर्वांना समजावेत यासाठी केला आहे व हा ग्रंथ त्यासाठीच लिहिलेला आहे.

महाराष्ट्रातील आदिवासीत महादेव कोळी ही एक प्रमुख जमात आहे व ती प्रामुख्याने सह्याद्री पर्वताच्या परिसरात वसती करून आहे. हे लोक मुख्यत: शेतमजूर आहेत. गरिबी, अज्ञान व शोषण हे त्यांचे प्रमुख प्रश्न आहेत. त्यांचे सारे आयुष्य अन्न, दारू, स्त्री आणि सावकार यांच्यासाठी धडपडण्यात जाते. ते फक्त वर्तमानातच जगतात. अडीअडचणींच्या वेळी सावकारांचे पाय धरतात व याचा फायदा घेऊन सावकार त्यांचे भरमसाट शोषण करतात.

महादेव कोळी जमातीचा इतिहास डॉ. गारे यांनी थोडक्यात वर्णन केला आहे. सावकारांचा जुलूम असह्य झाल्यामुळे या जमातीतील शूर तरुणांनी त्यांच्याविरुद्ध केलेली बंडे त्यांनी वर्णन केली आहेत. त्यांचे सामाजिक जीवनही लेखकाने थोडक्यात दिले आहे आणि हे करताना बिगर आदिवासी लेखक कधीकधी दाखवतात तो काव्यात्मक स्वप्नाळूपणा त्यांनी टाळला आहे. सार्वजनिक बाबींसाठी एकत्र येण्याचा गुण या जमातीने कधीही दाखवला नाही, त्यांच्यात कार्याचे सातत्य आढळत नाही, या गोष्टी स्पष्टपणे लिहिल्या आहेत. विवाहासंबंधी व स्त्री-पुरुष संबंधासंबंधी केलेले विवेचन त्रोटक वाटते. सामान्य वाचकाला त्यांचे "घोटुलासारख्या काही प्रथांच्या निश्चित छटा आजही निरनिराळ्या जमातीत दिसतात" यासारखी विधाने समजणे कठीण आहे.

लेखकाने महादेव कोळी समाजाचे आर्थिक जीवन मात्र अगदी सविस्तर वर्णन केले आहे. बिगर आदिवासी धनिकांनी आदिवासींची बहुतेक जमीन बळकावली आहे व त्यांना अर्धगुलामाचे जिणे जगावयास लावले आहे, याविषयी विविध प्रकारची माहिती आकडेवारीसह लेखकाने दिली आहे. बहुसंख्य लोक अतिशय गरीब व कर्जबाजारी आहेत. त्यांच्या शोषणाचे विविध प्रकार लेखकाने स्पष्ट केलेले आहेत.

आदिवासींच्या विकासासाठी सरकारने चालविलेले प्रयत्न देखील लेखकाने वर्णन केले आहेत व ते अनेक प्रकारे कसे अपुरे पडतात हे सांगितले आहे. आदिवासी शाळांत इतर भागात वापरली जाणारी मराठी पुस्तकेच वापरली जातात. त्यामुळे या शाळांतील कित्येक विद्यार्थ्यांना शब्दांचे अर्थच कळत नाहीत. कारण कित्येक साधे मराठी शब्द त्यांच्या परिचयाचे नसतात. त्यामुळे मुलांच्या मनात न्यूनगंड निर्माण होतो. त्यासाठी अशा मुलांना शिकविताना त्यांच्या भाषेतील परिचयाचे शब्दच वापरले पाहिजेत. लेखकाच्या या विचारासारखीच शिफारस वर्गीकृत जाती-जमाती आयुक्त यांनी आपल्या १९७१-७२ व १९७२-७३ या अहवालात केली आहे. नुसत्या साक्षरतेवर भर न देता आदिवासी मुलांना उच्च शिक्षण मिळावे म्हणून देखील खास प्रयत्नांची आवश्यकता आहे, हे लेखकाचे म्हणणे सर्वांनाच मान्य होण्यासारखे आहे.

आदिवासींचा बाह्य जगाशी अधिकाधिक संबंध येत आहे. त्यामुळे आदिवासींचे पारंपरिक जीवन बदलणे अटळ आहे. मात्र हे होताना ते सुलभपणे व आदिवासींचे शोषण टाळून झाले पाहिजे. यासाठी सरकारी प्रयत्नांबरोबर सामाजिक संस्थांनीही प्रयत्न केले पाहिजेत, असे लेखकाने आग्रहाने सांगितले आहे. आदिवासीत काम करणाऱ्या संस्थांचा परिचयही थोडक्यात दिला आहे.

अशा रीतीने एका उपेक्षित समाजाची ओळख होईल असा एक अतिशय चांगला ग्रंथ डॉ. गारे यांनी लिहिला आहे. या ग्रंथाचे वाचन सर्व शाळा-कॉलेजांतून होणे जरूरीचे आहे. सर्व जिज्ञासू वाचकांनी हा ग्रंथ वाचलाच पाहिजे. अशा स्वरूपाचे ग्रंथ इतर आदिवासी जमातींवरही झाले पाहिजेत. डॉ. गारे यांचे अनुकरण इतरही काही सुविद्य लोक करतील अशी अपेक्षा आहे. □

**सह्याद्रीतील आदिवासी महादेव कोळी**
डॉ. गोविन्द गारे
सहाध्यायन प्रकाशन, मुंबई
किंमत १५ रुपये


पुरंदऱ्यांचा सरकारवाडा

लेखक
ब. मो. पुरंदरे

मूल्य : सात रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

मध्यंतर

इंडियन नॅशनल थिएटरचे

# प्रेमशास्त्र

पुष्पा भावे

मध्यंतरीच्या काळात चित्रपटप्रेक्षकांत ' फ्रेंच बेडरूम कॉमेडी ' फार लोकप्रिय होती. पारशी-गुजराती वा गुजराती नाट्यप्रेक्षकांमध्ये आजही या प्रकारची नाटके लोकप्रिय आहेत. त्यामुळे दर एक-दोन वर्षांनी ' इंडियन नॅशनल थिएटर ' या स्वरूपाचे एखादे रूपांतरित नाटक रंगमंचावर आणीत असते. या अशा स्वरूपाच्या नाटकाने साधते काय, हा प्रश्न विचारायचा नसतोच असे आपण समजू.

१४ मे ला ' प्रेमशास्त्र ' या अशाच एका नाटकाचा पहिला प्रयोग ' आय. एन. टी. 'ने सादर केला. या मराठी नाटकाचे लेखक शं. ना. नवरे आहेत. नवरे यांच्या लेखणीचा व वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचा मिस्किलपणा अजून त्यांनी स्वतंत्र नाट्यलेखनाच्या अंगी लावण्याचा प्रयत्न केलेला नाही; परंतु मराठी नाट्यरसिकांना ' मंजू-मंजू ' हे त्यांचे रूपांतरित नाटक मात्र नक्की स्मरत असेल. आता ' बेडरूम 'शी निगडीत सुखात्मिका म्हटली म्हणजे गैरसमज व गोंधळ यांवर आधारित सुखात्मिका हे समीकरण आपल्याला माहीत आहे. या ' प्रेमशास्त्र 'मध्ये ' Apartment ' या चित्रपटकथेच्या धर्तीवर दुसऱ्याच्या बेडरूमवर हवाला ठेवणारे प्रेमवीर आहेत. कथालेखक संजय आणि त्याची पत्नी रेखा एका रात्री पार्टीला जाणार हे माहीत असल्यामुळे, संजयचा निर्माता मेहरा आपल्या प्रेमपात्राला तिथे बोलवतो. त्याच रात्री मेहरांच्या सौभाग्यवती आपल्या पूर्वाश्रमीच्या प्रियकराला तिथे बोलावतात. त्याच रात्री संजयच्या जागेचे ' इंटिरियर डेकोरेशन ' करणारा चतुर संजयच्या मोलकरणीला तिथेच बोलावतो. मग दोन अंकी गोंधळ चालू होतो. या प्रकारच्या सुखात्मिकेत पेचदार रचना आणि गतिमानता अत्यंत महत्त्वाची असते; परंतु ' प्रेमशास्त्र 'च्या रचनेमध्ये नेमका त्याचाच अभाव आहे. गोंधळाचे अनेक दुवे मुळात कच्चे आहेत वा रचनेत ते अर्धवट टाकले आहेत. प्रौढांसाठी हे बिरुद जाहिरातीत शेखीने मिरवणाऱ्या या नाटकात अनेक तमाशाशैलीतील पाचकळ विनोद आहेत. तरी शं. ना. नवऱ्यांच्या संवादलेखनामुळे पहिला दीड अंक मनोरंजक होतो.

अशा स्वरूपाच्या नाटकातील नेपथ्याची रचना ही प्रासंगिक विनोदाला अनुकूल असावी लागते. गौतम जोशींच्या अनेक दारे असणाऱ्या नेपथ्याने हे नेमके साधले आहे. या स्वरूपाच्या सुखात्मिकेत अभिनय करणाऱ्या कलावंताला एक विलक्षण मुक्तपणा अंगी बाणवावा लागतो. ' मंजू...मंजू 'मध्ये सरिता ही नटी हे विलक्षण कौशल्याने साधत असे. परंतु प्रस्तुत नाट्यप्रयोगात कृष्णकांत दळवी (संजय), लता म्हापसेकर (शोभा मेहरा) या दोघांच्या वावरण्यात जराही सहजता नव्हती. या दोन्ही कलावंतांचे चेहरे कमालीचे बथ्थड आहेत-शिवाय आपले काम झाले की नाटकातून निवृत्त व्हायची सवय असल्यामुळे सुखात्मिकेतील समूहाची कार्यक्षमता या नाटकात निर्माणच झाली नाही. सतीश दुभाषी यांनी बायकी हावभाव करणाऱ्या चतुरनामे ' इंटिरिअर डेकोरेटर 'ची भूमिका केली. या भूमिकेसाठी त्यांनी स्वत:साठी बायकी चाल निर्माण केली, एवढा तपशील वजा करता, त्यांनी ही भूमिका डाव्या हातानेच केली आहे. आशा पोतदारांच्या हालचाली इतक्या जड झाल्या आहेत की, त्यात सुखात्मिकेचा लवचिकपणा प्राप्त होणे अशक्यप्राय. त्या तुलनेने छोटू सावंत, सुरेश चिखले आणि विनोदमाला जोशी यांनीच नाटकाचा स्वभाव ओळखून आपआपल्या छोट्या भूमिका उभ्या केल्या.

दिग्दर्शक म्हणून सतीश दुभाषी या प्रयोगात अकल्पक भासले. संहितेतील मंद जागा खुलविण्याची विशेष जबाबदारी सुखात्मिकेच्या दिग्दर्शकावर असते, त्याचे त्यांनी भान राखलेले नाही.

तर असे हे ' प्रेमशास्त्र ', ' मंजू...मंजू ', ' सभ्य गृहस्थ हो ', ' वाजे पाउल आपुले ' यांसारख्या चांगल्या सुखात्मिकांना दाद न देणाऱ्या मराठी प्रेक्षकांनी सेन्सॉरच्या ' A ' बिरुदाला दाद दिली तरच चालू शकेल असे नाटक ! □

[ १० मेच्या माणूस अंकात ह. शि. खरात यांच्या 'डेथ ऑफ सेल्समन' या नाटकावरील परीक्षणात नाटकाच्या लेखकाचे नाव चुकून ऑर्थर मिलरऐवजी ऑर्थर कोएस्लर असे पडले आहे. क्षमस्व-सं. ] □

# शनिवारवाड्यात स्वामी

वि. भा. देशपांडे

शतक-महोत्सवी प्रयोग ही आपल्या सवयीची गोष्ट झाली आहे; पण शनिवारवाड्यात प्रयोग ही वेगळी वाटणारी गोष्ट. ' स्वामी ' चा शतक-महोत्सवी सोहळा इतिहासप्रसिद्ध शनिवारवाड्यात साजरा झाला. खास ऐतिहासिक थाटात.

शनिवारवाड्याचा दिल्लीदरवाजा विद्युत्-रोषणाईचे नेत्रसुख देत होता. नगारखान्यात प्रचंड आकाशकंदील लावलेले होते. या आकाशकंदिलांचा इतरत्रही वापर केला होता. तुतारीबरोबरच दाराशी सुशोभित हत्ती सर्वांचे स्वागत करीत होता. शोभेच्या दारूकामाने वातावरणात रंग भरण्यास अधिकच मदत होत होती. हे सारे बघणारांची आणि नाटकाला आत येणारांची प्रचंड गर्दी शनिवारवाड्यासमोर होती. त्यामुळे प्रयोग सुरू व्हायला अर्धा-पाऊण तास उशीर. दारापासून शामियान्यापर्यंत मराठेशाहीतील वातावरणाची आठवण करून देणारी मावळे मंडळी उभी होती. तिकीटतपासनीसही मावळ्याच्या पोषाखात. मजा वाटत होती. हजार-बाराशे प्रेक्षक बसतील असा शानदार शामियाना. आसपासच्या झाडांवर दिवे सोडलेले. आकाशकंदील तर होतेच. शामियाना तुडुंब भरलेला. ज्यांना जागा मिळाली नाही ते बाजूला ओट्यावर, दगडावर, जिथे जागा मिळेल तिथे उभे-बसलेले. प्रत्येकाच्या डोळ्यांत इतिहासाचा अभिमान-कौतुक. ज्या वास्तूत हे नाट्य प्रत्यक्ष घडले तिथेच प्रयोग पाहण्याचा योग. या वास्तूने पहिल्या बाजीरावापासून शेवटच्या बाजीरावापर्यंतच्या अनेकांचे अनेक रंग पाहिले. पराक्रमांची वर्णने ऐकली. मोठमोठ्या मसलती घडल्या. प्रेमाचे हळुवार नाजुक रंग पाहिले. अनेक जणांची शोकनाट्ये पाहिली. उन्माद पाहिला आणि

उद्ध्वस्तपणही पाहिले. अशा वास्तूत माधवरावांची शोकांत कथा पाहताना, संदर्भ ऐकताना वेगळेच वाटत होते. ते काहीसे भावविवश पद्धतीचे असेलही ! दूर उभे राहून विचार केला तर आता वेडेपणाचाही भाग वाटण्याचा संभव आहे. पण प्रयोगाच्या वेळी प्रेक्षकांच्या भावस्थितीत निर्माण होणारे विशिष्ट तरंग अमान्य करता येण्यासारखे नव्हते.

हा शतक महोत्सवी प्रयोग शनिवारवाड्यात करणे खर्चिक तर होतेच; पण परवानगी मिळविणे, इतर व्यवस्था करणे या दृष्टीने फारच त्रासाचे होते. पण हा सारा त्रास सहन करून जिद्दीने काही करवून दाखवण्याचा मोहन वाघ यांचा स्वभाव. या स्वभावात धडाडी आहे, आव्हान पेलण्याची ताकद आहे; याहीपेक्षा कलादृष्टी महत्त्वाची आहे. मोहन वाघ स्वत: कलावंत असल्याने प्रत्येक गोष्टीच्या मागे संयोजन होते, कलात्मकता होती. नुसतेच भाबडेपण नव्हते, फाजील इतिहासप्रेम नव्हते. याला आवश्यक ती सश्रद्ध वृत्ती होती. मोहन वाघांचे हे वेड प्रचंड खर्चाचे होते. सोळा हजारांचा खर्च झाला. मिळकत झाली फक्त दहा हजारच. केवळ जाहिरात किंवा प्रसिद्धी एवढ्याचसाठी हे होते असेही वाटले नाही. कारण स्वामीच्या पहिल्या प्रयोगालाच शंभरावा प्रयोग शनिवारवाड्यात करण्याचे वाघांनी जाहीर केले होते. पहिल्या प्रयोगाच्या वेळी आपल्या नाटकाचा शंभरावा प्रयोग व्हावा असे प्रत्येक निर्मात्यालाच वाटत असते; पण फारच थोड्यांना तिथपर्यंतचा प्रवास घडतो. वाघांना तो प्रवास घडला. जे ठरवले ते घडले याला निश्चितच अर्थ आहे.

प्रयोगाची रंगत नेहमीप्रमाणेच होती. नंतर निमंत्रितांना पेशवाई पद्धतीचे पंचपक्वान्नांचे जेवण. पहाटे तीन वाजता. अगदी सनईच्या सुरात. तर असा हा पेशवाई थाटाचा 'स्वामी' सोहळा दीर्घकाळ स्मरणात राहणारा.

□

# वारणानगरचे बालकलाकार

पडदा उघडतो तेव्हा तीस–चाळीस मुले–मुली निरनिराळी वाद्ये हातात घेऊन सज्ज होती. तेरा–चवदा वर्षांच्या एका पाणीदार डोळ्यांच्या सतेज मुलाने हातात माईक घेऊन स्पष्ट आणि ओघवत्या शब्दात निवेदनाला प्रारंभ केला. आणि थोड्याच वेळात वाद्यवृंदाने स्वरमालिका सादर करून रसिकांची मने आकर्षित केली.

स्वरमालिकेपाठोपाठ कलावती राग, सावरकरांचे स्वतंत्रतेचे स्तोत्र, पिंजरा, आवारा, कम सप्टेंबर इत्यादी चित्रपटांतील गाणी एकामागून एक सादर होत होती. एका गाण्यानंतर दुसरे गाणे सुरू होताना थोडेसे निवेदन. कोणत्याही प्रकारचा गोंधळ नाही, गडबड नाही. सारे कसे सहजपणाने घडणारे होते. हा सारा चमत्कार वारणानगरच्या बालकलाकारांनी बालगंधर्व रंगमंदिरात घडवला. या वाद्यवृंदात चार ते चौदा वयाच्या गटातील मुले-मुली आहेत. अशी एकूण शंभर मुले तयार झालेली आहेत. त्यांपैकी चाळीस मुले प्रत्यक्ष कार्यक्रमात होती.

या साऱ्या मुलांना सुराची आणि लयीची जाण पक्की होती. अर्थात ती असल्याशिवाय हे सारे अशक्यच आहे. केवळ या मुलांना वाद्यांचे ज्ञान मिळाले होते आणि त्या बळावर ती वाद्ये वाजवीत होती असे नव्हते, तर मिळालेल्या ज्ञानातून सुरांची आंतरिक ओढ लागलेली होती. कोठे तरी त्या मुलांना सर्व स्वर-रचना नेमक्या कळलेल्या होत्या. त्यातूनच ती अनेक रचना सादर करू शकत होती.

हा सारा चमत्कार घडवणारा माणूस म्हणजे संगीतदिग्दर्शक शंकरराव कुलकर्णी. पूर्वी प्रभात फिल्म कंपनी वगैरे ठिकाणी काम केलेला हा माणूस, स्वत:चा मुलगा वारणानगरला शिकायला असल्यामुळे तिथे गेला. तिथे राहिल्यावर सुरुवातीला चार-पाच मुलांना वाद्याचे शिक्षण द्यायला सुरुवात झाली. त्यांना गोडी लागली. हळूहळू मुलांची संख्या वाढू लागली. मुलांत वाद्यांचे आणि शंकररावांचे आकर्षण जबरदस्तपणाने निर्माण झाले. ही संख्या शंभराच्या घरात गेली. तिथल्या शाळेच्या वेळात चाळीस–पन्नास मिनिटांचा स्वतंत्र तास ठेवून संगीताचे शिक्षण सुरू झाले. तो वेळ अपुरा पडायला लागला म्हणून ज्यांना शिकायची इच्छा असेल त्यांना शनिवार-रविवारही शिकवणे सुरू झाले. एखाद-दुसरा अपवाद वगळता ज्यांच्या घरात संगीताचे पूर्वसंस्कार नाहीत, संगीताचे वातावरण नाही अशा स्वच्छ मनाच्या मुलांवर संगीताचा संस्कार करणे एका अर्थी सोपे होते आणि अवघडही ! अवघड अशा अर्थाने की, चार वर्षांच्या मुलाला वाजवायचे वाद्य पेलणेही कठीण, त्या वयाला संगीताची भाषा समजणेही कठीण; पण शंकररावांनी मुलांचे वय, परिस्थिती ध्यानात घेऊन जिद्दीने या नगरीत हा चमत्कार घडवला. शंकररावांचा उत्साह पाहून वारणेचे दानशूर तात्यासाहेब कोरे यांनी प्रचंड प्रमाणात आर्थिक बळ निर्माण केले. या वाद्यवृंदात ३८ प्रकारची १०० वाद्ये आहेत. आज त्यांची किंमत जवळजवळ लाखाच्या घरात जाईल. आज वारणानगरी ही जादूची नगरी झाली आहे. सुरांची नगरी झाली आहे. एरवी तिथल्या एखाद्या मुलाकडे पाहून तो पोरगा तबला–सतार किंवा आणखी काही वाजवण्यात तरबेज आहे याची कल्पनाही येणार नाही. मोठ्यांचे पाहून आईच्या कडेवरची, रांगती मुलेही वाद्यांचे आवाज ऐकून वादकांच्या भोवती जमा होतात. तिथेच रेंगाळतात, घोटाळतात. त्यांनाही अधिक गोडी निर्माण व्हावी म्हणून त्यांच्यासाठी शंकररावांनी छोटी छोटी वाद्ये निर्माण केली आहेत.

एकाच वेळी इतक्या मुलांना सुराची–लयीची जाण निर्माण करून त्यांच्याकडून अडीच–तीन तासांचा कार्यक्रम बसवून घेणे हा एक संगीतक्षेत्रातला चमत्कारच आहे. चमत्कार हा शब्द अतिशयोक्तीपूर्ण वाटेल; पण त्याची साक्ष तो कार्यक्रम प्रत्यक्ष ऐकल्याशिवाय पटणार नाही. हा कार्यक्रम टी. व्ही. द्वारा लोकांपर्यंत पोहोचायला हवा. परदेशांत जायला हवा. जेवढे म्हणून शक्य असेल तेवढे याचे गुणगान व्हायला हवे. शहरातून या वाद्यवृंदाचे प्रयोग करणे खर्चिक आहे. म्हणूनच ज्याला अस्सल संगीताची ओढ आहे त्याने कोल्हापूरजवळच्या या वारणानगरीला, खरे तर या संगीतनगरीला जायला हवे. ऐकायला हवे. तोच त्या कलाकारांचा खरा सत्कार आहे.

□

# साप्ताहिक भविष्य

## कृष्ण माईणकर

### २४-५-७५ ते ३०-५-७५

### देवकांत बारुआ व इंदिरा गांधी यांच्यात दुरावा

पतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी व परराष्ट्रमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण यांची राष्ट्रकुल परिषदेतील उपस्थिती व त्या परिषदेत त्यांनी ठासून मांडलेली भारताची परराष्ट्रनीती या दोघा नेत्यांचे आणि त्याचबरोबर भारताचे जागतिक महत्त्व उंचवण्यातच निश्चितपणे होईल. अमेरिका-भारत, व चीन-भारत यांच्या संबंधांत थोडी अनुकूल सुधारणा या आठवडयात दिसू लागेल. अमेरिकेचे अध्यक्ष फोर्ड यांच्या भारतविषयक धोरणात अनुकूल फेरविचारांचे वारे वाहू लागतील. पण भारत व पाकिस्तान अजून शनीच्या साडेसातीत वावरत असल्यामुळे अजून तरी काही काळ शत्रुत्वाचेच नाते राहाणार आहे. महाराष्ट्रात सरकारी नोकरांच्या संपप्रकरणी मुख्य मंत्री शंकरराव चव्हाण व मंत्रिमंडळातील त्यांचे सहकारी यांच्यात मतभेदाची दरी निर्माण होण्याची शक्यता आहे. सौ. शालिनीबाई पाटील या वेळी 'वादग्रस्त' म्हणून राजकीय रंगमंचावर गाजतील. मुंबई कॉंग्रेस व महाराष्ट्र कॉंग्रेस यांच्यात भांडणाची चाहूल लागेल. पण याहीपेक्षा कॉंग्रेसचे अध्यक्ष देवकांत बारुआ व श्रीमती गांधी यांच्यात दुरावा निर्माण होणाऱ्या घटना हीच महत्त्वाची घटना या आठवडयात ठरावी.

**मेष : कणखरपणा हवा**

या वेळेची ग्रहरचना तुम्हाला मोठे सामर्थ्य बहाल करणारी आहे. जे जे मनात असेल, जे जे करावे असे वाटेल त्याला त्याला योग्य वातावरण तयार करून देणार आहे ही ग्रहरचना. तुम्ही सरकारच्या अंमलबजावणी खात्यात असाल किंवा खाजगी नोकरीत तुम्ही मालक वा मालकांचे पी. ए. असाल तर या वेळी तुमच्या हातून फार मोठी महत्त्वाची कामगिरी होणार आहे. तुमचे भवितव्य उजळून टाकणे हीच या वेळी तुमच्यासमोर संधी येत आहे. सोमवार ते गुरुवार घरगुती आर्थिक व्यवहार सुरळीत पार पडतील. तरुण-तरुणींनी प्रेमात स्वतःचा वेळ वाया घालवू नये. त्याचप्रमाणे लेखी व्यवहारात गुंतू नये. महिलांना माहेरची प्रॉपर्टी मिळू शकेल शुभांक ५-९-१२.

**वृषभ : वैताग संपले**

तुमच्या मनात घर करून बसलेली आशा-निराशा निर्माण करणारी कोंडी या वेळी मोकळी होणार आहे. तुम्ही नोकरी सोडून धंदा करावा याला माझी मान्यता नाही. कारण तुम्ही भावनावश वृत्तीचे आहात. चार माणसे जोडण्याचे कसब तुमच्यापाशी नाही. म्हणून नोकरीत मिनतवारीने रस घ्या. वरिष्ठांची तुमच्यावर मर्जी राहील. सोमवार धार्मिक कार्याला शुभदायक आहे. बुधवार महत्त्वाच्या कामाचा पत्रव्यवहार करा. या आठवडयात स्वतंत्र असा नवा उद्योग कोणताच करू नका. चालू उद्योगात एखादा भांडवल गुंतवणारा माणूस तुम्हाला ऑफर देईल. पण त्यात एवढा सरळपणा असणार नाही. जपूनच स्वीकार करावा. नवे वाहन शनिवारी आणू शकता. महिलांच्या नावे वारसा हक्काने संपत्ती मिळेल. शुभांक ९-१०-१२.

**मिथुन : परिवर्तनाचा शुभारंभ**

दुसऱ्या साडेसातीच्या कालखंडाचा आता अगदी फार थोडा काळ राहिला आहे. आता सारे कसे सुसंगत घडणार आहे. सोमवारपासून तुमच्या भावी जीवनाचे धागे प्रसन्नतेच्या वातावरणात गुंफले जातील असा एखादा प्रसंग घडेल. नोकरीत तुमच्या कर्तृत्वाबद्दल तुमच्या वरिष्ठांच्या अगर पालकांच्या मनात फार मोठ्या आशा निर्माण होऊन तुम्हाला प्रमोशन मिळेल. तुम्ही संपात भाग घेतला असेल तर त्याबद्दल वरिष्ठांच्या मनात तुमच्याबद्दल गैरसमज राहाणार नाही. ही तुमची जमेची बाजू आहे. परदेशप्रवासाचा पत्रव्यवहार तुम्ही करा. यश येईल. तुमच्यापैकी जे जे लेखक असतील त्यांनी आपल्या नव्या कलाकृतींचा शुभारंभ या आठवडयात मंगळवारी करावा. विवाहेच्छू व्यक्तींनी विवाहाचा प्रयत्न करायला हरकत नाही. महिलांना संसारात महत्त्वाचे स्थान मिळणार आहे. नोकरीत सुख. शुभांक ६-७-१२

**कर्क : विवाहाचा प्रश्न सुटेल**

तुम्ही कर्क राशीच्या व्यक्ती याच आठवडयापासून अनेकांच्या कौतुकाचा विषय बनणार आहात. तुमचे नाव सार्वजनिक ठिकाणी गाजणार आहे. कारण रवि तेवढासा अनुकूल नसला तरी मंगळ व गुरु उत्तमच आहेत. या आठवडयात आजवरचे तुमचे सारे अपयश धुऊन निघणार आहे. नोकरीत तुमचा वनवास संपून नवे आशावादी पर्व सुरू होणार आहे. बढती-प्रमोशनचा तुमचा मारलेला क्लेम आता तुम्हाला सहज मिळणार आहे. विज्ञान, वाणिज्य संशोधन यांच्या पदव्या मिळालेले पदवीधर या वेळी जिंकतील. बेकार असलेला एखादा कनिष्ठ सरकारी अधिकारी होईल. रविवारी महत्त्वाच्या व्यक्तीला भेटायला अनुकूलता आहे. गुरुवारी उपासकांना साक्षात्कार होईल. अत्यानंद होईल. महिलांना मंगल कार्यात नेतृत्व मिळेल. घरच्या उद्योगात पैसा मिळेल. शुभांक ३-७-१०

**सिंह : सावधगिरीमुळे फायदा**

सिंहराशीचा स्वाभिमानी गुणधर्म तुमच्यात प्रमुख असतो. तो तसा असणे हेच सिंहराशीचे खास वैशिष्टय आहे. मित्र हो, लवकरच तुम्ही साडेसातीच्या फेऱ्यांत सापडणार आहात, पण तुमच्या स्वाभिमानी मनाला कुणीही डंख करू शकणार नाही याची खात्री बाळगा. विरोधक या आठवडयांत तुमच्या विरोधी कारस्थाने रचतील खरे. पण त्यात त्याना यश येणार नाही. राजकारणात तुमचे स्थान डळमळित करण्याचा प्रयत्न झाला तरी त्याने तुमचे काही नुकसान होणार नाही. आर्थिक स्थिती सुधारेल. नोकरीत मात्र थोडीफार सावधगिरी बाळगावी लागेल. काही तरी वेळ मारून नेण्यासारखे वागू नका. एकंदर आजुबाजूचे वातावरण पाहा. कुणावर विश्वास ठेवू नये. तुमच्यापैकी कुणी विवाहाच्या प्रयत्नात असेल तर त्याला फार प्रयत्न करावे लागतील. महिलांना नोकरीचा कंटाळा येईल. शुभांक ७-११-१२

**कन्या : सुधारणेचा शुभारंभ**

गेले काही दिवस तुमची मनःस्थिती भलतीच बिघडली होती. संतापी वागणे, घरात मुलां-बायकोवर चिडणे, उगाच

स्वतः कुढत बसणे असे सारखे घडत आहे. पण मित्रांनो, आता तुम्हाला छळणाऱ्या ग्रहांची 'बदली' झाली असल्यामुळे तुम्ही आता सुटकेचा श्वास सोडायला हरकत नाही. सातवा गुरु सध्या तुमच्यावर बराच खूष आहे. त्याने तुमच्यावर नियंत्रण ठेवले आहे व तोच आता तुमच्या घरात सलोख्याचे-प्रेमाचे वातावरण निर्माण करणार आहे. त्याचा प्रत्यय या आठवड्यापातून येऊ लागेल. शनिवार, बुधवार व शुक्रवार कामाचा ताण घरात वाढेल; पण घरात आवडते पाहुणे येऊन दिवस अगदी मजेत जातील. हे अत्यंत चांगले दिवस आहेत. नोकरीत एकंदरीत कामाचा व्याप कमी होईल. वरिष्ठांचे गैरसमज दूर होतील. या आठवड्यात विवाहेच्छूंचे विवाह जमणार आहेत किंवा होणार आहेत ही शुभवार्ता सांगायला मला आनंद वाटतो. महिलांनी घरात सुख आणि शांती नांदण्यासाठी पतिराजांची मर्जी सांभाळून वागावे. शुभांक ३-४-१०

**तूळ** : दडपणाखाली वागाल

दैव माणसांना काही काही वेळा सरळपणाने वागूच देत नाही. काही तरी सतत माणसाच्या डोक्याला भुणभुण लावीत असते. या आठवड्यात याचाच अनुभव तुम्हाला घ्यावा लागेल. कारण गुरु शुक्रस्थानी आहे हा काही तुमच्या बाबतीत शुभयोग नव्हे. उलट हर्षलगुरूचा षडाष्टक योग तुम्हाला स्वस्थ बसू देणार नाही. कोणतेही काम करा, कोठेही जा तुमचे मन दडपणाखाली राहील. तुम्ही आपल्या कुलदेवतेची रोज उपासना करीत जा. त्यामुळे तुमची सर्व कामे व्यवस्थित पार पडतील. रविवारी दुय्यम व्यवसायाला अनुकूल अशी घटना घडेल. त्यासंबंधी बोलणे करायला योग्य अशी व्यक्ती अगदी सहजपणे तुमच्या सहवासात येईल, सोमवार ते गुरुवार चालू नोकरीत कामाचा ताण वाढेल. एखादे जुने प्रकरण डोके भणाणून सोडील. पण ही थोडी दगदग सोडली तर एरवी आठवडा तसा प्रतिकूल नाही. कला, वाणिज्य व कृषि या शाखांच्या पदवीधरांना चांगली नोकरी मिळू शकेल. त्यांना स्वतःचा धंदा सुरू करायला देखील उत्तम योग आहे. तरुण-तरुणींनी प्रेमात पडू नये. महिलांना नोकरीच्या क्षेत्रांत कर्तबगारी दाखवायला उत्तम संधी मिळेल. शुभांक १०-११-१२

**वृश्चिक : यशस्वी वाटचाल**

राशिस्वामी मंगळ अशा जागी आहे की या वेळी जे घडवाल व जे ठरवाल ते भावी काळाचे यशस्वी सुवर्णकण तुमच्या जीवनात निर्माण करणारे ठरेल. अजून बारावा हर्शल अधूनमधून अकस्मात त्रास देत राहाणारच आहे. पण त्यामुळे तुमचे काही नुकसान होणार नाही. नोकरीच्या दृष्टीने या आठवड्याची सुरुवात निश्चितपणे तुम्हाला आनंद देणारी ठरेल. चालू नोकरीतील कामात बदल होऊन तुमचा दर्जा व अधिकार वाढेल. बेकार असलेल्या व्यक्तीची अनेक दिवस चाललेली भटकंती फळास येईल. त्यांना मिळणारी नोकरी जरी तात्पुरती असली तरी त्याच्याबद्दल आशा निर्माण करणारी ठरेल. या वेळी आणखी एक महत्त्वपूर्ण अशी घटना घडेल ती म्हणजे सरकारप्रणीत एखाद्या शिष्टमंडळात तुमचा समावेश होऊन तुम्हाला परदेशपर्यटन करण्याची संधी मिळेल. नवा उद्योग अवश्य सुरू करा. परिस्थितीनुरूप ज्यांना लहान प्रमाणात छोटा उद्योग सुरू करावयाचा असेल त्यांना संधी आहे. राजकारणात मात्र तुम्ही न पडणे चांगले. ज्यांचे विवाह लांबणीवर पडत होते किंवा अडथळे निर्माण होत होते त्यांचे विवाह ठरतील. महिलांना वरिष्ठ प्रतीच्या नोकऱ्यांत महत्त्वाचे स्थान मिळेल. शुभांक १०-१२-१.

**धनू** : राहत्या जागेत सुख

तुमच्यामागच्या अनेक कटकटी या आठवड्यापासून कमी कमी होऊ लागणार आहेत. तरी पण कोणत्याही परिस्थितीत अतिरेक होऊ देऊ नका. धाडस, बेधडकपणा, स्पष्टवक्तेपणा असल्या शब्दांच्या आहारी जाऊन वागण्यात हितापेक्षा अनहितच होण्याची शक्यता आहे. चौथा गुरु-मंगळ तुमच्या भावनेला धक्का देत राहणार आहे. मन मधून मधून उद्विग्न होईल. पण ही परिस्थिती फारच थोडा काळ टिकेल. कारण तुमची विवेकशक्ती त्या वेळी जागी होईल. रविवार निष्क्रिय जाईल. सोमवार ते गुरुवार नोकरीत किरकोळ मतभेद, त्रास संभवतो. उगाच धाकधूक वाटत राहील. तुम्ही वरिष्ठ जागेवर अधिकारी असाल तर हाता-




पूर्णिया
अनिल अवचट
किंमत : सहा रुपये

शनवारवाड्यातील
शमादान
ब. मो. पुरंदरे
किंमत : साडेतीन रुपये

राजहंस प्रकाशन
पुणे ४११ ०३०


खालच्या माणसांशी जुळवून घेऊन वागा. बोलण्यावर ताबा ठेवा. तुमच्या राहत्या जागेच्या बाबतीत स्थलांतराचा योग आहे. पण जे घडेल ते अंतिम हिताचे ठरेल. प्रेम, विवाह वगैरे सध्या पुढे ढकला. महिलांना घरात सुख मिळेल. कौटुंबिक आनंदाचा लाभ होईल. शुभांक ६–९–१२.

**मकर : चांगले मित्र लाभतील**

गुरु-मंगळाची तुमच्यावर भरपूर कृपा आहे. त्यामुळे आता तुम्ही कोणत्याही अडचणीवर मात करू शकाल. मित्र व नातेवाईक यांचे सहकार्य तुम्हाला मिळणार असून त्या सहकार्यामुळे तुम्ही कोणत्याही समस्येला तोंड देऊ शकाल. राजकारणात या वेळी तुम्हाला मोठा रस घ्यावा लागेल. आकस्मिकपणे तुमचे नाव पुढे येईल. परदेशी प्रवासाचा योग येईल, पण तो प्रत्यक्षात घडणे अशक्य आहे. आयत्या वेळी माघार घ्यावी लागेल. तुम्ही मोठे व्यापारी, कारखानदार अगर सौंदर्यप्रसाधनांचे उत्पादक असाल तर सरकारकडून तुम्हाला निर्यातीचा परवाना मिळू शकेल. इंजिनिअर्स, कृषिपदवीधर, आर्किटेक्ट यांना स्वतःचा व्यवसाय करण्यासाठी भांडवल मिळू शकेल. तुम्ही तुमच्यासाठी अगर वाहतुकीसाठी स्वतःचे वाहन खरेदी करणार असाल तर त्याला अनुकूलता आहे. कापडव्यापार मात्र नव्याने सुरू करू नका. धंद्यात नुकसानीची शक्यता आहे. नोकरीत असलेल्यांनी काळजीपूर्वक काम करावे पैशाची परिस्थिती साधारणच राहील. वैवाहिक जीवनात काही अडथळ्यांना तोंड द्यावे लागेल. महिलांना पतीशी जमवून घ्यावे लागेल. हट्ट ठेवू नये. शुभांक ५–६–१०.

**कुंभ : प्रगतिकारक घटना**

गुरूचा किंवा मंगळाचा बदल झाला असला तरी त्याने तुम्हाला भिण्याचे कारण नाही. ते तुमचे काहीही वाईट करू शकणार नाहीत. मात्र हा आठवडा तसा थोड्याफार प्रमाणात संघर्षाचाच जाईल. विशेष करून तुम्ही जर राजकीय सत्तेच्या प्रांगणात असाल तर या वेळी तुम्हाला विरोधकांच्या खऱ्या-खोट्या टीकेला तोंड द्यावे लागेल. तुमच्यावर विरोधकांकडून मन दुखावणारे आरोप केले जातील. पण त्यामुळे तुम्ही उजळूनच निघाल. या आरोपांतून तुमची सहीसलामत सुटका होईल. असे असले तरी तुमच्या कर्तृत्वाला संधी व उठाव मिळणारा असा हा आठवडा आहे. रसायने, लोखंडी व पोलादाचे उद्योग, निरनिराळी तेले यांच्या उद्योगात गुंतलेले मालक व नोकर संतुष्ट होतील अशीच या आठवड्यातील प्रगतीला संधी आहे. सरकारी नोकरीत बढती, प्रमोशन मिळेल. खाणीत काम करणारे मजूर या वेळी खुषीत असतील. त्यांना पगारवाढ मिळेल. सोमवार ते बुधवार विशेष महत्त्वाच्या घटना घडतील. राजकारणात चलती सुरू होईल. महिलांच्या बाबतीत नोकरीविषयक सवलती मिळू शकतील. प्रयत्न करावा. शुभांक ६–७–१२.

**मीन : अधिकारांत वाढ**

नोकरीच्या दृष्टीने हा आठवडा विशेष महत्त्वाचा ठरावा. मंगळ व गुरु यांच्या सहवासात तुमचा चंद्र आहे व ते तुम्हाला कर्तृत्व बहाल करीत आहेत. प्रामुख्याने वृत्तपत्रकर्मचारी, प्रोफेसर, संशोधक, धर्मसंस्कृतिपीठांचे चालक व नोकर यांना हा आठवडा उत्तम आहे. संपात असलेले सरकारी नोकर आपल्या वरिष्ठांच्या रोषास अपात्र ठरणार नाहीत हाही त्यांचा फायदाच समजावा लागेल. पदवीधरांची बेकारी या वेळी संपणार आहे. अनेकांना नोकरी अगर उद्योग मिळणार आहे. व्यापार, उत्पादन होणारा उद्योग या वेळी सुरू करू नये. कौटुंबिक जीवनात काही आनंददायक घटना घडतील. विशेष करून स्त्रीला मातृत्वाचा व पुरुषाला पित्याचा आनंद मिळणार आहे. पुत्रजन्माचा आनंद होईल. प्रवास मात्र या वेळी रद्द करावा. पत्रव्यवहारात वेळ वाया दवडू नये. सर्वसामान्यदृष्ट्या हा आठवडा अनुकूल असाच आहे. मानसिक स्थिती तर प्रसन्न राहील. महिलांना वरिष्ठ दर्जाच्या नोकरीत महत्त्वाचे स्थान मिळेल. शुभांक ६–८–१०. □

# प्रिया तेंडुलकर

पृष्ठ १२ वरून

–' इतर कोणाही नाटककाराला मी कमी लेखत नाहीच. माझं वाचन अगदी खूप आहे असं नाही आणि माझा एकूण अनुभवही वयाच्या मानाने, म्हणजे कमीच आहे. तेव्हा कोणत्याही नाटककारावर किंवा त्याच्या नाटकांवर मी कोणत्या अधिकाराने बोलू शकते ? '

—' एक सर्वसामान्य वाचक किंवा प्रेक्षक ह्या नात्याने तर तू मतप्रदर्शन करू शकतेस–'

–' इतर नाटककार खरं लिहीत असतीलही किंवा ते खरचं लिहितात; पण आपण स्पेसिफिकली तेंडुलकरांवर बोलतो आहोत तेव्हा इतरांचा विचार बाजूला ठेवू या. तेंडुकरांचा विचार विशिष्ट पद्धतीने ' मला स्वत:ला ' जास्त अपील होतो, भिडतो–'

–' बरेच वाचक, प्रेक्षक आणि तथाकथित संस्कृतिसंरक्षक ह्यांच्या दृष्टीने तेंडुलकर हा एक ' भडक ' नाटककार आहे. ह्याबद्दल तुझं मत काय ? '

–' तेंडुलकरांची भडक म्हटली जाणारी नाटके वस्तुत: अगदी सरळ-साधी, रोजच्या जीवनातलीच आहेत, हेच अद्याप त्या लोकांना समजतच नाहीय. स्पष्टच बोलायचं, तर तेंडुलकरांची नाटकं अॅक्सेप्ट करण्याइतपत सगळे वाचक-प्रेक्षक अजून तयार झालेलेच नाहीयेत—'

– ' मग ह्यातून निष्पन्न काय काढायचे ?'

– ' पन्नास-साठ वर्षांपूर्वी ' लेडी चॅटर्लीज् लव्हर ' ह्या कादंबरीवर तुफान वादळ उठलं होतं. आज ती कादंबरी वाचताना, असं वादळ उठण्याजोगं, काही वावगं निदान मला तरी वाटलं नाही –'

– ' म्हणजे तुला असं म्हणायचंय का, की तेंडुलकर पन्नास वर्षांनी जन्माला आले असते, तर त्यांची नाटकं सगळ्या वाचक-प्रेक्षकांना रुचली असती, मानवली असती, त्यांच्या पचनी पडली असती –'

– ' कोण जाणे –' ओठ मुरडत प्रिया म्हणाली– ' पन्नास वर्षांनी तरी साऱ्या लोकांची मने शंभर टक्के निर्मळ वास्तवाला सामोरे जाण्याइतकी तयार झालेली असतील का नाही ते ! '

–' असं जर म्हणतेस, तर मग प्रश्न पडतो की जे लोकांना साधारणत: स्वीकारता येत नाही, ते लिहिलं जावं का ? बऱ्याच लोकांच्या मते तेंडुलकरांचे लिखाण–काही विशिष्ट लिखाण–असू नये इतके भडक आहे. त्या लोकांना वाटते की असल्या भडक नाटकांचा समाजावर अनिष्ट परिणाम होण्याची शक्यता आहे. आपण उदाहरणच घेऊ या. तू जर अगदी खरं बोलणार असशील तर तुझंच उदाहरण घेऊ. तू तेंडुलकरांची ' सखाराम बाइंडर ', ' गिधाडे ' ही नाटकं वाचली असणारच–'

– ' हो '

– ' तू ' गिधाडे ' केव्हा वाचलंस ? '

– ' आठवीत असताना. तेव्हा मी तेरा वर्षांची होते. सई परांजपेकडून दिल्लीहून स्क्रिप्ट आणताना प्रवासात मी ' गिधाडे 'ची मूळ प्रत वाचून काढली–' प्रिया.

– ' मग त्या कोवळ्या वयात तुझ्यावर त्या नाटकाचा काय परिणाम झाला ? पक्षपातीपणाने बोलू नकोस किंवा तेंडुलकरांची वकिलीसुद्धा करू नकोस, अगदी खरंखुरं उत्तर दे–'

– ' अगदी खरंच सांगते, माझ्यावर त्या नाटकाचा काहीच परिणाम झाला नाही. फक्त चार-पाच नवीन शिव्या त्या नाटकामुळे मला माहीत झाल्यात. बस्स् ! '– प्रिया उद्गारली–थंडपणे–अतिशय प्रामाणिकपणे ! तिच्या शब्दांतला खरेपणा थेट मेंदूपर्यंत जाऊन भिडला ! ... ' आम्ही खारला राहायचो, तेव्हा आमच्या वरच्या मजल्यावर राहणारे कुटुंबच तेंडुलकरांनी ' गिधाडे ' नाटकात रंगवले आहे. मला त्या नाटकात भडक असे काही वाटले नाही. ' गिधाडे ' फक्त प्रौढांसाठी आहे, आणि आम्हा लहान मुलांना त्या नाटकाला जाता येणार नाही हे ऐकून मला आश्चर्य वाटले. पण म्हटले हरकत नाही. घरातले इतर जण नाटकाला गेल्यावर मी माझ्या बहिणींना ' गिधाडे 'ची गोष्ट सांगितली–' प्रिया बिनधास्त बोलत होती.

– ' तुला–तुला त्यात काहीच–म्हणजे–आय् मीन...?'

– ' मला काहीसुद्धा वाटले नाही. अॅब्सोल्युट्ली नथिंग! –' प्रिया बेधडक बोलली– ' कारण ' गिधाडे ' खरे आहे हे मला माहीत होते. बाबांनी लिहिलेला सखाराम बाइंडरसुद्धा तितकाच अस्सल आहे, ह्या जमिनीवरचा आहे, त्याला ह्या इथल्या मातीचा स्पर्श आहे. इतकी खरीखुरी, जिवंत पात्रे निर्माण करणारे तेंडुलकर हे एक खरंच खूप ग्रेट नाटककार आहेत...'

...विजय तेंडुलकर कोणाला खरोखर ग्रेट वाटतात, तर कोणी त्यांना ' ग्रे ऽ ट ' म्हणतात. पण त्यांची ही सुकन्या मात्र एकमताने ग्रेटच ठरणार असे दिसते. ती ग्रेट अभिनेत्री होते, ग्रेट दिग्दर्शिका होते, ग्रेट छायाचित्रकार होते, ग्रेट चित्रकार होते, ग्रेट कवयित्री होते की ग्रेट अभिनेत्री दिग्दर्शिका-चित्रकार-छायालेखिका-कवयित्री होते हीच उत्सुकता आहे ! □ □


बॉम्बे डाइंग

एकमेव वितरक

पराग

डेक्कन जिमखाना, ● लक्ष्मी रोड, पुणे

आज आपल्यासाठीं

खास नवीन प्रकार

स्वस्त दरात

बेल बॉटम पिसेस

कुडता पिसेस

# झिलमिल सितारे

अरुणा अंतरकर

# मंगेशकर मिरासदारीच्या निमित्ताने

हिंदी रजतपटावरची सर्वश्रेष्ठ खलनायिका कोण ?
तुम्ही दोन पिढ्यांमागचे प्रेक्षक असाल, तर या प्रश्नाचं उत्तर आहे– कुलदीप कौर.
तुम्ही एका पिढीमागचे प्रेक्षक असाल, तर या प्रश्नाचं उत्तर आहे शशिकला.
तुम्ही आजच्या पिढीचे प्रेक्षक असाल, तर या प्रश्नाचं उत्तर कदाचित बिंदू ठरेल.
तुम्ही ' फिल्मफेअर 'चे वाचक असाल तर मात्र या प्रश्नाचं उत्तर आहे– लता मंगेशकर ! ! !
लता मंगेशकरनं ' फिल्मफेअर 'च्या वाचकांचं काय घोडं मारलं आहे ?
छे छे ! या वाचकांचं तिनं काही घोडं मारलेलं नाही. त्यांच्या मते लता नव्या गायिकांचं घोडं मारते आहे. मंगेशकर भगिनींनी सिनेसंगीतात मक्तेदारी निर्माण केली आहे, त्यांच्या राजकारणी डावपेचांमुळे बिचाऱ्या नव्या गायिकांना माइकसमोर यायची संधीच मिळत नाही. उमलण्यापूर्वीच कित्येक गानकलिका कोमेजून जात आहेत– नव्हे नव्हे ! या दुष्ट मंगेशकर भगिनी त्यांना खुडून टाकत आहेत, असा फि. फे. वाचकांचा दावा आहे. त्यांच्या या न्यायालयात प्रमुख आरोपीच्या पिंजऱ्यात उभी आहे अर्थात लता. आशावर त्या मानानं रोष कमी दिसतो.
' फिल्मफेअर ' हे इंग्रजी पाक्षिक. तेव्हा बाकीच्या कोणत्याही भाषिक वाचकांपेक्षा यांचा बोलण्याचा अधिकार मोठा. शिवाय या आद्य, सुबुद्ध, दर्जेदार (इ. इ. इ.) सिनेपाक्षिकाचे वाचक प्रागतिक दृष्टिकोनाचे आणि परखड बोलणारे असं त्यांचं स्वतःचंच मत आहे. शिवाय परखड बोलणं- पुढचा–मागचा विचार न करता बोलणं, हा अर्थ सध्या मान्य झाला आहे. आता तुमच्यासारखे सुज्ञ जन त्याला तोंडाला येईल ते भकणं असं साधं-सोप्पं बोलतात ते सोडून द्या. अशा सुबोध बोलण्यामुळेच तुम्हा–आम्हाला सामान्य जन म्हटलं जातं हे लक्षात असू द्या.
पण ' फिल्मफेअर 'चे वाचक हे तुमच्या-आमच्यासारखे सामान्य अज्ञ जन नव्हेत. जनताजनार्दन हे तो श्रीसमान मानणाऱ्या ' फि. फे. 'नं वाचकांच्या पत्रव्यवहाराला अग्रस्थान देण्याचा आपल्या लोकशाहीला साजेसा पायंडा पाडला आहे. या चित्रसज्जात बसून त्यांचे बुद्धिवैभवसंपन्न वाचक यक्षनगरीतल्या एकेक असामीची अशी भंबेरी उडवीत असतात म्हणताय. सध्या त्यांचा रोख या गंधर्व-किन्नर मंडळींकडे वळला आहे.
उच्च अभिरुचीच्या या चोखंदळ रसिकांचं शरसंधानही तसंच असतं. आता ' तसंच ' म्हणजे नेमकं कसं ? असं तुम्ही विचारणार. तर त्यांच्या हुशारीनं दिपल्यामुळं ' तसंच ' म्हणून आम्ही आमच्या तोटक्या शब्दसामर्थ्यावर पांघरूण घालतोय हे लक्षात असू द्या. अमुकतमुक गोष्ट फारच ' ही ' आहे म्हणण्यापैकीच हा प्रकार आहे. त्यापेक्षा या थोर मंडळींचे थोर बोल ऐकवून तुमची श्रवणेंद्रियं धन्य करण्याचं पुण्य पदरी बांधणं अधिक चांगलं.
जयपूरच्या डॉ. एस. के. अग्रवाल यांचं म्हणणं, लतानं आता गाणंच बंद करावं. कारण तिला साधे शब्दोच्चार नीट करता येत नाहीत. ' कभी ' या शब्दाचा उच्चार ती ' कबी ' असा करते. ' काय हे दीनानाथराव ? लहानपणीच लेकीला उर्दूची शिकवणी ठेवली असतीत तर ?' असं स्वगत हळहळत आम्ही यावर गंभीर विचार करू लागलो. एकीकडे डॉक्टरसाहेबांचं कौतुक वाटतं होतं– इतक्या सूक्ष्म चुका कळायला कान किती लांब– सॉरी, तीक्ष्ण असले पाहिजेत आणि गेली अनेक वर्षं घरच्यांची बोलणी खात, पण सकाळ–संध्याकाळ सिनेसंगीत (च) ऐकणारे आमचे कान इतके कमजोर असतील अशी आम्हाला कल्पना नव्हती. माननीय डॉक्टरसाहेबांचं पत्र वाचलं, त्याच संध्याकाळी लताचं ' आँखे 'मधलं ' मिलती है जिंदगीमें मुहब्बत कभी कभी ' रेडिओवर लागलं. (रवीचं असलं तरी बरं आहे, नाही हे गाणं ?) आम्ही अक्षरशः अनुक्रमे जीव एकवटून, जिवाचा कान आणि कानाचा जीव करून ते गाणं ऐकलं. पण व्यर्थ ! आम्हाला ते शब्द ' कबी ' ऐवजी ' कभी ' असेच ऐकू आले. त्या दिवशी आकाशवाणीनं आमची मदतच करायचं कंकण बांधलं होतं की काय नकळे. आणखी अर्ध्या तासानं ' आरती 'मधलं ' कभी तो मिलेगी, कही तो मिलेगी, बहारोंकी मंजिल ' हे गाणं लागलं.
पण काय चमत्कार ! किमान दहा वेळा ' कभी ' शब्द आलेल्या त्या गाण्यात दहाही वेळा ' कभी ' हा शब्द आम्ही ' कभी ' असाच ऐकला.
काय घोर निराशा झाली आमची म्हणून सांगू ! ' कभी 'चा उच्चार ' कबी ' असा ऐकू आला असता तर आम्हालाही सूक्ष्म श्रवणशक्ती आहे असा संतोष नसता लाभला ? मग लक्षात आलं. आपल्या कानातच बिघाड असला पाहिजे. (किंवा आपल्याच कामात बिघाड असला पाहिजे आहे. दोन्हींपैकी जे वाक्य जोरदार वाटेल ते घ्यावे. ) आमच्याच कानांना ' कबी 'चं ' कभी ' असं ऐकण्याची सवय लागली असली पाहिजे. (याचा अर्थ स्वतःचं भाषाज्ञान बरं आहे, असा विनय सोडून आम्ही करून घेतला आणि श्रवणदोषावर पांघरूण घातलं पाहिजे.)

अरे हो ! थोडा विचार केल्यावर जे व्हायचं तेच झालं : आणखी काही आठवलं. आणखी काही कमजोर श्रवणशक्तीच्या लोकांची नावं आठवली. नौशाद, साहीर लुधियानवी, मजरुह सुलतानपुरी, बेगम अख्तर...उर्दू मातृभाषा असलेल्या या श्रेष्ठ कलावंतांनी वेगवेगळ्या शब्दांत पण एकाच अर्थाची दिलखुलास दाद लताला दिली आहे की, ' कोणत्याही उर्दूभाषिक गायिकेपेक्षा लता (फिल्मी गजला) सरस गाते. उच्चारणपद्धतीसह लताची गजल-गायकी अस्सल मुस्लिम ढंगाची आहे...' तात्पर्य काय, बेगम अख्तरबाईंबाबत आता उशीर झाला आहे; पण मीधरून उपरोल्लेखित चौघांनी आपापली श्रवणेंद्रियं दुरुस्त करून घेतली पाहिजेत. नौशादना सध्या तसा वेळ हाताशी असतो. लताची आणि त्यांची अधूनमधून भेट होत असण्याची शक्यता आहे. यापैकी एखाद्या मुलाखतीत त्यांनी लताकडून ' कभी ' हा शब्द पाचशे वेळा लिहून घेतल्यास ती एक अमोल संगीतसेवा ठरणार आहे. त्यापुढच्या मुलाखतीमध्ये लताचे कोणते शब्दोच्चार सुधारायचे, याबाबतचं मार्गदर्शन डॉक्टरसाहेब त्यांना करतीलच.

' राजनंदगावसे आनंद अकेला, झुमरीतलय्यासे अप्पू, टप्पू, उनके डॅडी-मम्मी और आँटी, बबईसे धर्मेंद्र, जितेंद्र, मनोज और उनके साथी ' ' या ' विविध भारती'च्या फेमस फर्माइशीच्या चालीवर 'फिल्मफेअर'मधून जयपूरसे एस्. के.अग्रवाल, पटणासे कुमारी रेखा आदी मंडळी ' लता हटाव 'ची फर्माइश करीत असतात. लताचा थकलेला जीर्णशीर्ण गळा ऐकणं अगदी असह्य झालं आहे, अशी त्यांची तक्रार. पुष्टीदाखल त्या ' बॉबी 'चा उल्लेख करतात. लतानं आता तरुण नायिकांना आवाज देणं बंद करावं, असा सल्ला. गायन हा लतासाठी देखील एक चरितार्थाचा व्यवसाय (अद्यापही) असू शकतो, आणि दुर्गा खोटे, नादिरा, अचला सचदेव यांना गाणी गायला मिळण्याचा चान्स मिळणार नाही, या गोष्टी लक्षात घेता बाईंनी लताला एवढी कठोर सजा फर्मावू नये, असं आपलं आम्हाला वाटतं. ज्या ' बॉबी 'करता लताचा त्या पाणउतारा करतात, त्या ' बॉबी 'तलंच ' चाबी खो जाय ' गाणं आम्हाला इथं आठवलं. ' आगे हो घनघोर अंधेरा ' या शैलेन्द्रसिंगच्या ओळीनंतर, ' बाबा मुझे डर लगता है ' ही भावना लतानं कशा सुरेल सकंप आवाजात सजीव केली आहे, असं आपलं आम्हाला वाटलं. या घडीला प्रस्तुत ओळ, गळा आणि भाव यांचा मिलाफ करून इतक्या हुकमी सफाईनं म्हणणारी नवी पार्श्वगायिका तयार झाली आहे, असं निदान आम्हाला वाटत नाही.

' फिल्मफेअर 'चे संगीतसमीक्षक राजू भारतन देखील काहीसा रेखाबाईंसारखा सूर लावतात. त्यांचं म्हणणं, लता आता चव्वेचाळीस वर्षांची झाली. ती आणखी किती गाणार असा प्रश्न त्यांना पडला आहे. माझ्या ऐकीव माहितीप्रमाणे श्री. भारतन हे साधारण याच वयाच्या अलीकडचे वा पलीकडचे गृहस्थ आहेत. सिनेसंगीतावर आणि एकंदर चित्रपटव्यवसायावर ते गेली सुमारे दहा-बारा वर्षे लिहीत आहेत. ते आता आणखी किती वर्षं लिहिणार आहेत ?—नाही, त्यांनी थांबावं असं माझं म्हणणं बिलकुल नाही. उलट त्यांच्या शैलीदार, माहितीपूर्ण आणि तरीही रंजक, गावगप्पांपासून दूर असणारे सुरेख लेख देणाऱ्या त्यांच्या हुकमी लेखणीचं चहातं असलेलं माझं मन म्हणतं : राजूला शंभर वर्षे आयुष्य मिळू दे आणि शंभर वर्षं त्याच्या हातात लेखणी राहू दे. फक्त अमुक एका वर्षी सेवानिवृत्तीचा कायदा कुठल्याही कलाक्षेत्रात आणण्याचा असा अप्रत्यक्ष आग्रह त्यानं धरू नये आणि त्यातून लावणार असेलच, तर आपल्या गाववालीची—वाणी जयरामची—कड घेण्यासाठी तो असू नये.

सिनेसंगीताचा आणि सिने-साहित्याचा तज्ज्ञ म्हणून ज्याचा आम्ही आदर करतो, त्या राजू भारतनला आम्ही पामरांनी काय सांगावं ? चव्वेचाळिसाव्या वर्षी लता प्रसंगानुरूप दहा-बारा वर्षांच्या मुलालासुद्धा ' सूट ' होईल असा स्वतःचा गळा फिरवू शकत असेल, तर तिचं वय विचारायला काय हरकत आहे ? ' हरे राम हरे कृष्ण' मधल्या ' फुलोंका तारोंका सबका कहना है ' ह्या गाण्याची मुद्दाम आठवण करून द्यायची खरोखर आवश्यकता आहे काय ?



हिचा गाता गळा काही जणांच्या कंठशोषाचे कारण का ठरावा ?

लताच्या आवाजाचा एवढ्या निकरानं विचार करायची खरोखर वेळ आली आहे काय ? ' काय बुवा लता हल्ली पूर्वीसारखी गात नाही ' असा सूर अलीकडे ऐकू येऊ लागला आहे खरा. पूर्वीसारखी गात नाही म्हणजे फक्त वाईटच गाते, असा अर्थ होतो काय ? काहींच्या मते होतो. आणि ' एक मत ' म्हणून हा विचार लक्षात घेतला, तर ते मत हक्कानं, आग्रहानं मांडण्याचा हक्क त्यांना अर्थातच आहे. पण त्याच्याचबरोबर आणखी एक वर्ग अस्तित्वात आहे. त्याच्या मते लतामधल्या बदलाचा काही एक चांगला भाग आहे. लताच्या गायकीत त्या बदलानं वैचित्र्य आणलं आहे. लताच्या आवाजात ताजेपण होतं तेव्हाच्या गायकीत हे वैचित्र्य नव्हतं. गेल्या दहाबारा वर्षांमधे लतानं पार्श्वगायनाच्या तंत्रावर अद्भुत पकड मिळवली. पूर्वी ती सुरेख गायची तेव्हाची तिची गाणी प्रामुख्यानं गंभीर जातीची होती; त्यात त्या त्या नटीचा आवाज मिसळलेला असण्यापेक्षा लताच जास्त जाणवायची. आजची लता त्या त्या नटीबर-हुकूम आवाज बदलण्याची किमया साधून आहे आणि एखाद्या आर. डी. बर्मनसाठी वा लक्ष्मीकान्त प्यारेलालसाठी अत्याधुनिक

ढंगानं गाण्याची सफाईही कमावून आहे. हां, लता नको तितक्या उंच आवाजात आताशा गात असते, अशी तक्रार कुणी केली तर आपलं सहमत आहे. आश्चर्य म्हणजे, एस. डी. बर्मनसारखा याबाबत काही करू शकत नाही, पण कल्याणजी आनंदसारखे संगीतकार काही काही वेळा नकळत हे नियंत्रण साधून जातात.
' समझौता गमोंसे कर लो ', ' कोई कोई रात ऐसी होती है, ' किंवा ' कब, क्यूं और कहाँ ' ही काही नावं घेण्यासारखी गाणी नव्हेत. पण त्यांमध्येच लताचा आवाज किती सुरेल लागला आहे !
मंगेशकर मिरासदारीच्या आरोपाबद्दल खुद्द लताची बाजू ऐकायची असेल तर...पण ती फारसं बोलतेच कुठे ? एका भेटीत याबद्दल विचारता ती एवढंच म्हणाली होती की, " हल्ली पूर्वीइतकं काम मी घेतेच कुठं ? दिवसाला फक्त एकच रेकॉर्डिंग मी करते. ' लताचं म्हणणं अगदी खरं आहे. पूर्वी ती दिवसाकाठी चार रेकॉर्डिंग्ज करीत असेल. आता एकच करते. पण तिनं कमी केलेल्या कामाचा लाभ कुणाला मिळाला असेल तर तो आशालाच. अर्थात आज दिवसाला चार-पाच गाणी रेकॉर्ड करण्याच्या, हेवा वाटावा अशा परिस्थितीत असलेल्या आशाचं यश या एकटया एक गोष्टीशी मुळीच निगडित नाही. आजच्या घडीला ती बहरात आहे, ती सर्वोत्तम गाते आहे, ही सूर्यप्रकाशाइतकी स्वच्छ दिसणारी घटना आहे.
मंगेशकर मिरासदारीचा प्रश्न तुम्ही आशाजवळ छेडा. आपल्या परखड बाण्याला अनुसरून ती सांगेल, " तुम्ही लोक टाटा-बिर्लांना सांगता का, तुम्ही इतकं इतकं मिळवलंय, आता थांबा म्हणून ? " मग आमच्याच बाबतीत तुमचा एवढा आग्रह काय म्हणून ?
गायन हा व्यवसाय सुद्धा आहे, हे मान्य केल्यावर आशाचा हा दृष्टिकोन कबूल करावा लागतो. बाकीच्या प्रत्येक क्षेत्रात, मग ते राजकारण असो की सरकारी नोकरी असो, प्रत्येकजण आपली खुर्ची सांभाळण्यासाठी धडपडत असताना, सिनेमासारख्या अस्थिर पण चलती असताना सुखसमृद्धीच्या राशी उभ्या करणाऱ्या विश्वातली स्थिरपदं सहजी सोडून देईल ही अपेक्षाच चुकीची ठरेल. अशाच जीवघेण्या स्पर्धेला एके काळी लता आणि आशा या दोघींनीही तोंड दिलं आहे... नव्यांना संधी मिळावी, या निःस्वार्थी अपेक्षेनं त्यांनी आपली इंद्रासनं सोडून द्यावीत, ही मागणी विचित्र वाटत नाही काय ?
नव्या गायिकांना या दोघी पार्श्वगायन-क्षेत्रात पाऊलच ठेवू देत नाहीत; संगीतकारानं नव्या गायिकांना एखादं गाणं दिलं तरी त्या त्याच्याशी असहकार पुकारतात, वगैरे आरोप त्यांच्यावर केले जातात, त्यात कितपत तथ्य आहे ? कोण जाणे. त्यांच्या बाजूची वा त्यांच्या विरुद्ध साक्ष देणारी या बाबतीतली कोणतीच माहिती मला नाही. तरीही मला वाटतं, अधिक नव्या गायिकांना संधी मिळाली पाहिजे. दंडुकेशाहीनं लता-आशांना मागं न सारता ती मिळाली पाहिजे. लता-आशा उत्तमच गातात. त्यांच्या असामान्यतेबद्दल वादच नाही. पण चांगल्या गळयाच्या आणखी काही पार्श्वगायिका चित्रव्यवसायात आहेत, त्यांना संधी मिळायलाच हवी.
पण त्यांना संधी मिळवून देण्यात वाटेतले काटे कोण असतील, तर ती आहे आजची झटपट रंगारीवृत्ती. नव्या नटनटींना आज भरपूर वाव मिळताना दिसतो; नव्या गायक-गायिकांना तेवढा दिसतो का ? याच्या नकारार्थी उत्तरामागचं कारण उघड आहे. नव्या नटनटींजवळ अभिनयाचं भांडवल नसलं तरी देखण्या चेहेऱ्यांच्या जोरावर आणि तारुण्याच्या बळावर त्यांची कामं चालून जातात. नव्या गायक-गायिकांचं तसं नाही. पडद्यामागच्या या कलावंतांवर अपार मेहेनत घ्यावी लागते. ती घ्यायला संगीतकारांजवळ आज वेळ कुठे आहे ? जास्तीत जास्त करार हाती ठेवण्याची आधी त्यांच्यात कोण ओढ लागलेली. ती सांभाळायची म्हणजे दिवसाकाठी चार-चार गाणी रेकॉर्ड करणं आलं. रोजरोज नव्या चार गाण्यांना नव्या चाली कुठून आणायच्या, हा प्रश्न एक वेळ पॉप म्युझिक कृपेकरून सुटला. पण दरम्यान पार्श्वगायकांवर मेहेनत घ्यायला कितीसा वेळ मिळणार ? त्यापेक्षा ' लता-आशांना बोलवा; रेकॉर्डिंगच्या आधी तासभर त्यांना चालीची कल्पना द्या—काम झालं ' हा संगीतकारांचा दृष्टिकोण आणि खय्याम-जयदेव यांच्यात नवे पार्श्वगायक पुढे आणण्याची ताकद आहे. तर त्या विचाऱ्यांकडे कामाचा दुष्काळ ! मात्र इथे एक गोष्ट लक्षात घेण्यासारखी आहे. खय्याम-जयदेवनी नव्या गायिका हाताशी धरल्या, तर लता-आशा त्यांच्यावर रुष्ट होत नाहीत. पुन्हा त्यांनी बोलावलं की या लगबगीनं त्यांच्याकडे जाणार. सुज्ञांना यामागचं रहस्य सांगायला हवं का ? नवे पार्श्वगायक पुढं आणणं अन्य कुणाहीपेक्षा संगीतकारांच्या हाती आहे. संगीतकारात तेवढी हिंमत मात्र हवी, आत्मविश्वास हवा. ' नाही तर नाही घेणार लता-आशांना ! माझे गायक मी घडवीन ' हे आव्हान स्वीकारायची तयारी हवी. आणि हे काही अशक्य कोटीतलं स्वप्नरंजन नव्हे. पंचवीस वर्षांपूर्वी ओ. पी. नय्यरचा तारा तळपत होता तो याच चित्रसृष्टीत ना ? लताला न घेता माझं संगीत यशस्वी करून दाखवीन हा त्याचा दावा होता. त्यानं तो उघड बोलून दाखवला आणि खरा करून दाखवला. स्वतःच्या मनगटातल्या जोरावर त्यानं संगीतात स्वतःचं वेगळं स्थान निर्माण केलंच. शिवाय आजच्या आशाला घडवण्याचं शिल्पकाराचं श्रेयही, आज नय्यर-आशा जोडी फुटल्यावर आणि संगीतकार म्हणून नय्यरची कारकीर्द संपुष्टात आल्यावरही दिमाखानं नय्यरला मिळतं.
आशासाठी नय्यरनं परिश्रम घेतले, लताला पैलू पाडले. गुलाम हैदर आणि नौशाद यांनी. सुलक्षणा पंडित, चित्रा सिंग आणि सुषमा श्रेष्ठ यांना आज गरज आहे नव्या गुलाम हैदरची, नौशादची आणि ओ. पी. नय्यरची. नाही तर पुन्हा एकदा सुमन कल्याणपूर, सुधा मल्होत्रा आणि मुबारक बेगम यांच्या बाबत घडलेला निराशाजनक इतिहासच पाहायला मिळेल. पंक्तीत ताटावर पडणाऱ्या तुपाच्या बिजलीवेगानं त्या क्षणकाल चमकतील आणि लुप्त होऊन जातील.
खुद्द संगीतकारांना या नाजूक समस्येबद्दल विचारा. आर. डी. बर्मन म्हणतो, " नवे आवाज ऐकू येत नाहीत याचं खापर एकटया संगीतकारांच्या माथी का फोडता ? ज्या स्टार्सकरता हे नवे आवाज वापरायचे, त्यांनाच ते नको असतात. शिवाय

पार्श्वगायकांना तेजीचा भाव असतो, तो अधिकाधिक वाढवण्यात निर्मात्यांचा हात असतो. 'रिस्क' नको म्हणून तेसुद्धा प्रस्थापित पार्श्वगायकांच्याच मागे लागलेले असतात.

संगीतकारांनी नटनटींवर; नटनटींनी निर्मात्यांवर आणि निर्मात्यांनी संगीतकारांवर टेपर ठेवण्याचा हा 'कोण म्हणतो टक्का दिला' चा खेळ असाच चालू राहाणार आणि हे असेच चालू राहाणार तोवर मंगेशकर भगिनींची मिरासदारी म्हणा, एकछत्री अंमल म्हणा असाच चालू राहाणार!

दरम्यान 'टाइम पास' करण्यासाठी, चुरचुरीत लिहिण्यासाठी उत्सुक असलेल्या लेखण्या त्यांच्यावर मिरासदारीचा आरोप करीत राहाणार! ¤

## आर. डी. चा कसोटीकाळ


लोकप्रियता ही किती अस्थिर चीज असते आणि तिच्या चढउताराबरोबर चित्रव्यवसायात कशी वागणूक वाट्याला येते, या कडवट अनुभवाची चव सध्या आर. डी. बर्मन घेतो आहे. गेल्या वर्षीपासून त्याचे लागोपाठ चार–पाच चित्रपट सपशेल कोसळले. या वर्षी 'दीवार' उत्तम चालला आहे, तर त्यात संगीत नसतं तरी चाललं असतं किंबहुना अधिक बरं झालं असतं, अशा कोपरखळ्या आर. डी. ला सध्या मिळत आहेत.

इतके दिवस देव आनंद, शक्ती सामंत, राजेश खन्ना ही आर. डी. ची माणसं होती. मोठ्या बर्मननी स्वखुशीनं निवृत्ती स्वीकारल्यावर देव आनंदनी 'नवकेतन'ची संगीतसूत्रं आर. डी. च्या हवाली केली आणि बर्मन परिवाराशी आपली निष्ठा जाहीर केली. 'आराधना'च्या यशानंतर शक्ती सामंतच्या सिनेमांना आणि राजेश खन्नाच्या बहुतेक सिनेमांना आर. डी. चं संगीत असणार, हा अलिखित नियम बनला होता.

'इश्क इश्क, इश्क'च्या नेत्रदीपक झोंबऱ्या अपयशानंतर, 'अजनबी'नं चटकन गाशा गुंडाळल्यानंतर आणि 'दीवार'च्या संगीताला कोमट प्रतिसाद मिळाल्यानंतर आर. डी. च्या सिनेसंगीतातल्या अनन्यसाधारण महत्त्वाला ग्रहण लागणारसं दिसतं. लोकप्रियतेच्या अबलख वारूवर आता स्वार आहेत लक्ष्मीकांत–प्यारेलाल. गेल्या दोन वर्षांत 'बॉबी'सह सर्व हिट् चित्रपट खिशात घालणारी लक्ष्मी–प्यारे जोडी आर. डी. ला डोकेदुखी ठरणार. केवळ नशीब जोरदार म्हणून ही जोडी आर. डी. च्या वर्चस्वाला शह ठरली आहे, हे म्हणणं खरं नाही. कधी काळी शंकर–जयकिशन जोडीला अवगत असलेली किमया आज लक्ष्मी–प्यारेनी अवगत केली आहे निःसंशय. अगदी सहजपणे तोंडात बसणाऱ्या सोप्या चाली ते देऊ शकतात. जीवघेण्या स्पर्धेच्या रिंगणात धावताना आर. डी. च्या आणि एल. पीं. च्याही संगीतात एकसुरीपण घुसलं आहे. पण पुष्कळदा सुबोधतेच्या टेकूवर एल. पी. वेळ मारून नेतात.

'ठेकेदार' आर. डी. मात्र निस्तेज, कंठाळीपणात अडकल्यासारखा वाटतो. 'हरे राम हरे कृष्ण'च्या यशानंतर, आर. डी. चं संगीत म्हणजे डोक्यापासून पायापर्यंत फिरणारा विजेचा प्रवाह, अशा अपेक्षा निर्माण झाल्या. त्या यशानंतर आलेल्या करारांच्या लोंढ्यात आर. डी. तला प्रयोगशील, नाविन्याचा हव्यास असलेला कलावंत गुदमरून गेला. 'इश्क, इश्क, इश्क'सारखा संगीताला संपूर्णपणे वाव देणारा चित्रपट हाती येऊनही आर. डी. त्यातून काही साधू शकला नाही.

'इन्स्ट्रुमेंटल म्युझिक'मध्ये त्यानं आपली चमक दाखवली; पण चालींमध्ये चैतन्य



लतानं एस्. डी. बर्मनकरता अनेक सुरेख गाणी गायिली आहेत. पण एके काळी एस्. डी.नं देखील लताशिवाय संगीत यशस्वी करून दाखवलं होतं.

ओतण्यात तो निष्प्रभ ठरला. 'शरीफ बदमाष', 'मिस्टर रोमिओ', 'आ गले लग जा', 'जोशिला' – गेल्या दोन वर्षांचा हा आर. डी. चा अपयश–आलेख. सगळे मोठ्या संस्थांचे चित्रपट. सगळेच्या सगळे सुमार चालले. 'आ गले लग जा' चांगला चालला; पण त्याचं यश आर. डी. चं नव्हतं. ते होतं स्टंट–एक्स्पर्ट मनमोहन देसाईंचं.

आर. डी. मारे समर्थन करू दे की, सिनेमे 'फ्लॉप' ठरले, त्यांचं संगीत 'फ्लॉप' ठरलं नाही. पण ते लंगडं समर्थन आहे. आर. डी. नं या संगीतामध्ये नवं असं काय दिलं, ते त्यानंच सांगावं. नुसत्या झकास ठेक्यावर गाणी थोडीच चालतात? 'हरे राम'मध्ये गवसलेली आणि 'अमर प्रेम' नि 'परिचय' मध्ये जोपासलेली नस त्याच्या हातातून निसटल्यासारखी झाली आहे. सतत मिळत गेलेल्या यशानं की काय, आर. डी. गाफील झाल्यासारखा वाटला. त्याच्या हातात हुकमी गीतकार नाही. गाणी लोकांच्या स्मरणात राहायला जे भावसौंदर्य लागतं, ते काही अपवाद वगळता त्याच्या संगीताला मिळत नाही. गुलजार–आर. डी. हे कॉम्बिनेशन सतत यशस्वी ठरणार असं वाटलं होतं. पण गुलजार मूळचा कवी आहे; गीतलेखक नव्हे. सुरावटीवर हुकमी गाणी रचणं हे कसब साधणं ही त्याची प्रकृतीच नव्हे. (संगीतकारानं बांधलेल्या चालीवर हुकमी आणि आशयसंपन्न गीतं लिहिणारा, 'कलावंत' म्हणता येईल असा एकच गीतकार आजवर होऊन गेला–शैलेन्द्र.) 'आंधी'तली गाणी ऐकली जातात याचं श्रेय मात्र आर. डी. पेक्षा गुलजारकडे अधिक जाईल. पण गुलजारच्या सिनेमाबाहेर त्याची साथ आर. डी. ला लाभणं कठीण आहे.

राहता राहिला मजरुह सुलतानपुरी. सातत्यानं चांगली गाणी लिहिणारा, गेय गीतं लिहू शकणारा तो बहुधा आजचा एकमेव गीतलेखक ठरेल. कैफी आझमी सुरेख काव्य लिहितात. पण आधी बांधलेल्या चालींवर शब्दरचना करणं हा त्यांचादेखील प्रांत नव्हे. कैफी–आर. डी. युती कधी होईल की नाही, कोण जाणे. पण मजरुहची आणि आर. डी. ची युती अनेकदा यशस्वी ठरली आहे. 'अभिलाषा', 'कारवां', 'तीसरी मंजिल', 'यादोंकी बारात' ही काही चटकन आठवणारी नावं. आर. डी. च्या संगीतातली अवखळ, उसळती जादू मजरुह चांगल्या शब्दांनी अधिक प्रभावी करू शकतो.

पण मजरुह आज आर. डी. च्या यादीत दिसत नाही. आनंद बक्षीनंतर त्याचं मत दिसतं ते गुलशन बावरासारख्या जुळारी गीतकाराला. आजच्या अपयशाच्या भोवऱ्यातून बाहेर पडायचं तर आर. डी. ला प्रथम चांगला गीतकार हाताशी धरावा लागेल. मोजक्या आणि चांगल्या सिनेमांची निवड हा त्याच्यापुढे असलेला दुसरा उपाय. 'आंधी' चा हा संगीतकार 'परछाइयां' 'शैतान' सारखे दुय्यम दर्जाचे सिनेमे का हाती घेतो?

हिंदी सिनेमासृष्टीच्या अव्यवस्थित कारभाराची आर. डी. ला कल्पना आहे. 'दीवार' च्या दिवसांमध्ये त्याची आणि निर्माते गुलशन रायची रोज संध्याकाळी गाठ पडायची. सिनेमाचं पाऊण काम होईपर्यंतच्या संध्याकाळी काव्यशास्त्रविनोदात गेल्या. आणि सिनेमा संपता संपता एका संध्याकाळी गुलशन रायनी आर. डी. ला सांगितलं, "आपल्याला दोनाच्या जागी चार गाणी टाकायची आहेत." आणि मग इतर कामं सांभाळून हा 'ओव्हर टाइम' करताना आर. डी. ची जी तारांबळ झालीय म्हणता!

इथे आर. डी. च्या संदर्भात नव्हे, पण संगीताबाबतच्या निर्मात्यांच्या धोरणाबाबत एक प्रश्न पडतो: ज्या कथांमध्ये संगीतास फारसा वाव नाही, तिथे मोठे संगीतकार घ्यायचा मोह निर्मात्यांना आवरत का नाही? 'कोशिश' मधे मदनमोहनला खर्ची घालण्यात काय साधतं? 'सबसे बडा सुख' मध्ये सलील चौधरींची का परवड होते? 'अभिमान' साठी एस्. डी. बर्मन हवा–एस्. डी. बर्मनच हवा. पण 'चुपके चुपके' मधे त्याची खरोखर गरज असते का? 'दीवार' मधे आर. डी. बर्मन नसल्यानं काय बिघडणार होतं? निदान दुय्यम चित्रांसाठी नव्या संगीतकारांना वाव देणारे आणि नावही मिळवून देणारे तीनच मोठे निर्माते आज दिसतात–ताराचंद बरजात्या ('सौदागर' रवींद्र जैन), बी. आर. चोप्रा, ('जमीर' सपन चक्रवर्ती) आणि महमूद. (कुंवारा बाप–राजेश रोशन), हाती असलेल्या लोकप्रिय संगीतकारांची शक्ती वाचवण्यासाठी तरी निदान दुय्यम सिनेमांमध्ये छोट्या वा नव्या संगीतकारांना वाव मिळावा. नाही तर सपन–जगमोहनसारखे मदन–मोहनच्या संगीताची आठवण देणारे संगीतकार उमेदवारीतच संपून जायचे.

आर. डी. ला देखील सातत्यानं वाव दिला तो महमूदनंच. नशिबानं योग्य वेळी हात दिला, आणि आर. डी. ची उमेदवारी लवकर संपली. त्यानंतर झगझगीत यशाचा एक छोटा कालखंड वाट्याला आला आणि आज आर. डी. पुन्हा अनिश्चिततेच्या उंबरठ्यावर उभा आहे. आणि अलीकडच्या काळात हीच त्याच्याबाबत घडलेली सर्वोत्तम गोष्ट ठरेल. तो जातीचा संगीतकार आहे. आव्हान स्वीकारणं आणि यशस्वी करून दाखवणं हा त्याचा स्वभाव आहे. 'अति परिचयात् अवज्ञे' चा पुरेसा अनुभव त्याला बरंच काही शिकवून जाईल. घाईगर्दीच्या कामाच्या ओझ्याखाली दबलेल्या त्याच्या सुरांवर कधीकधी काजळी धरल्यासारखी वाटते. पण तेवढ्यानं आर. डी. संपला असं होत नाही. 'इस मोडसे जाते हैं' सारखं एखादं अस्सल गाणं अद्यापही आर. डी. जवळ पुष्कळ शिल्लक आहे हे सांगायला पुरेसं आहे. आणि त्याच्याच बळावर आर. डी. या तात्कालिक अपयशातून लवकर सावरेल अशी खात्री वाटते.

तसं तर अजून एक हुकुमाचं पान त्याच्या हाती आहे. राज कपूरसारख्या मास्टर शोमनचा आणि संगीताच्या दर्दी जाणकाराचा 'धर्मकर्म' त्याच्या हाती आहे. संगीतकाराकडून त्याचं 'बेस्ट' काढून घ्यायची राज कपूरची ख्याती वेगळ्यानं सांगायला नको. चिकित्सक राज आर डी. च्या मरगळलेल्या सुरांना टवटवी देईल असं वाटायला एक सबळ कारण आहे. 'धरमकरम'च्या निमित्तानं आर. डी. ची आणि कपूर पितापुत्रांची रोज संध्याकाळी बैठक भरते. तिथे काव्यशास्त्रविनोदाशिवाय नेमानं 'धरमकरम' च्या गप्पांचीही चर्चा होते, असा विश्वसनीय वृत्तान्त आहे.

■ ■



आर.डी.बर्मन

आर.डी. आणि गुलजार यांची प्रथम गाठ पडली 'परिचय'मध्ये. ही युती हमखास यशस्वी ठरत जाणार असं वाटलं. पण 'दूसरी सीता'नं भ्रमनिरास केला.
गुलजारच्या स्वतःच्या चित्रपटांबाहेर ही युती यशस्वी ठरेल का? लवकरच येणारा 'खुशबू' त्याचं उत्तर देईल.
दरम्यान मला पुन्हा प्रश्नचिन्ह :

**आर.डी.ला गुलजारवर अवलंबून रहाता येईल का?**



गुलजार

# आगामी



ये मेरा प्रेमपत्र पढकर
संजीवकुमार आणि सुलक्षणा पंडीत 'उलझनें' मध्ये.

'अर्जुन पंडित' मध्ये अशोककुमारची वेगळा अभिनय नजरेस पडेल. या 'एल.बी.' फिल्मस निर्मित आणि हृषिकेश मुखर्जी दिग्दर्शित चित्रपटाचे संगीत एस.डी. बर्मन यांनी दिलेले असून गुलजार यांनी संवाद लिहिले आहेत.



एक बाप-दो बेटे ! पण महमूदच्या या नव्या सिनेमाच नांव आहे


## 'एक बाप-छे बेटे'

फोटोतील बालकलाकार ही महमूदची दोन अपत्ये. नूतन जया भादुरी आणि मौसमी चतर्जी याही प्रमुख भूमिकांमध्ये दिसतील.



## आणखी एक देवदास !

उत्तमकुमार 'अमानुष' मध्ये.



# मेरा जीवन

दिलीप रुद्राक्ष

रौप्यमहोत्सवी ' कोरा कागज ' चे निर्माते सनत कोठारी यांच्या आगामी ' कौन किसका ' या चित्रपटाचा मुहूर्त अलीकडेच संपन्न झाला. बरीच मंडळी उपस्थित होती. या चित्रपटाच्या नियमित कामकाजाला लवकर सुरुवात होणार असून शशीकपूर, जितेंद्र, शर्मिला यांच्या त्यात भूमिका आहेत. गुजराती रंगभूमीचे सुप्रसिद्ध दिग्दर्शक व अभिनेते प्रवीण जोशी ' कौन किसका ' दिग्दर्शित करणार आहेत. संगीत कल्याणजी आनंदजी.

गेल्या वर्षी ' कोरा कागज ' चा लायन्स क्लब दिल्ली ने त्या वर्षांचा सर्वोत्कृष्ट सामजिक चित्रपट म्हणून गौरव केला. केंद्रिय माहिती आणि नभोवाणी मंत्री इंद्रकुमार गुजराल यांच्या उपस्थितीत निर्मात्यांना पारितोषिक देण्यात आले होते. ' कोरा कागज ' ला लाभलेल्या मान्यतेमुळे-श्रीजी फिल्म्सला आपला त्यानंतरचा चित्रपट ' मेरा जीवन ' लवकरच सुरू करावा लागला, तो सध्या पूर्ण होत आला असून गेल्या महिन्यात निर्माते हसमुख कोठारी यांनी कोल्हापूरनजिकच्या गगनबावडा या रम्य खेड्यात बावीस दिवसांचे आउट डोअर संपविले. त्यात विद्या सिन्हा, दुष्यंत (नवा चेहरा) अंबिका जोहर, सुलोचना, के. एन. सिंग यांनी भाग घेतला. त्यापैकी विद्या सिन्हाचेही ' रजनीगंधा ' बद्दल लायन्स दिल्ली ने कौतुक केले आहे. ' रजनीगंधा ' हे जर माझे प्रथम चित्र असते तर फारच छान झाले असते ' असे ती अलीकडच्याच भेटीत माझ्याजवळ बोलली होती. कारण राजकाका व हवस हे तिच्या शुभारंभाचे दोन्ही चित्रपट कोसळले. परंतु त्यामुळे नर्व्हसनेसव्यतिरिक्त तिचे काही विशेष बिघडले नाही. त्याची स्पष्टोक्ती देत ती म्हणाली :

' ONE HAS TO HAVE FLOPS TO SUCCEED '. विद्या सिन्हा ही एका मुलाची आई असलेली चित्रनायिका सिनेमातील प्रत्येक हिरोबरोबर काम करण्याची अभिलाषा बाळगून आहे. मात्र ' राजाकाका ' च्या वेळी बेशिस्त वागणूक केलेल्या किरणकुमारबरोबर काम करणार नाही असाही दावा तिने केला. रेहाना सुलतानप्रमाणे ' चेतना ' टाइप रोल विद्या सिन्हाला अमान्य आहेत. त्यामुळे हिरॉइनचे अवमूल्यन होते असे ती म्हणाली. तथापि आजच्या सेक्सवर सक्सेस अवलंबून असणाऱ्या सिनेमात विद्या विधानाचे कितपत मूल्य कायम रहाते ते बघायचे. ते काहीही असो मात्र 'रजनी गंधा'-पासून तिला भाव आला आहे. एके काळी राजेश खन्ना ने ' राजाकाकात ' त केवळ तिच्यामुळे काम करण्यास नकार दिला होता त्याच राजेश खन्नाने तिला आपल्या एका आगामी चित्रपटात मागून घेतले आहे. इसे कहते है किस्मतका करिष्मा.

सध्या विद्या सिन्हांकडे सहा चित्रपट आहेत. ' मेरा जीवन ' हा तिच्या कारकीर्दीचा चौथा चित्रपट लवकरच प्रकाशित होईल. अगदी नव्यानेच सिनेमात पदार्पण करणारा एक तरुण (दुष्यंत) नायकाची भूमिका करीत आहे. गीतसंगीताची बाजू अनुक्रमे एम्. जी. हसमत व सपन-जगमोहन यांनी सांभाळली असून बिंदू शुक्ला यांचे दिग्दर्शन ' मेरा जीवन ' ला लाभले आहे...... ◻

विद्या सिन्हा

